जीवन सुंदर आहे

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

जीवन सुंदर आहे

ललित लेख संग्रह

शुभांगी पासेबंद

जीवन सुंदर आहे

लेखक: शुभांगी पासेबंद

202,आनंदी भुवन ,वीर सावरकर मार्ग

महाराष्ट्र विद्यालयासमोर

ठाणे पश्चिम ,400602

भ्रमण दरध्वनी 9869004712

scpaseband@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २६ जानेवारी २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

_शुभांगी पासेबंद

२) संपर्क क्रमांक_9869004712

३) पूर्ण पत्ता _शुभांगी पासेबंद

202,आनंदी भुवन ,वीर सावरकर मार्ग

महाराष्ट्र विद्यालयासमोर

ठाणे पश्चिम ,400602

४) पद - पत्रकार लेखिका

5) केलेले कार्य, उपक्रम -

आज पर्यंत 2026 सालापर्यंत 52 पुस्तक प्रकाशित +1ब्रेल+1विडिओ बुक+1ओडियो बुक

6'मुली जन्माला येऊ द्या' हा कन्या वाचवा, या देशाच्या बेटी बचाव बेटी पढाव, या उपक्रमांतर्गत ला संदेश देणाऱ्या कार्यक्रमाचे अंदाजे 75 प्रयोग झाले आहेत. मनाची मशागत ,समर्पण ,नाते शब्दांचे, संध्या छाया आनंदी व्हाव्या ,पसायदान,मुली जन्माला येवु द्या ,असे विविध समाजात जनजागृति करणारे एकपात्री प्रयोग करते.

दीपक वेलणकर,दादर,यांचेकडे आवाज़ कार्यशाला केली आहे.Youtube वर पूर्वीचे कार्यक्रम बघता येतील.7 शिक्षण MSc Bed,course in journalism.Lokkala academy diploma

लेखिकेची 52 पुस्तक प्रकाशित

एक ऑडिओ बुक ,एक व्हिडिओ बुक आणि एक अंध वाचकांसाठी ब्रेलमध्ये रूपांतरित केलेलं पुस्तक प्रकाशित झाले आहे. रुक्मिणी स्वयंवर या धार्मिक ग्रंथाचे अभिवाचन केलेला व्हिडिओ युट्युब वर प्रकाशित झाला आहे.

7 साहित्यिक सन्मान अंतर्गत वाचक कट्ट्याच्या शुभारंभ प्रयोगात,मुलाखत सादर2/7/24

11 विविध पुरस्कार

1 महाराष्ट्र दीप 2008 , 2009 सावित्रीबाई फुले पुरस्कार 2007, 3 डिके सांडू पुरस्कार ८/१९

4 ठाणे महानगरपालिका ,उत्कृष्ट समाज सेविका पुरस्कार 2006

5 मराठी ग्रंथ संग्रहालय दादर यांचे कवी प्रफुल्ल दत्त पुरस्कार 2010

6 रेगे पुरस्कार ,ठाणे 2019

7 ठाणे गौरव ,ठाणे 2016

8 वसंत व्याख्यानमाला नाशिक येथे 12.5.22 रोजी 'मुलीही जन्माला येऊ द्या ' कार्यक्रम सादर झाला.(स्त्री गर्भ हत्या प्रतिबंधक संदेश देणारा)

आधार रेषा प्रतिष्ठान ठाणे येथे "मन शुद्ध तुझे" हा कार्यक्रम सादर झाला.

मनाची मशागत, (चला आनंदी राहु या)कार्यक्रम करतात.

9 Blog. Writing in a different creative way.

email.scpaseband@gmail.com

14 इम्पॉर्टन्ट.पत्रकारिता अभ्यासक्रम पूर्ण, (महाराष्ट्र मराठी पत्रकार संघ दादर) यांच्यातर्फे प्रथम वर्गात उत्तीर्ण!

10 जनादेश टीव्ही न्यूज चॅनेल तर्फे उत्कृष्ट सामाजिक सेवा रत्न ,साहित्यरत्न गुणगौरव पुरस्कार 2024 ठाणे गडकरी रंगायतन

11 समाज चिंतामणी प्रतिष्ठान जळगाव यांच्यातर्फे समाज चिंतामणी राज्यस्तरीय पुरस्कार 2025 जळगाव.आत्तापर्यंत 600 स्तंभ प्रकाशित झाले आहेत. जीवनदीप ग्रामोद्धार दैनिक ऐक्य नवे शहर मुंबई चौफेर गावकरी लोकसत्ता जनादेश या वर्तमानपत्रात मुक्त पत्रकार लेखन केले आहे.

12 ठाणे येथील वाचक कट्टा येथे ज्येष्ठ साहित्यिक म्हणून मुलाखत घेण्यात आली आणि सन्मान करण्यात आला 2024.

13तळ्याकाठी कविता या कार्यक्रमात कविता सादर करण्यात आल्या 2024

14 आधार रेषा प्रतिष्ठान तर्फे मनाची मशागत या कार्यक्रमाचे आयोजन.9/7/2025

15 आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल पुणे येथेअध्यक्ष म्हणून निवड4 जानेवारी 2026.

**

शुभांगी पासेबंद यांचे अन्य प्रकाशित साहित्य

1 मयूरमासा कादंबरी - 2012 - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई तर्फे (नवोदित अनुदान योजने अंतर्गत,हार्ड कोपी)मायबोली प्रकाशन मुंबई.2. नाते शब्दांचे -ललित - 2014 पुणे-हार्ड कॉपी.घरकुल प्रकाशन पुणे 3. मुलीही जन्माला येऊ द्या- ललित-2015- द कृ सांडू पुरस्कार बक्षिस पात्र -पुणे-हार्ड कॉपी घरकुल प्रकाशन पुणे.4. रंग केशरी - कादंबरी- इ-बुक 2015बुकगंगा डॉट कॉम.उद्वेली बुक्स 5. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथा संग्रह - ई-बुक - 2016 बुकगंगा

2016 बुकगंगा डॉट कॉम, विनामूल्य6. कस्तुरी पक्षी- ईइ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य.7. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डॉट कॉम 8. जाईन मी विचारीत रानफुला- स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कॉम9. राहू दे घरटे- इ कादंबरी-2016 विनामूल्यwww.esahity.com,10. मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

११ कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य,१२ आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य.१३ why did i fall in love? novel, Amazon .com, Createspace,ई बुक.२०१२.3$ID 3338069dt5feb2008ISBN1434844013EAN-13-9781434844019USA१४. मधुर दंश कथासंग्रह - नवल प्रकाशन २०१६ पुणे, हार्ड कॉपी.१५ बेलाची पाने-स्तंभ संग्रह- ई बुक-बुकगंगा डॉट कॉम-२०१७एप्रिल१६ रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल.१७ केशरबाग-विचक्षण प्रकाशन= ई बुक स्तंभ संग्रह- जुलै २०१७ शिरपुर=

१८ कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे==२०१७अनघा प्रकाशन ठाणे१९ दीपज्योति नमोस्तुते-स्तंभ संग्रह-ई बुक-२०१८२० कशाला ऊद्याचि बात -कथा संग्रह=पुणे-2018 नवल प्रकाशन.२१Unholy water.bookganga.com.ईबुक.22 तू ऐकतो आहेस ना? ई बुक .Bookganga.कॉम २3 नक्षत्रबन =अनाहत प्रकाशन पुणे=कथासंग्रह=पुणे-2019२4प्राजक्ताची फुले,स्तंभसंग्रह.ई-साहित्य 2019.25 त्या तिथे पलिकडे कथा संग्रह,नवल प्रकाशन,पुणे201926 सरसावल्या कथा संग्रह.अनघा प्रकाशन ,ठाणे,2019.27 माझा मधुसंचय ईसाहित्य,स्तंभ 2020,28 परिकथेतील

राजकुमारा ई साहित्य कादंबरी :सप्टेंबर 202029 सागरकिनारे:ऑडिओ बुक ई साहित्य.कथा-संग्रह.www eSahity.comनोव्हे 20

30 या सुखांनो या !स्तंभ संग्रह 2020 उद्वेली बुक्स31 मन शुध्द तुझं स्तंभ संग्रह मार्च 2021 ईसाहित्य32 साधी माणसं स्तंभ बुकगंगा डॉट कॉम 202133 सुखसंवाद स्तंभ ई साहित्य जुन२०२१,३4 कथा सरिता कथा ईसाहित्य जुलै 202135 केळीचे फुलले बाग- बुकगंगा-2021.36 बाहुली कादंबरी उद्वेली बुक 202137 चांदणवेळा कथा ईसाहित्य -202238 खुशी 2022 ईबुक शॉपिझेन स्तंभ 39ही वाट दूर जाते 2022, चेतक प्रकाशन पुणे ,कथासंग्रह40 सुखाची चांदणी ईसाहित्य 202341 जीवनधारा शॉपिझेन, हार्ड कॉपी 2023

42डाव मांडून मांडून मोडू नको.नवल प्रकाशन पुणे 15/3/2023 43 पाचुची बासरी कविता संग्रह ,शॉपिझेन गुजराथ 2023.*44 गावाकडची माती/ कादंबरी /नवल प्रकाशन 2024. 45 आशीर्वाद स्तंभ संग्रह शॉपीझन2024 46 brail अरे समुद्र 2024. 47 विडीओ सागरकिनारे 2024. 48 झपुर्झा नवल hard copy 2025/49 अगर तुम ना मिलते हिंदी शाॅपिजेन 2025. 50लाखाची गोष्ट amazon kindle2025 51फुलास जिथे फुलता येते रोहिणी प्रकाशन 2025 /52देणे ईश्वराचे शाॅपिजन 2025 53जीवन सुंदर आहे[हे पुस्तक]

मनोगत: 2026

लोक भरभरून बोलत राहतात जणू काही त्यांना रोजचा आणि विश्वाचा अनुभव सांगायचा असतो. तसा विचार केला तर एका दिवसात,रोज एक पुस्तकाचे पान,निश्चित लिहून होऊ शकतं. त्यामुळे 65 च्या वरती वय गेलेल्या, लोकांकडे, सांगण्यासारखे खूप काही अनुभव विचार आणि कथानक असतात. भूतकाळातील, वर्तमानातील काळातीत,शाळेतील, त्या सामाजिक परिस्थितीतील, शिक्षकांच्या, भविष्यातील भीतीच्या,आवडत्या कवीच्या,जुन्या काळच्या नटांच्या, त्याकाळच्या ऐकीव घटनांच्या गोष्टी माणूस सांगत सुटतो. अनुभवलेल्या ,कथा, कथन घटना या स्तंभ संग्रहात मी लिहिल्या आहेत.

आपण कुणाचं वाईट केलं नाही, आपलं चांगलं होईल, ही शुभकामना मनात धरत शीर्षक 'जीवन सुंदर आहे' असं ठेवलं आहे.

सौ शुभांगी पासेबंद

ठाणे

**

अनुक्रमणिका

जीवन सुंदर आहे

1 ढोल्या धाव रे

2 चला गप्पा मारू या .

3आहे मजा जगण्यात या

4 जीवन सुंदर आहे

5 स्नेहदीप मालवू नको रे :

6 परदेस जाके परदेसिया

7आईला रिटायर व्हायचं आहे

8 दिवा विझवु नका

9 मेड इन इंडिया

10 जुनी गाणी चलनी नाणी

11. आमची मुंबई

12आ आवाजाचा

13 आनंदसरी

14 सैनिकहो

15 आई कुणा म्हणू मी

16 देव जरी मज कधी

16 जलप्रलयानंतरची वीस वर्ष

17 आयफेल टॉवर.पॅरिस

18गोदावरीचे पाणी

19चितचोर आले

20 निसर्ग सखा

21 सफरनामा

22 मुंबई स्पिरीट

23 पुस्तक मित्र

24पवित्र रिश्ता

25फ्रेनेमी

26 अरे घरोट्या

27 तू सुखी रहा

ढोल्या धाव रे :

नाशिकमधील ढोल्या गणपती, हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे, जे नवसाला पावणारा गणपती म्हणून ओळखले जाते. या गणपतीला 'लंबोदर' किंवा 'विशालकाय गणेश' असेही म्हटले जाते, तर 'ढोल्या गणपती' हे नाव प्रेमळपणे दिले गेले आहे.

स्थळ: हे मंदिर नाशिकमध्ये असून, पूर्वी ते गावाबाहेर होते.महत्व: हा गणपती नवसाला पावणारा आहे, अशी भाविकांची श्रद्धा आह.गणपतीची ओळख,ढोल्या गणपतीला लंबोदर आणि विशालकाय गणेश म्हणूनही भक्तात ओळखले जाते.

सुप्रसिद्ध श्री ढोल्या गणपती मंदिर नाशिक महाराष्ट्र मध्ये अशोक स्तंभ परिसरात आहे. अशोक स्तंभ हे प्रत्यक्षात शहराची हद्द आहे पण जागतिकीकरणामुळे आता ही जागा शहराच्या मध्यभागी आहे. मंदिर सुंदर रंगांनी रंगवलेले खूप छान आहे. पूर्वी रंगवलेले नव्हते हे गणरायाचे खूप जुने मंदिर आहे. हे मंदिर सुमारे 250 ते 300 वर्षांपूर्वी पेशव्याच्या काळात बांधले गेले होते. या मंदिरामध्ये भक्त सत्यनारायणयाची पुजा हि करतात आणि आलेल्या गणेश भक्तानां प्रसाद हि देतात. गणेश उत्सवात आणि चतुर्थीच्या दिवशी भक्तगण दर्शनाला गर्दी करतात.शहराचे ग्रामदैवत म्हणून नाशिककरांचे श्रध्दास्थान असणारे श्री ढोल्या गणपतीच्या दर्शनासाठी राज्यभरातून भाविक या देवस्थानी येत असतात. पेशवेकालीन असलेल्या या मंदिरातील आकाराने भव्य असणारी गणेशमूर्ती सात फूट उंच व चार फूट रुंद आहे. मूळ मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. या मूर्तीला शेंदूर लावला जात असल्याने मूर्तीला शेंदरी रंग प्राप्त झाला आहे. मंदिराचा गाभारा

अठराव्या शतकात बांधण्यात आला आहे. मंदिराचा जीर्णोद्धार पंधरा वर्षांपूर्वी करण्यात आला. नवसाला पावणारा गणपती म्हणून भाविकांची या दैवतावर श्रध्दा आहे. ढोल्या गणपती हे भाविकांकडून प्रेमापोटी लाडक्या गणेशास मिळालेले नाव. याच गणेशाला 'लंबोदर' किंवा 'विशालकाय गणेश' म्हणूनही ओळखले जाते.

आठवणी:मैत्रीण सुमतीच्या घरी गेल्यावर हमखास ढोल्या गणपतीचं दर्शन घेऊन मगच घरी येणे हे ठरलेलं होत. मी व निलीमा कधी जायचो.बी एड कॉलेज सुटले की पण जायचो . भाची तर लहान पणापासून जाते.मैत्रिण म्हणाली, सकाळीच जाऊन आलो तसं मी दर मंगळवारी दर्शनासाठी जाते. गणपतीको ढोल्या मत कहो ना! उसका नाम महागणपती है.मी लिहिणार होते, इतका सुंदर गणपती आणि आपण काय ही नावं दिलीत. मला ही तसं लिहिताना काहीतरी वाटत होत .खरतर प्रेमाने दिलेली नावे असतात ती, पुण्यातल्या खुन्या मुरलिधर किंवा पत्र्या विठोबा पेक्षा हे नाव चांगलेच आहे. महागणपतीचे लाडाचे नाव....बाकीच्या पण काही देवांची नावं बघा . काय ते पेढ्या मारूती आणि अशीच काय काय धमाल नाव.ढोल्या हे ही लाडाचे नाव असणार. खुन्या, पत्र्या, हो मला एकदम आठवेना, पण वाचलंय.किती भयाण विशेषणं आहेत. लोकं अगदी रंगात येऊन त्या मागच्या कथा सांगत असतात. डुल्या मारुती,भिकारदास मारुती. देवाला सुद्धा वाईट वाटत असेल तेव्हा मला कोणी विचारलं नाही की तुला हे नाव ऐकून कसं वाटतं ?लोक गंमतीत म्हणतात हे माझ्या नंतर लक्षात आलं. बाकी सुरवातीला अशी नाव ते चित्र तर डोक्यावरूनच जायचं. आता देवचित्रांबाबत तेच होतंय. मी तर 'समजलं नाही' असं म्हणते.आपसुक उत्तर मिळून जातं. मी एखाद्या निरागस मुली सारखं पुजार्याला छान विचारते. काही झालं तरी देवा वर बोलण्यातला भाव.बदलता येतो हेच खरं . आला पाहिजे..मात्र पूर्वी हे मंदिर गावाबाहेर होते. गावाच्या हद्दीबाहेर गणपतीसह मारुती, भैरवनाथ या ग्राम देवतांची मंदिरे स्थापन करण्याची परंपरा पूर्वी गावाच्या रचनेत होती. विविध

प्रकारच्या आपत्तीपासून, संकटापासून ही दैवते रहिवाशांचे रक्षण करतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. शहराचे रक्षण करून शहराच्या समृध्दीत हेच दैवत भर घालते अशी भाविकांची श्रध्दा आहे. यामुळे प्रत्येक शुभ कार्यात आणि पेचाच्या प्रसंगी लाडक्या ढोल्या गणेशाचे स्मरण करायला नाशिककर विसरत नाही.

ढोल्या धाव रे, मला पाव रे!**

चला गप्पा मारू या :

चला गप्पा मारू या! असं आवडत वाक्य असते.ते न बोलता सुद्धा माणसांना सतत गप्पा मारायला खूप आवडतं .गप्प न बसणे गप्प अधिक अ=गप्पा असा शब्द निर्माण झाला असावा.

बायका फार बडबड करतात, अशी तक्रार केली जाते पण पुरुषांना सुद्धा गप्पा मारायला आवडते. सहलीच्या ठिकाणी ,चांदण्या रात्री, उघड्या आकाशात ,हे सोबतच्या, बाजूला बसलेल्याशी ,प्रवासात वाटसरू सोबत ,मित्रांसोबत परिचितांशी,घरात बाहेर कुणा न कुणा सोबत, समोरच्याशी माणूस कायमच गप्पा मारत असतो .गप्पा मारणे हा जणू काही माणसाचा एक मूलभूत हक्क असतो.गप्पांना काही खास विषय असावा लागतो असेही नाही. कोणताही विषय चालतो. हवा पाणी ,पाहिजे ते,नातेसंबंध,हवा ,राजकारण ,महागाई कोणत्याही विषयावर गप्पा मारता येतात .गप्पा मारायला दोन व्यक्ती कमीत कमी लागतात .एक बोलणारा एक ऐकणारा हवा.पण याहून अधिक व्यक्ती, कुशल गोष्टीवेल्हाळ व्यक्ती असल्या तरीही चालतं. गप्पा मारण्यासाठी चहा-कॉफी अन्य कुठली पेय शीतपेय,कटिंग चहा, एकच प्याला,चकणा अथवा नाष्टा चहा-बिस्कीट काहीही चालत. खाऊ किंवा विषय मग काहीही नसलं तरी माणूस गप्पा मारू शकतो .गप्पा मारत पोट भरत नाही असे नेहमी बोलले जाते. त्यात असा अर्थ असतो की गप्पांच्या सोबत काहीतरी नाश्ता खायला आणि एखादे पेय प्यायला मिळावे. मोबाईलची सोय झाल्यामुळे मित्राकडे जाऊन मैत्रिणीकडे लांबवर जाऊन गप्पा मारायची गरज राहिली नाही. मोबाईल फोन वर व्हिडिओ कॉल वर, काही बोलता येते. फोनवर

व्हाट्सअप वर गप्पाच गप्पा मारता येतात.गप्पीष्ठ बोलत राहतात.तोंडाची टकळी चालते.unlimited calls! खूप गप्पा मारायला,खूप माणसं असूनही कधीकधी माणूस मनातून एकटा देखील असू शकतो.सैरभैर,विस्कटलेले,एकटे .अशावेळी ही व्यक्ती स्वतःच्या मनाशी गप्पा मारु शकते.

तुका म्हणे होय स्वतःचाच संवाद स्वतःशी.

अशा स्वतःशी गप्पा मारल्या की आपल्या चुका समजतात .त्या सुधारण्याची संधी मिळते .गप्पा मारणे म्हणजे वायफळ गप्पा मारत वेळ घालवणे असे असतेच असे नाही.समोर blind believers असु शकतात.किंवा वैयक्तिक वैचारिक गप्पा शिकवण देतात.बोलले कि बरे वाटत.ठरवले होते त्या व्यतिरिक्त निराळे,लिहीलेले,वाचलेले गप्पात येते.गप्पात औपचारिक बोलणे व्यर्थ असते असं नाही. ओळख,गोडी,कला,हवा या पलिकडे गप्पांना काही विषय पण असू शकतात. गप्पांत काही वेचायचे असते.मला सगळे समजते हा अहंकार सोडून गप्पात उतरावे.आधी पाय बुडवावे,मग बघत उतरावे.ओघात विविध विषयांवरसमृद्ध चर्चा होवु शकते.

रुटीन तर असते,त्यात गप्पांचा मसाला टाकला कि मजा येते.चला गप्पाना,असे बोलावणे करतात.असे म्हणतात गप्पा मारणे ,चौकशी करणे, गॉसिप करणं यामुळे मनावरचा ताण कमी होतो. बोलून गप्पा मारणे अशक्य आहे म्हणून आज लिहून गप्पा मारल्या .

“चला गप्पा मारू या”

**

आहे मजा जगण्यात :

आहे मजा जगण्यात या !

असे एक प्रसिद्ध गाणे आहे.

‘ लाईफ इज ब्युटीफुल’ नावाचा एक युद्धाबद्दल चा खूप सुंदर चित्रपट पण आहे. त्यात वडील मुलाला सांगतात की तुला शेवटी एक खूप छान गिफ्ट मिळेल. ती गिफ्ट म्हणजे काय? तर तो मुलगा त्या युद्धाच्या परिस्थितीत ,वडील मारले गेले तरी जिवंत राहतो .म्हणजे मानवाचे जीवन हीच त्याला मिळालेली सर्वात मोठी स्नेहभेट आहे

तरुण वयात, व्यसनांपासून दूर राहून ,थोडं संयमाने वागलं,तर तरुणपणातली मजा सुद्धा उपभोगता येते .एका वयात, वय उलटल्यावर, खरं सांगायचं तर फारसा मौजमजा अति सहली अति खाण फिरणं उपभोग या गोष्टींमध्ये रस वाटेनासा होतो. बहुतांशी लोकांबद्दल मी सांगते आहे .काही जणांना शारीरिक शक्तीचे, आरोग्य संवर्धन व जीनचे वरदान असल्यामुळे ते हा जीवनाचा आनंद उपभोगू शकतात. उतारवयात उलट जबाबदारीतून आता आपण मुक्त झालो म्हणून ते मधाच्या पोळ्या मधुन हवा तितका ,हवा तसा आनंद शोधत असतात. या वयात त्यांना तो मिळत असतो.

बहुतेक घरी ज्येष्ठ नागरिकांवर स्वयंपाकातील गोड-धोड करून, पारंपरिक पदार्थ करणे आणि बेबीसिटींग या दोन्ही जबाबदाऱ्या लावल्या जातात. परदेशातील अपत्याच्या बाळंतपणाच्या वेळी भारतीय माता-पिता दोघं किंवा दोघांपैकी एक, माहेरचे किंवा सासरचे यांना बेबीसिटिंग च्या कामासाठी खास आमंत्रण येते. कारण

अजून तरी ज्येष्ठांचा अनुभव बघून आणि त्यांचा बालसंगोपनातली आवड, रस आणि अनुभव बघून ज्येष्ठ नागरिक हे त्यांच्या बेबीसिटींग कौशल्यासाठी हवेहवेसे असतात.परक्या ठिकाणी परक्या व्यक्तीच्या ताब्यात लहान मूल देऊन, आई वडील म्हणजेच जेष्ठ नागरीकांचे मुल सुना, मुलगी आणि जावई दोघे नोकरीवर जाणार, अशावेळी घरात घरची व्यक्ती असली तर काळजी राहत नाही. त्यामुळे बेबी सिटिंग साठी ज्येष्ठ नागरिक फार उपयोगी ठरतात. ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा या जबाबदारीची टाळाटाळ करू नये.झेपेना वाटल्यास रोज एक दोन तास त्या बालकाला छंद वर्गामध्ये किंवा बाहेर कुठेतरी बेबी सिटींगमध्ये ठेवाव .ते 1/2 तास हे ज्येष्ठ नागरिकांना स्वत:साठी क्वालिटी टाइम म्हणून वापरता येतील.

"पण आमच्या मुलांचा आम्ही केलं, आता इतरांना करू का ?आयुष्यभर का आम्ही परत मुल सांभाळायची का?" अशी चिडचिड करू नये. शिशु अवस्थेत बालकांना अधिक काळ द्यावा लागतो आणि थोडी बालक चालती पळती झाली की त्यांच्या मागे धावावं लागतं .मान्य आहे की वाढत्या वयोमानाने आणि दुखऱ्या गुडग्यांनी त्रासदायक होतं. म्हातारपण हे दुसरे बालपण असतं आणि हे बालपण त्या बालकाच्या सहवासात म्हणजे नातवंडांच्या सहवासात ,त्या दुधावरच्या साई सोबत आपण सुद्धा आनंद घेऊन जगु शकतो.प्रत्येकाचा विचार वेगळा असतो .पण...

उगवता सूर्य बघणं, मावळतीचे रंग बघणं, दिवसभर पक्षी किलबिलतांना झाडीमध्ये बघणं, एखादी महिन्यातली सहल, मित्र-मैत्रिणींशी गप्पा मारणं ,स्वरूची भोजन ,जेवण, नातेवाईकांशी बोलणं, यात सुद्धा आनंद असतो. टीव्हीवरची एखादी मालिका बघण्यात सुद्धा मजा असते .अर्थात त्या टीव्हीचा अतिरेक करून त्या टीव्हीचे व्यसन लावून घेऊ नये.माणसांचा माणसांची संबंध यायला पाहिजे. संवाद व्हायला पाहिजे आणि तो फोनच्या माध्यमातून ,प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून, सुद्धा साधला जाऊ शकतो .मनुष्य भावनांशी स्पर्श होण्यासाठी केवळ दूरदर्शन हे एकमेव

साधन ठेवू नये. आजूबाजूच्या शेजाऱ्यांशी,फेरीवाले, सोसायटीतल्या लोकांशी, बागेत भेटणाऱ्या परक्या माणसांची सुद्धा बोलावं .

जुन्या आठवणी या माणसाला नेहमीच चांगल्या वाटत असतात. नोस्टेलजिया शब्दात त्याच वर्णन करता येईल. पण पण केवळ आठवणी काढण्यापेक्षा आपल्या या जुन्या जाणत्या परिचितांच्या भेटी घ्यायला हरकत नाही.

खरं तर पूर्वीच्या काळी आपल्या पूर्वजांनी लग्न समारंभाला सगळं जमणे,उत्सव त्यासाठीच शोधून काढलेले असावं .असे की त्यावेळी सर्व नातेवाईकांचा परिचय होतो. कोण वृद्ध झालं ,कुणाची मुलं तरुण झाली, कुणाचा वंश वाढला, कुणाच्या घरी नवीन राजपुत्र राजकन्या जन्माला आल्या समजते. हा प्रवास, जीवन प्रवास ,जीवनातील वेगवेगळ्या अवस्थांचा आनंददायी अनुभव, सुद्धा आपल्याला अशा प्रसंगात घेता येतो .

मित्र-मैत्रिणी पण सर्व वयात ठेवाव्या.

कभी कभी चाय पे बुलाया करो अपने दोस्तों को !

अक्सर बंद घरो मे जाले लग जाते है त्यामुळे जगण्याचा भरपूर आनंद घ्या. दुखणं खुपणं, अनिश्चितता ,वेदना ,नातेसंबंधाची पडझड, सामाजिक भय, राजकारणाची अंगावर येणारी दाहकता,काही ना काही घटना या सर्व गोष्टी तर चालूच राहणार आहेत. आपण आपल्या जगण्याचा आनंद घ्यायला हवा आहे मजा जगण्यात या.

....

जीवन सुंदर आहे

करोनाचे दहशतीत चित्रपट बघतांना जाणवले कि Life is beautiful या नावाचा, एक प्रसिद्ध चित्रपट आहे. महायुद्धातील पार्श्वभूमीवर वडील आणि नऊ वर्षाचा मुलगा एका युद्धामुळे पडझड झालेल्या,कुठल्याशा इमारती अडकून पडलेले असतात .मृत्यू निश्चित असतो. पण आपण जगावे,अस/निदान आपल्या मुलानी जगावं,अस या वडिलांना वाटत असते.हे वडील मुलाला नेहमी संदेश देत असतात की,'लाईफ ईज ब्यूटीफूल',Life is beautiful,. ते मुलाला सांगतात की आपण खेळ खेळु या.आपल्या दोघांत हा खेळ आहे.मी जरी दारातून बाहेर गेलो ,तुझ्यापासून दूर गेलो आणि मी,कितीही ओरडलो, काही झालं, तरी तू या कपाटातून बाहेर यायच नाही. असे समजायच की तो खेळाचा भाग आहे.

बालकाला वडिल सांगतात,कि संपूर्ण खेळ कधी संपेल ?जेव्हा एका विशिष्ट देशाचा झेंडा लावलेल्या,(नाव लिहीत नाही,गोष्ट नात्यांची आहे,देशांची नाही) विशिष्ट देशाचे रणगाडे अथवा युद्ध गाड्या ,तुला बाहेर काढायला येतील. तोपर्यंत तू इथे आत दडून रहायचं.पूर्ण वेळ, तो क्षण येईपर्यंत दडुन ,आशा धरून राहिलास तर तुला मी एक सुंदर बक्षीस देणार आहे.वडिल मृत्यु पावतात.बालक जगते.त्या बालकाला वडिलांनी दिलेले आणि,बालकाने चिकाटीने मिळवलेले ते बक्षीस म्हणजे जीवन होय.Life.

आज सर्व जगच Corona,चे महामारीचे मृत्युसावटातून, अशा विचित्र परिस्थितीतून जात आहे की करोनाशी करत असलेल्या युद्धामुळे सर्वजण हैराण झाले आहेत. काहीही करून,करोनाला तोंड कसं द्यावं ते कळत नाहीये! अशा वेळी

घरात राहून आपण स्वतःच्या विभक्ततेने, एकांतातून,सोशल डिस्टन्सिंग करून घेत आहोत.

हो !आयुष्य हे खूप सुंदर असतं हे कळायला एखाद मोठ संकट याव लागत असाव. अनेक वर्ष सुट्ट्यांचं प्लॅनिंग ,मजा ,बाहेर खाण, नवीन नवीन घर घेणे वेगळे वेगळे कॉम्प्लेक्सेस,विमान प्रवासावर भर , फाईव्ह स्टर हॉटेल्स मध्ये राहाणं,चंगळवाद हे वाढतच चालल होत. पर्यावरणाचा हास, समाजातल्या काही घटना, पाहता एक अनाम भीती ,काही विचारवंतांना,धुरीणांना कायमच वाटायची.पर्यटनाचा, उपभोगाचा आणि अतिरेकाचा फुगा कधीतरी फुटेल असं वाटे.मनात अचानक अंतस्थ मनातून एक,वेगळ मन,विचारवंतांना वॉर्निंग देऊन जायचं. ती भिती खरी झाली आणि करोनाने जगभरात थैमान मांडले.

मी नेहमीच विचार मांडते, की जगात मृत्यू होत असताना, परमपिता,देवांनी सिनियोरिटीने,जेष्ठता यादीनुसार माणस उचलावी.मात्र देव काही माझा फ्रेंड नाही कि त्याने माझ्या मताला मान द्यावा,माझे ऐकावे. किंबहुना देव त्याला वाटेल त्या व्यक्तीला,Randomly उचलत असतो.करोनाचा सगळ्यात लहान वयाचा बळी, अठरा वर्षांची मुलगी आहे .तर वृद्धांना सुद्धा या 'कर करुणा' ,म्हणावे अशा करोना पासून धोका आहे.यावेळी जणू काय करोनामुळे,घाबरण्यामुळे ,विश्रांति,ब्रेक आला आहे.कायमच आपण काहीतरी करत राहिले धावत राहीलो.आता स्वल्पविराम आला आहे.2020

युरोप टूर मध्ये इटली बघतांना ज्या इटलीचे,गोंडोला राईड, सौंदर्य, पारंपरिक रचना,ऐतिहासिक जागा आणि सगळ्या मनाच्या इच्छा पूर्ण करणारा ट्रेंवी फाउंटन आणि इतिहासाचे साक्षीदार असलेले कलोसियम (स्टेडियम) बघून मी अतिशय भारून गेले होते .त्या इटलीत इतका नर संहार व्हावा याचा खूपच खेद

वाटतो.आपल्या देशात सुद्धा वेगळे वेगळे भागातून रुग्णांचे आक़डे येत आहेत?सोशल क्वारंटाइन नीट न, पाळल्यामुळे,काही लोक जाणता,अजाणता, जनतेत मिसळुन करोना व्हायरसचा रोग सर्वदूर पसरवत आहेत आणि इतरांचा सुद्धा जीव धोक्यात घालत आहेत.

'वर्हाड निघाल लंडनला' नाटका मध्ये, एक संवाद असायचा, ' काय हुईल कसं होईल लांबचा पल्ला'तशी एक अनाम भीती मनात येते.

कधी तरी रात्र रात्र झोप येत नाही.आज भीतीसुद्धा वाटते की त्या वयाचे ज्येष्ठ नागरिक झाल्यावर, आपलं,आपल्यांच कसं होईल? सोशल डिस्टन्सिंगला, पूर्णपणे साथ देत करोना विषाणूंची दुष्ट साखळी तोडली या. " गो करोना गो" या मोहिमेत,घरात राहुन सहभागी होऊन,करोनाचे उच्चाटन झाल.आपण, त्या घरी, राहण्यात यशस्वी होतजमेल ते करत,Social quarantine पाळल. यापुढे स्वच्छ राहु या . आपल्याला सुद्धा,असे म्हणायला वेळ मिळेल लाईफ ईज ब्यूटीफुल, लाइफची भेट मिळेल, Life गिफ्ट देवु या,घेवुया.सुरक्षित_राहा..,life is beautiful.

**

स्नेहदीप मालवू नको रे :

पूर्वी वस्तीत सर्व दार उघडी असायची.बालपणी गल्लीतली सगळी घर,कुठेही गेलं तरी चालेल अशी असायची.यापूर्वी तर चाळ संस्कृती सगळीच दार उघडी असायची आणि कधीही कुणाकडे गेले तरी चाले. हळूहळू गर्दी वाढली.वय वाढलं.संस्कृती, समाज, राहणी,बाई बदलली. बाई नोकरी करू लागली,स्वतःच्या हक्कांबद्दल अवेअर झाली.घरात राहणाऱ्यांना एकट वाटेना कारण ,करमणूक करायला टीव्ही आला. त्याच्यात ती रमली .तिला वाटलं,आपल्या आपण बऱ्या. ते भेटणे,मैत्री नंतरचा वाद नको. वस्ती वाढली , फ्लॅट स्कीम सुरू झाल्या.फास्ट लाईफ,आता इतर कुणाची, शेजारी पाजारी यांची गरज वाटत नाही.पण आम्ही जी वयस्कर माणसं होती, आहोत ना, त्यांना पूर्वीच्या काळी,कुणाशी तरी गप्पा मारायला जायी, कुणाला तरी भेटायला जायी,दुपारी कुणाकडे तरी अर्धा तास बसायला जायची, सवय असते.

आमचा 8 मैत्रिणींचा चांगला घट्ट मैत्री ग्रुप होता. कधी ते मंडळ,(भगिनी) माझ्याकडे यायच.कधी मी एखाद्या त्यापैकी एकीकडे जायचे.पण एक मैत्रीण, तिने घर जावई केला आणि कधी मुलाकडे राहायला जाऊन, ती तिकडची झाली. आम्ही वृद्ध मैत्रिणी तिच्या लेकीला,मुलांना जावयाला चिप वाटायच्या.

तिच्या लेकीचं म्हणणं, "परदेशात मैत्रीण, भेटणं,मैत्रिणी हा कन्सेप्टच नसतो.तू आपली टीव्ही बघ,मोबाईल बघ, युट्युब बघ आणि गप्प बस. कुत्रा फिरवून आण .त्यामुळे ते दार मला बंद झालं.

दुसऱ्या दाराच्या बाबतीत ती मैत्रीण अचानकच खूप लहरी होऊन गेली. कधी खूप प्रेमाने बोलवणार, तर कधीही हिडीस फिडीत करणार. तिचा फायदा असला की चिकटणार, फायदा नसला की दूर ढकलणार.पूर्वी हे कधी जाणवलं नव्हतं. आता का जाणवायला लागल आणि तेही दार बंद झालं.

तिसऱ्या मैत्रिणीच्या ठिकाणी,खाऊ घेऊन गेले होते आणि काही वस्तू घेऊन गेले होते.(ती जुनी सवय)त्या नेलेल्या वस्तू पसंत न पडल्याने, ते आवडलं नाही म्हणून तिची सून तिला काहीतरी बोलली. त्यावरून तिला असं वाटू लागलं की घरी सुने शी वाद वाढवण्यापेक्षा या लोकांनी आपल्या घरी येऊ नये.त्यामुळे तेही दार बंद झालं.

चौथी मी माझ्या घरी हौशीने सगळ्यांना बोलवत होते.तर माझ्या घरात, इमारतीचे जिन्याचे रिपेअर सुरू झालं. जिन्या त पायरीवर थोडी तूट फूट झाली.त्यामुळे या लोकांना बोलवायचं,तर माणसांना आजारपण येईल.त्या पडल्या धडपडल्या तर जबाबदारी येईल म्हणून मी बोलवणं कमी कमी केलं.

माझे एका मित्राने, लेकीला प्रस्ताव दिला, " वसतीगृहात असुरक्षित वाटतं पण ठीक आहे. माझा प्रस्ताव मांडतो आहे,तुला कदाचित विचित्र वाटेल. पण आपण तसं करू शकतो. तू कायमच घर बदलायचा विचार करत असतेस.तुला माझं घर आवडतं, बदल हवा,कुठेतरी जाऊन राहावं असं सुद्धा तुला वाटतं. मी काही दिवस परदेशी जाणार आहे तोपर्यंत तू येऊन राहू शकतेस. आज ये किल्ल्या घेऊन जा किंवा शेजारी किल्ले ठेवते जेव्हा वाटेल तेव्हा ये. दोन-चार दिवसासाठी राहा नाहीतर महिनाभर राहा. रोज सकाळी येऊन काही वेळ राहून,नंतर जाऊ शकते. तुझी निवड तुझा चॉईस आहे. विचार कर ठरव दोन जणांशी डिस्कस कर. माझ्या फ्लॅटमध्ये काही माणसं काम करतातच आहेत. मेजर रिपेअर च्या फायनल स्टेजमध्ये काम

आहे. नीट विचार कर त्या प्रस्तावाला वेटेज दे. माझी बाई काम करायला येणारच आहे ती झाडांना पाणी टाकेल, तुझा देखील घरचं काम करेल. विचार कर. "

हा त्याचा प्रस्ताव पण होता.त्याचं मन खरंच चांगलं म्हणायला हवं. पण बदल करणे एवढी शारीरिक स्थिती नव्हती. .

पाचवी म्हणते, "आल्यावर ऑर्डर देऊन खाणे मागवायच तर त्याच्यापेक्षा हॉटेलमध्ये,आता भेटत जाऊ या ना. "ते देखील काय वाईट आहे, चालेल,असाही विचार मी सुचवला.पण वयोमानाने आहार कमी झाल्यामुळे,हॉटेलमध्ये उरलेले पार्सल आणायचे,तर घरी तरी कोण खाणार, वाया जाणार,अशी परिस्थिती असल्यामुळे तो हॉटेलचा ऑप्शन बंद झाला.

सहावी म्हणते.,"आपल्या घरी लोकांना बोलावलं की ते आपली किंमत करतात,कारण आपली घर साधी असतात, पॉश नसतात.मोलकर्णींवर अवलंबून राहायच्या वयात आल्यावर, घर तितकीशी स्वागत करत नसते. आजार औषधचा वास, जुनंपण,यामुळे स्वच्छ राहत नाहीत. लोक येतात आणि मग ही लोक नाव ठेवत फिरतात.त्यामुळे तिने पण माझ्याकडे येऊ नका. आपण वाटल्यास खाली कॉम्प्लेक्सचे ते खाली बागेतल्या बाक्यावर बसू."असं सांगितलं. पण बाथरूमला वगैरे लागते,तोंड धुवावे वाटतं,फ्रेश व्हावंसं वाटतं,ते तिथे खाली बागेत जमेना.त्यामुळे आम्ही जाणं बंद केलं. त्यामुळे तेही दार बंद झालं.

सातव्या मैत्रिणीने सुचवलं मंदिरात भरपूर जागा असते भेटू या. पण अस्वछ लोक असतात पण गर्दी असते वेगवेगळ्या आजार साथीचे भय असत.त्यामुळे बाहेर भेटल्यावर बोलू, हा विचार कमी झाला.

आठवी अजून एक मैत्रीण होती. तिचं घर सगळ्यांचा हक्काचं होतं. ती तिच्या घरात घेतच नाही.तिच्या बागेत प्लास्टिकच्या खुर्च्या टाकल्या असतात, त्याच्यावर

बसायचं. ती कधी चहा विचारत नाही की नाश्ता विचारत नाही.पण जागा भरपूर मोकळी असल्यामुळे,केळीचे बाग फुल झाड असल्यामुळे,खूप जण तिकडे चिकटले. आम्ही नेहमीच्या जाणाऱ्या मैत्रिणी उपऱ्या झालो.आपल्या वाटेना झालो.

मग आम्ही उरलेल्या मैत्रिणींनी दर मंगळवारी एका गणपतीच्या देवळात भेटायचं ठरवलं.अकरा मंगळवारचा फलश्रुती होईल, आम्हाला कोणीतरी सांगितलं होतं. मग त्या गुरुजींच ऐक,या गुरुजींचा ऐक असं करून काही व्रत केली. मैत्रिणीला मुलाचं लग्न करायचं होतं तिला स्थळ यायला लागली त्यामुळे ती खुश झाली. एका मैत्रिणीला घर विकायचं होतं,गावची शेती विकायची होती, तिला सुद्धा फायदा झाला आणि ती देखील खुश झाली. या व्रतांमुळे आशा वाढत होती.पण फलश्रुती मिळते की नाही,असा संशय आला. कंटाळा येऊ लागला. हळूहळू त्या मंगळवारी गणपतीच्या देवळाच्या आवारातील, पायरी वर जमणं सुद्धा बंद झालं. देऊळ इतकी गर्दी झाली की आपापसात बोलता येईना. रस्ता क्रॉस करता येईना. आजूबाजूला पण बांधकाम सुरू झाली. रस्ते तर बारा महिने खोदलेले असतात. ट्रॅफिक सोसेना. ते भेटीचा द्वार देखील बंद झालं.

आपल्या जुन्या पिढीतली माणसं आई वडील आजी आजोबा ते मृत्यू झाल्यावर आपण काय केलं काहीच करू शकलो नाही तशी आता काही नाती मृत झाली आहेत समजवून मी मनाला गप्प करते पण मृत्यूही दूर नेलेली माणसे कमी दुखावतात जे नातं तुटलं ते जास्ती दुखावत विशेषता काहीतरी गैरसमजातून तुटलेल्या नात्यामुळे मी जास्त जखमी झाले आहे असं मला हल्ली वाटतं

काळ बदलतो आहे. हल्ली तर पाहुणे पण कुणी कुणाकडे जात नाही.पाहुण्यांना सुद्धा हॉटेलात उतरवायची पद्धत आहे. पूर्वी माझ्या घरी पाहुणे आल्यावर हॉलमध्ये, बारा बारा तेरा जण गाद्या टाकून झोपलेली मला आठवत आहे.

आता इन्फ्रा स्ट्रक्चर डेव्हलप झाल्यामुळे, प्रवास जलद होतो.पहाटे निघून मुंबई ला येतात, काम करतात,रात्री आपले घरी पोहोचतात किंवा आले तर हॉटेलला उतरतात.त्यामुळे दार बंद व्हायला लागला आहे.

दिवस तर कामात अन्य काही, वाचन याच्यात निघून जातो. संध्याकाळी कुणाशी तरी संवाद साधावा,असं वाटतं. पण मनातील स्नेहाचा दीप सुद्धा मालवतोय.अशी सगळी दार बंद झाली,तर या बंद दरवाजावर ठोठावत राहावं लागेल.असो.देवा सर्व संकटांमध्ये स्नेहदीपाच्या मिणमिणत्या प्रकाशात मी संकट पार केले. कृपा कर, स्नेहदीप मानवू नको रे!

**

परदेस जाके :

परदेशाच आकर्षण माणसाला फारच असतो. कोणीही परदेशी सहलीला गेलं ,अस ऐकलं की कान टवकारले जातात .हिंदी सिनेमात परदेशी चित्रीकरणाचं दृश्य समोर दिसलं ,की लोक आवर्जून ,डोळ्यात प्राण आणून बसतात .मुलं परदेशी गेली असं कोणी सांगायला लागलं की आजूबाजूची लोक त्याच्याकडे कौतुकाने बघतात. पूर्वी एवढं अप्रूप नाही, तरी अजूनही थोड्याफार कौतुकाने बघतात. हल्ली ग्रामीण भागापासून उच्चभ्रू लोकांपर्यंत शिक्षणासाठी, नोकरी प्रशिक्षण कशासाठी तरी ,परदेशी पाठवलं जात. जागा बदलली की बरेच प्रश्न सुटतील असा एक समज आहे . त्यात परदेशी कुणी कुणाला विचारत नाही कुणाच्या खाजगी प्रश्नात लुडबुड करत नाही हा परदेशातला एक फार मोठा महत्त्वाचा जमेचा मुद्दा आहे. मागे मी एकदा एक मालिका बघितली होती ,त्याच्यात कोणत्याही गरीब घरी/सामान्य घरी भांडणं झाली ,वाद झाला ,मुलीस काही प्रॉब्लेम झाला,की," इसको विदेश भेज देते है!" असे म्हणायचे. परदेशात जाण्याच्या कल्पनेने हौसावून ती व्यक्ती एकदम बदलून जाते .

परदेशात विविध आणि वेगळ्या आपण जिथे नेहमीच राहतो त्याहून निराळी दृष्टी आणि सृष्टी असते. बदल होतो आपली मानसिकता बदलते आपलं वलय बदलत आपली सहवासातली माणसं बदलतात वास्तू बदलते.फायदा होतो.

वैश्विक स्तरावर काही बदलाव होतो की काय माहित नाही .संकट आल्यावर सुद्धा फिरवून आणलं की बर वाटत,ती पद्धत आहे म्हणून हवापालट करतात.माणसाची जागा बदलवण्यासाठी काही दिवस न्याव.नेहमी यात्रा भेट सण या निमित्त प्रदेश बदल करावेत अशी पद्धत आपल्या धर्मांनी सांगितले आहे. प्रदेश

शब्दाचाच अपभ्रंश परदेस होऊन माणसं परदेशी स्थिरस्तावर झाली. तसं एकदम टोकाचा बदल झालं की माणसाला बरं वाटत असतं.

अतिशय ग्रामीण भागातून ,शेत विकून सुद्धा परदेशी सहलीसाठी जाणारे लोक आमच्या सोबत अनेक टूर्सला मी बघितले आहेत .व्यापार करणारे ट्रॅव्हल ने बरोबर जिंदगी ना मिले दोबारा अशी जाहिरात केली आहे. अशा टूर बरोबर जाऊन फॉरेन टुर करणारे लोक आहेत. फॉरेन टुर च्या सहली कायम फुल जात असतात. युरोप अमेरिका जपान सिंगापूर मलेशिया थायलंड लंडन या टूरला तर लोक वारंवार सुद्धा जातात.

परदेशी जाणं हे आकर्षण जरी असलं तरी एक उत्सुकता असते. एक टेन्शन असतं .परदेस शब्दाबद्दल ची खूप गाणी आहेत. परदेश शब्द आलेला सिनेमा सुद्धा नेहमी हिट होतो .परदेस शब्दाबद्दलची गाणी आठवा .

परदेस जाके परदेसिया भूल न जाना पिया! पण तो पिया हमखास भुलून [विसरुन]जातो. कारण की परदेशाच आकर्षणच असं असतं .दृष्टी आड झाली .नजर हटी दुर्घटना घटी! विसरशील खास मला दृष्टी आड होता अशी मग ती घटना घडली व्यक्ती नजरेआड दडली अन्य प्रदेशात रमून जाते. आणि नायिका काढत राहते "भूल न जाना पिया"," पिया परदेसी गया!"," परदेसी परदेसी जाना नही, मुझे छोडके, दिल तोडके"!किंवा " "एक परदेसी मेरा दिल ले गया जाते जाते मीठा मीठा दर्द दे गया"

उपजीविकेसाठी स्थलांतर करणे ,ही पोटापाण्यासाठी ,आज तरी थोडी आशादायक किरण दाखवणारी गोष्ट आहे .वर्तमानपत्रात रोज नोकरी वरुन काढून टाकल्यामुळे,नोकरी न मिळाल्यामुळे ,नोकरीच्या शोधात नैराश्यामुळे, आत्महत्या केल्याच्या ,बातम्या ऐकायला मिळतात. अशा वेळी परदेशी जाऊन पोट भरणे, हा सुखद धागा असतो .आपल्या देशात आपल्याला कोणीतरी ओळखलं आणि

आपण थोडं खालच्या प्रतीचे काम केलं ,तर हसतील असा समज असतो .परदेशात तशी भीती नसते.बेअरा वेटर ,कुरिअर देणे ,डिलिव्हरी बाॅय,ईतर कामात भरपूर पैसा मिळतो.ती काम करणे शक्य होऊ शकते.

यात तत्त्वज्ञानाचा भाग असतो, की परदेशी गेला की माणूस त्या वातावरणामुळे ,त्याच वलय बदलत. त्याच्या आयुष्यात नवीन व्यक्ती येतात. आपल्या देशापेक्षा वेगळं वातावरण त्यांना समजतं. त्या चमक दमक ला ते भुलतात. आपल्या देशात असताना आपण कधीतरीच मोठ्या कॉन्टिनेन्टला जाऊन जेवणार .रोज नाही. पण या परदेशवारी मध्ये भारी भारी हॉटेलात जेवायला जातात. आपल्या देशात पण ताजमहाल वगैरे खूप सुंदर ठिकाण आहे. तिथे गेल्यावर आपल्याला आनंद देतात .ते सुद्धा ताजमहाल सुंदर आहे ,आजूबाजूच्या ठिकाणी बघितले की इतक त्याच वलय वाटत नाही. सुरक्षित वाटत नाही.

परदेशात आपल्याला कोणी ओळखणार नसतं. ते नवेपण भरून येत. जागा बदलली की बरं वाटतं. हे तत्व बऱ्याच ठिकाणी सांगितलं जातं. त्यातून पर्यटनाची सुरुवात झाली. जवळपासची टेकडी ,देव दर्शन ,नदीकिनारी जाणे वगैरे या प्रकारांनी थोडासा किरकोळ जागा बदल होत होता. पुढे पुढे मग प्रवासाची साधने सुलभ झाल्यावर इच्छुक देशभर फिरायला लागले. विमान प्रवास खर्चाच्या दृष्टीने आवाक्यात आला की देशाला ओलांडून परदेशी जायची स्पर्धा सुरू झाली .थोडे दिवस कशाला जास्ती दिवस जाऊ या म्हणून शिक्षणासाठी एक वर्ष दोन वर्ष जाणं बरं वाटू लागलं. तिथे गेलेल्या लोकांच्या सुरस आनंददायी प्रेरणादायी कथा ऐकून अगदी ग्रामीण भागापासून ते उच्चभ्रू वस्तीतील लोक देखील परदेशी पळु लागली. हळूहळू मग माणसं तिकडे स्थिरस्थावर व्हायला लागली

आमचे साहेब नेहमी म्हणायचे ,"तुम्हाला फार देशाबद्दल अभिमान असेल ना तर बांद्राला अमेरिकन विसाच्या कॉन्सिलेटच्या समोरची गर्दी बघा .किती लोक हा देश सोडून जायला तत्पर आहेत ,हे त्यावरून तुमच्या लक्षात येईल."

आता तर अमेरिकेने विसा थोडं अटी नियम कठीण केल्याबरोबर देशात एक भीतीची लहरच पसरली आहे. तिकडे स्थिरस्थावर झालेली लोक,घरदार घेतलेली, ग्रीन कार्ड होल्डर मुलांना जन्म दिलेले,परदेसी सुद्धा हैराण झाले आहेत. त्यात त्यांची चूक नाहीये. त्यांची मुळ आता तिथे रुजली आहेत.त्यांना आता तिथेच आवडायला लागल आहे . परदेशाबद्दलच हे तत्त्वज्ञान लागू आहे असं नाही .मुंबईत आलेली लोकं तरी कुठे परत जाऊ मागतात ,गावी घर असत शेती असते, पैसा असतो. इथे एका खोलीत राहतात हाल भोगतात पण परत जायचं नाव काढत नाही. मुंबईतले लोंढे कधी कमी झालेले आहेत का? पाणी पुढे पुढे वाहत आपला स्वदेश सोडून अन्य प्रदेशात (केवळ परदेश असं मी म्हणत नाही (अन्य प्रदेशात आलेले लोक देखील करत जायला मागत नाहीत. सुरक्षित ठिकाणी माणसाला अधिक सुरक्षित वाटतं .आपल्याकडे एका दिवसाचा पेपर असा दाखवा की ज्याच्यात बलात्काराची बातमी नाही .त्यामुळे परदेस माणसाला आवडतो.

परदेसिया ये सच है पिया,

सब कहते है मैने तुझको दिल दे दिया !

वो परदेसिया,काहे जाते हो ?

परदेस जाके परदेसिया भूल न जाना पिया! परदेसियों से ना अखियां मिलाना,परदेसियों को है एक दिन जाना!

**

8आईला रिटायर व्हायचे आहे:

आई हा घराचा कणा घरातील मुख्य पात्र असते.राबता हात म्हणजे स्त्री असते. प्रत्येकाच्या आवडीनिवडी हवं नको ते फक्त आईलाच माहीत असतं .अनेक वर्ष कुटुंबासाठी खस्ता खाऊन देखील आईला या व्यापातून रिटायर व्हायची वेळ येते निदान इच्छा होते काही दिवसांसाठी तरी ती स्वतःसाठी जगायचं ठरवते तेव्हा ती खरच घराच्या जबाबदारीतून रिटायर्ड होऊ शकते का? 1989 साली भक्ती बर्वे यांनी काम केलेलं आई रिटायर होते हे नाटक रंगमंचावर आलं होत. या नाटकाचे जवळजवळ 100 प्रयोग झाले. या नाटकाच्या यशावरून बा रीटायर थये छे या नावाचे असे गुजराती मध्ये देखील नाटक रंगमंचावर आले आणि गाजलं .नवीन स्वरूपात नवीन नट्या घेऊन हे नाटक पुन्हा पुन्हा प्रकाशित होतं .याच यश कदाचित आई या शब्दातच असेल .आईला रिटायर होन जमते का?

तिने सांजेला आकाशात वेगवेगळ्या रंगांची रांगोळी काढली होती. सूर्यनारायणा ने फ्री हँड चित्र काढले होते .एवढा साम्राज्याचा सूर्य त्यालाही निरोप घेऊन जावं लागतं.अंधार झाला आणि अचानकच त्या रंगांच्या लोभस प्रदर्शनातून माझं मन उडालं. निरोपाचे विचार माझ्या मनात येऊ लागले.अचानक अपघाताने एक मैत्रीण वारली .दुसरी आजारी पडली आहे .तिसरी परदेशी मुलीकडे गेली आहे .नोकरीतून निवृत्ती घेऊन खुशीत आहे. चौथी मी त्या चार चौघींसारखीच पण थोडी निराळी,तर सामान्य पण तरीही एकाच तळयात तरंगणाऱ्या सर्व बदकांचे नशीब सारखं थोडं असतं ?अन्य मनस्क होवुन देवाला सांजवात लावली .त्या प्रकाशात खोलीतला अंधार उजळला. लोड शेडिंग मुळे बाकी सर्वत्र अंधार व एक प्रकारचे

केविलवाणे पण भरले होते. मी अवघडल्या प्रमाणे खिडकीत उभी राहून वाहणाऱ्या गाड्यांचे दिवे बघत राहिले .तो अंधार ,राज्याच्या दुरवस्थेबद्दल खेद मनात दाटून आला. डास चावू लागले .प्रगती बद्दल वर्तमानपत्र येणारे जाहिराती आठवल्या. ना आपण डासांवर विजय मिळवला ना अंधारावर!उलट उलटी गंगा अंधाराकडे वाहते आहे .सकाळी उठल्यावर डबा बनवताना अंधार होता.भाजी जमली नाही .आंघोळ करायला गरम पाणी नव्हतं .कशीतरी कावळ्याची आंघोळ केली.काल मध्यरात्री कधीतरी लाईट गेले, वीज गेली पुन्हा जाग आली. मन उदास झाले.1965 खेड्यातील घरी बंगला बांधला तेव्हा माहेरी मी चार-पाच वर्षाची होते. वीज नव्हती .आमच्या पिढीने खूप स्थित्यंतरे पाहिली .बायका स्वयंपाक घर सोडून हळूहळू 1970 सालाच्या दरम्यान नोकरीवर जाऊ लागल्या होत्या. त्या सुद्धा अगदी सगळ्याच्या सगळ्या जात नव्हत्या.काही! अंगणातच भाजीपाला होता. मक्याची कणस, भाज्या फळे बागेतच होती. आता काळ बदलला फ्रिज आलं आणि त्यामुळे बऱ्याच सोयी झाल्या. पण पुन्हा विजे वाचून राहायचे दिवस आले. प्रगतीची अधोगती! नोकरी करणाऱ्या स्त्रीला नोकरी नको वाटते आहे .नोकरी करणाऱ्या स्त्रिया मूल नको, आम्हाला करिअरला आणि धावपळीला त्रास होतो ,असं म्हणतात. ही प्रगती का अधोगती?

1989 साली आई रिटायर होते या नाटकाने बरीच खळबळ माजवली होती. एकेकाळी त्या नाटकावर चर्चा घडवून आणत.बायका सुट्टीवर यायच्या. या नाटकात आईला घरच्या जबाबदाऱ्यातून अंग काढून घेऊन आराम.हवा असतो.तर ,आई रिटायर होते आणि सर्वजण आईला रिटायर होण्याला विरोध करतात.आई खंबीर राहते. भक्ती बर्वे ने फार सुंदर काम केलं होतं .पण प्रवाह हा विरुद्ध पोहण सोपं नसतं. मुलांच्या जबाबदाऱ्या च्या वेळी आईचा जीव तुटतो. सुन मूलगे मुली विरोध करतात. पण एका क्षणी सुनेला जाणवतं ,आपल्याला पण कधीतरी सासू व्हायचं

आहे आपल्याला देखील सासूच्या मार्गाने जायचं आहे. आपलं देखील हे असं राबणं कंटाळवाण होतय. शेवटी आपण देखील आईसारखेच संपून जाणार आहोत.आईला रिटायर करणे आवश्यक आहे .कारण एका मर्यादेनंतर आईला आता शक्ती उरली नाही. शेवटी आई त्या नाटकात ,नाटकापूर्ती तरी रिटायर होते.

अर्थात टोकाची निवृत्ती कुठल्याही आईला नको अस.ते कारण दुखऱ्या गुडघ्यांनी सुद्धा ती मुला-माग फटफटत जाते .मातृदिनाला नमस्कार केला ,मदर डेला ग्रीटिंग दिलं ,की आईनी काढलेल्या खतांची परतफेड होते का ?चेष्टा करायला टर उडवायला आई हा तर मुलांचा हमखास मुद्दा असतो.आईला विश्रांती हवी आहे. आळस म्हणून त्या आईला रिटायर व्हायचं नाही आहे .कमावलेल्या पोटापुरत्या धनाचाही उपभोग घ्यायला आईला वेळ नाही. नोकरी करणारी असो ,नाहीतर घरी राहणारी गृह स्वामिनी असो, आई सतत धावते आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत, महागाईच्या, परदेशी पळणाऱ्या सुपुत्राच्या ,अस्थिरतेच्या ,रोड सायबर फ्रॉड चोरटेत्यांचं भय,सर्व प्रकारच्या विविध तणावांच्या ओझ्याखाली आई वावरते आहे. सुजान व समजूतदार असल्याने ती गोंधळली आहे. मुलांचा अभ्यास ,त्यांचे करिअर,त्यांच्या आरोग्याचे प्रश्न,लखलखणाऱ्या चंदेरी दुनियेचे फसवे मायाजाल ,मोबाईलचा अतिवापर ,गुन्हेगारी, नोकऱ्यां नसण, शिक्षणात देखील रॅगिंग वगैरे असे विचित्र प्रकार ,स्वतःचे आजार, दुखणे, नको वाटते. जबाबदाऱ्या ,वडिलांचं असूनही फारसे पुरेशी मदत न करणे याने आई हैराण झाली आहे.

पूर्वीच्या काळी प्रदूषण नव्हतं .शरीरयष्टी व शरीराची हाडे पेर मजबूत होती .समाजातील आदर्श व संस्कृती उत्तम होती. महिला नोकरी सारख्या कामात गुंतलेल्या नव्हत्या. आजच्यासारखे सतत होणारे प्रवास तेव्हा नव्हते. आजी आजोबांच्या मांडीवर बाळ शांतपणे ठेवून ती बाहेर जाऊ शकत होती. बालक देखील घरात एकत्र कुटुंबात आश्वस्तपणे वाढत होती. मुले सांभाळायला पाळणा

घरांची सोय शोधावी लागत नव्हती. कारण आया नोकरी करत नव्हत्या आणि एखादी नोकरी करत असेल तर आजी तिचं मुल आजी आनंदाने सांभाळत होती. वृद्धाश्रम नव्हतं कारण वृद्धांना ओझं मानले जात नव्हतं .लोक खाऊन पिऊन सुखी होती. अर्थात यात आज बदललेल्या परिस्थितीत समाजाची देखील चूक नाही .परिस्थिती बदलत होती .त्या काळी देखील महिलांना तब्येतीच्या तक्रारी होत्या. नाही असं नाही. काही दिवस महिलांना थोडी विश्रांती मिळत असे, असं देखील नाही. चार दिवस बाजूला बसून देखील बाकीची घरची काम त्यांना करावी लागायची. मात्र घरी वडीलधाऱ्यांचा आधार असायचा .दूध दुभती होती. आजी नव्वदीतही ताठ असायची. लहान-नातवंड खुशीने सांभाळत होती .

मी नोकरीला लागले तेव्हा आमच्या बँकेत एक ग्रामीण भागातून अधिकारी बदलून आले होते. मला विचारू लागला ,"पाळणाघर म्हणजे काय ?या लोकांच्या काय घरी पाळणा नसतो का ?"

आज नोकरीवर जाताना महिलांना मुलांना पाळणाघरात ठेवावे लागत आहे.आजी मुलांना सांभाळत नाहीये. आजीला सीनियर सिटीजन क्लब पर्यटन स्वतः समूह ,स्वतःचे कट्टे,ईकडे तिकडे जायचं असतं .सर्वत्र ती जाऊन फिरून येते .वर भरीत भर म्हणून कुठल्यातरी देवळात मठात पण जाऊन येते. वारंवार पर्यटन, कट्टा वगैरे करुन आली की म्हणते ,"सुनबाई काकडीचे थालीपीठ कर हो बाई! तोंडाची चव गेली आहे ."

मग आम्ही या पिढीतल्या स्त्रिया मुक्त म्हणायच्या का ?सुखी म्हणायच्या का ?वर आपण काही कुरकुर केली की लोक म्हणतात "हिला सुख टोचत आहे" बायकांची नोकरी ,मिळणारा पगार, घरच्यांनी ,स्वीकारला. समाजाने स्वीकारला. पण त्यात स्त्रीचीच झीज होत होती .स्त्री आई झाल्यावर तिला दोन्ही डगरीवर अधिक

नाचावं लागतं. पूर्वीची परिस्थिती अजूनच वाईट वाईट होत गेली आहे.वीज आली होती.

रात्री माझी कमरेच्या हाडाच्या दुखण्यासाठी स्पेशलिस्ट कडे अपॉइंटमेंट होती .अगदी कमी वयाच्या स्त्रीया आल्या होत्या .मला डॉक्टर म्हणाले ,"दूध पीत जा .स्वतःच्या आहाराकडे लक्ष देत जा ."

वेळ नाही म्हणून मी सुकी पोळी भाजी खाते. नाहीतर तोंडाला चव यावी म्हणून कधीतरी मिळाला तर बटाटेवडा खाते[त्याकाळी तर आत्तासारखे सर्रास वडापाव मिळत नव्हते] घरी सर्व असूनही मला खायला वेळ मिळत नाही. रिकामे पोटी दूध कसं प्यायचं ?म्हणून दूध देखील प्याल जात नाही. खूप कुपोषित स्त्रियांची नवीन पिढी तयार होते आहे का?मुलांची घरच्यांची सेवा करून आई झिजली आहे. भरपूर पैसा घरात येतो आहे. एका ऐवजी दोन दोन घर प्रत्येक घरातल्या माणसांनी कुटुंबाने घेतली आहेत .महागाईची झळ लागत नाही .पण मग या पैशाचं काय करायचं? म्हातारपणी डॉक्टरांना पैसे भरायचे?

एकदा एक इंग्लिश लेख वाचला होता .लेखिकेने मूल झाल्यावर पाळणघर शोधून शोधून कंटाळून, भले भुरे अनुभव घेऊन नोकरी सोडायचे ठरवल्याची कथा होती .मला माझ आरोग्य सांभाळायला हवं. व्यायाम योगासन करायला हवी. मान्य आहे. पण कधी ?वेळ तर हवा. लोकलमध्ये हातातल्या पिशव्या घेऊन लटकून पटकून जायचं. ऑफिसमध्ये सुद्धा घार हिंडते आकाशी ,चित्त तिचे पिलापाशी ,असं करायचं. त्यामुळे आठ तासाचं काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी व घरी पडण्यासाठी धावपळ करायची .कशातरी पोटात पोळ्या कोंबायच्या. शाही लंच घेणं हे चांगलं काम करणाऱ्याच्या आणि कुटुंबाशी आणि मुलांची जोडल्या गेलेल्या आयांच्या नशीबि नसतं .काम वाट पाहत असतात. करणाऱ्याने ते करत राहावं

.बसणाऱ्यांनी बसून राहावं, हे तत्त्व नोकरीत घरीदारी सगळीकडे असते .छंद जोपासायला हवे असे डॉक्टर सांगतात .कसं झोपायचे कधी? वेळ तर हवा .आई कोमेजून जात आहे. चालली आहे. मुलांची तर करिअर घडवली. पण मुलांसाठी स्वतःच प्रमोशन आई नाकारते आहे. आता खरं सांगायचं तर आईला रिटायर व्हायचं आहे .कुणीतरी काहीतरी उपाय सांगा ना! अकाली कोमेजून जाणारे ,आईच्या भावनांना जपा. आईला रिटायर्ड व्हायचं आहे .आईला रिटायर्ड व्हायचं आहे.

**

9 दिवा विझवू नका :

हल्ली विजेची चकचकीत रोशनी, सगळीकडे दिवे लावून करण्याचा पद्धत आहे. पण सामान्य घरी आणि विज बिल जास्ती होतं म्हणून घरातले दिवे बंद करण्याची सुद्धा पद्धत आहे. पण मी मात्र जे सांगते दिवा विझवू नका,ते मनातील दिव्या बद्दल आहे.

दिल का दिया जला के गया ये कौन मेरी तन्हाई मे! देवाच्या देवळात लावलेल्या दिव्या बद्दल, असं म्हणल जात असत, दिवा अगरबत्ती विझवू नये . मान्य आहे. आरती करत असताना,दिवा विझला तरी दिपशांती करतात.म्हणजे दिवा विझण हे अशुभ मानलं जातं. याउलट पूजा करून झाल्यावर बाहेर जायचं असेल,तर दिवा विझे पर्यंत घरात थांबावं किंवा दिवा विझवून जावं, असं आम्हाला कॉलेजमध्ये सांगायचे. याचे कारण असे की उंदीर दिव्याची वात पळवू शकतो. दिवा वाऱ्याने खाली पडून,घरात काहीतरी दुर्घटना पण घडू शकते. त्यामुळे अशा वेळी आपण क्षमा मागून दिवा विझवु शकतो.

पण. इतरांचे आशेचा दिवा विझवू नका. मी सांगते की एखाद्या व्यक्तीने जर वाईट प्रसंगी हिंमतीने आशेने काहीतरी करण्याचा आयुष्यात पुढे जाण्याचा चंग बांधला असेल तर त्याच्या आशेचा दिवा विझवू नका.

मीट्ट काळोख असलेल्या रस्त्यावर, अथवा दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात देखील माणूस पुढे जाऊ शकतो. एखाद्या वाईट प्रसंगातून, लढून जी व्यक्ती पुढे जाते, तिला फायटर असं म्हणतात. तिला अशा मिणमीणत्या प्रकाशाची,एका थोड्याशा,छोट्याशा आधाराची, भावनिक उभारी देणाऱ्या व्यक्तीची गरज असते.

छपाक म्हणून एका चित्रपटात ॲसिड अटॅक मधून स्वतःला वाचवलेल्या तरुणींच्या टिकून राहण्याची कथा आहे आणि आहे त्या परिस्थितीत आनंद मिळवणाऱ्यांची कथा आहे. त्या अशा संकटातून दूर वर चालत येऊन,स्वतःच्या पायावर ज्या उभ्या राहीला, त्या तरुणींची ही कथा असते. त्या स्वतः तेजस्वी असल्या, तरी त्यांना असा त्यांचा दिवा न विझवणाऱ्या लोकांचा सहवास आवश्यक असतो. त्यांची आशा नष्ट करणारे,खच्चीकरण करणारे टीका करणारे आणि तुझा जगून काय उपयोग असं म्हणणारी माणसं,त्यांच्या मनाचा आशेचा दिवा विझवत असतात.

वाईट प्रसंगातून लढून जाणं सोपं नसतं. सगे सोयरे,सोबती सांगाती साथ सोडून जातात. सतत एक भीती मनात येते, आपलं काही चुकलं का? परत आपल्यावर कुणी हल्ला करेल का?परत आपल्यावर कुठलं संकट येईल का? नेहमी वाटते,आपल्याला कोणीतरी सोबत हवं. दुःखानंतर कुणावर तरी आपण कायम अवलंबून राहिला पाहिजे, ही भावना मनात येते. घरचे काही प्रमाणात साथ करतात,पण शेवटी त्यांच्या सोबत करण्याला पण मर्यादा असतात.

बहुतेक बलात्कारातून वाचलेल्या तरुणी पण काही काळानंतर कंटाळून जातात.कोर्ट कचेरी कामात न्यायासाठीचे आपलं युद्ध,कायद्यासाठी असलेली लढाई त्या च्यातून हार मानतात.काही काही स्वयंसेवक जे त्यांना मदत करतात,त्या मदतनीसाना देखील प्रचंड त्रास होतो. घर्षण होते आणि मग ते संबंध बिघडून जातात.

आपण सोबत करत आहोत, आपण उपदेश करत आहोत असं दाखवणारी माणसं सुद्धा आपलं स्वतःचं स्थान समाजातील बळकट करण्यासाठी आणि दुसऱ्याला कमी लेखण्यासाठी उपदेश करत असतात. जे घडलं त्याच्यात,त्या बळी

मुलीचा,त्या स्त्रीचा, त्या बालकाचा दोष असतोच असं नाही.पण तिला अपराधी भाव देऊन स्वतःला मोठेपण घेण्यात लोकांना आनंद वाटतो.

नकोशी आठवण मुद्दाम काढून जे शब्द टोचतात, ते शब्द परत परत वापरून, एखाद्या अस्वस्थ क्षणी माणसं त्या बळीला सोडून देतात.

हल्ली कायद्यानुसार बळीची ऐवजी त्या हल्यातून वाचलेल्या व्यक्तीला सर्वांयवर म्हणजे अस्तित्व टिकवलेली तरुणी असं म्हटलं जातं. या तरुणीला अस्तित्व टिकवायला, किती संघर्ष करावा लागतो, किती फाईट करावी लागते ती तिला,स्वतःलाच माहीत असते.त्यामुळे दुःखी माणसांना मदत करणाऱ्या गुरु,महाराज,बुवाबाजी करणारे ज्योतिषी यांची मांदियाळी समाजात असते.त्यातील काही चांगले देखील असतात. काही वेळा त्या गुरूंवर देखील अवलंबित्व होत आणि तीच माणसं वर्षानुवर्ष त्याच गुरुच्या सल्ल्यानुसार वागत राहतात. गुरु महाराजांच्या शक्तीने ते प्रश्न सुटतात, असं नाही पण त्या काळात बळींना त्या गुरू महाराजांचा आधार वाटतो. त्यात चूक काहीच नाही.एकाच ठिकाणी एकाच समुदायात एकाच समूहात किंवा एका गुरू महाराजांच्या संगतीत, पंखाखाली, छत्र छायेखाली राहण्यात काही चूक नसतं. पण मन जेव्हा चंचल असतं किंवा हळवं असतं तेव्हा स्थिर होणं सहज होत नाही.किंवा गुण येत नाही वाटतं, तेव्हा मग बळी व्यक्ती वेगळ्या वेगळ्या गुरु महाराजांच्या आशीर्वादासाठी फडफडत राहतात. त्यांची फडफड जाणणारे समाजात फार थोडेच असतात.

आज सांगते, हैं अंधेरी रात मगर दिया जलाना कब मना है?पण अशा संघर्ष करणाऱ्या व्यक्तीची साथ सोडू नका. आज परमेश्वराने तुमच्या वाट्याला सुख दिला आहे. उद्या काय होईल,तुम्ही कुठे जाणता? आज अगतिकला तुम्ही जर

कावळ्यासारख्या चोचा मारल्या, तर उद्या ही वेळ तुमच्यावर आली तर तुमचं कसं होईल?

आपलेच शब्द आपल्यावर उलटून येतात. आपण ज्या व्यक्तींना हसलो,तस आपल्याही बाबतीत घडन्याची शक्यता असते. जे घडायचं ते देवाच्या मर्जीने घडत असतं.काही ज्या गोष्टी, काम, वास्तू, नाती देव ठरवतो त्या बिघडू शकतात.काही योजना ज्या अडकलेल्या आहेत त्या अडकून राहतात. त्यातून मार्ग निघत नसतो.जीवनातील सगळे प्रश्न चुटकीसरशी सहजासहजी सुटत नसतात.

शिवाय ज्या लोकांचं नशीबच, असं परमेश्वरानेच लिहिलेलं असतं ते बळी जातात. पूर्व संचिता नुसार ठरते की त्यांना कायम संघर्ष करावा लागेल ते आयुष्यभर संघर्ष करत राहतात. वाईट विचार केल्याने वाईट गोष्टी आट्रॅक्ट होतात,असं म्हणतात. ते कदाचित खरं असेलही. कारण जी माणसे दुःख भोगतात त्यांच्या आयुष्यात सुखाचे शिडकावे फार काळ टिकत नाही.

विधिलिखित नुसार जे घडायचं ते घडत असतं. पण बळी ला,संघर्ष करणाऱ्यांना दुखवू नका. त्यांचा फायदा काढून, पुढे जाऊन,तुमचा किरकोळ फायदा होईल ही, पण त्या व्यक्तीचे मोठे नुकसान होत असतं. वैश्विक आत्मा,कर्म,वीरता वगैरे मोठे मोठे शब्द न वापरता मला सांगावसं वाटतं की दुःखी व्यक्तीला अजून दुखवू नका.

दुरितांचे तिमिर जावो असं म्हटलं जातं.तुम्हाला जर दुरीतांच्या आयुष्यातील तिमिर घालवण्यासाठी दिवा लावणं शक्य नसेल तर गप्प बसा.पण त्या दुःखी अंधारात वाट शोधणाऱ्यांनी, बळीनी लावलेला दिवा विझवु नका.

**

11मेड इन इंडिया :

मेड इन इंडिया म्हणजे भारतातील मोलकरीण असा हा आजचा विषय आहे .एक मैत्रीण रडत रडत सांगायला लागली ,"मोलकरीण सोडून गेली."

तुम्ही म्हणाल हा काय विषय आहे ?हे काय लिहिणं झालं ?मोलकरीण सोडून गेली ,असा लेख कोणी लिहित का?पण मोलकरीण सोडून जाणं, हे किती त्रासदायक असतं ,हे जेष्ठ नागरिकांना बरोबर समजते.मोलकरणींनी गंगाबाईने[काही घरी मोलकर्णींना गंगाबाई असंच म्हणायची पद्धत आहे आपण मावशी काकू बाई असं म्हणतो.]भराभरा हात चालवून लवकर काम संपवलं नाही, तर पुढे गाडी चुकणं ,ऑफिसला उशीर होणं वगैरे ची मालिका बनते. तो छळ नोकरदार महिलांना/सर्वाना/ऑफिसला देखील समजतो.

मला आठवत,"तब्येत बरी नाही एक महिना जरा स्वयंपाकाची बाई तुमची द्या ."असं सांगून एका बेबीबाईने आमची पोळ्या करणारी आणि भाजी कापायला मदत करणारी बाई पळवली.त्या कामवाली बाईला तिकडे आवडायला लागलं. तिने आमचं काम सोडून दिलं.त्या बेबीबाईंनी आमच्या आई बद्दल अभिबाईकडे खूप बडबड केली होती.ती बेबीबाई म्हणायची ," म्हाताऱ्या आईकडे कसं,फक्त काहीतरी मदत लागली ,तरच मी जाते. मजा करायला कोण आग विझवण्याच्या बंबाकडे जातात का ?मजा करायला भारी होंडा सिटी मध्ये जातं, तशी मी मजा करायला अन्य बाई बरोबर जाते. पण मदत हवी असली की त्या म्हातारी आजीकडे जाते. कारण आग विझवायची मन शांत करायची इतरांना चांगले सल्ला देण्याची आणि मदत करायची वृत्ती आहे."

असं म्हणणाऱ्या बाईला सुद्धा माझ्या आईने आमची मोलकरीण देऊन मदत केली. मला कधीकधी वाटतं आपल्याला ,आमच्या कुटुंबात, बरेच जणांना, चांगुलपणाचा आजार झाला आहे. जो आम्हाला सगळयांना घातक ठरतो.आमची ती मेड बाई सोडून गेल्यामुळे माझी नोकरी,वडिलांच आजरपण आईला काम व्हायचं नाही आईचं शुगर वाढायची.यात अधिक हाल झाले. म्हणजे खरं मोलकरीण देणे आम्हाला धोक्याचा ठरत होत.

दुसरी कामवाली बाई लावली. तिला माझ्या बहिणी माहेरी आल्या, पाहुणे आले, की राग येई. पूर्वीच्या काळी कायमच मुलींनी माहेरी येणे, भावानी सुट्टीला येणे ,काकांनी मामांनी येणं हे प्रकार असायचे. घरी पाहुणे यायचे.मंदिरात जाण्यासाठी आलेले लोक आमच्या घरीच हॉटेलचे पैसे वाचवण्यासाठी राहत असत.पाहुणे बहिणी त्यांची मुलं खेळते आणि वाढत्या वयाची होती. ती भरपूर पोळ्या खायची. तर त्या पोळ्यावलीला पोळ्या करायचं जीवावर यायचं .

ती मुद्दाम माझी ऑफिसला जायची वेळ संपल्यावर यायची. जेणे करून मी दोन पोळ्या माझ्या खायचे आणि दोन डब्याच्या अशा चार पोळ्या करून घेवुन जायचे .आपोआप कणिक मळणे हे तिचे काम पण होऊन जाई.मला घाई असायची. त्याकाळी काही ऑफिसमध्ये कॅन्टीन नसायचं आणि बाहेर जेवण पण मिळायचं नाही.अशी ती कामवाली चतुर लबाड होती. तिला बोलवायला गेले की ती बोलायची," तुमच्याकडे पाहुणे येतात.या पोरी माहेरीच पडलेले असतात. सुन तर कधी येतच नाही.सून मुंबईला मज्जा करते ईथे मुली पडलेल्या असतात."मला खूप राग येई.ते ऐकून आले की मी घरी आल्यावर आईची भांडायचे ."कशाला ही भिकारी बाई लावली आहे .सोडून द्या ..दुसरी बघ." .खरंतर मी आईला सहानुभूती दाखवायला हवी होती. की ,"आई अग मोलकरणी अशाच असतात .असू दे आणि दुसरी मुलगी कामाला बघ .एखादी बाई बघ ."

आमच्या मोठ्या वहिनी "ही तुमच्या घरीच राहील ही मुलगी हिला ठेवा आणि स्वयंपाक करेल ",असं म्हणून एक त्यांच्या नात्यातली बाई, नेहमी आमच्या घरी आणून द्यायच्या .पण ती बाई बरोबर वाटायची नाही. त्यामुळे आई त्यांना नको म्हणायची.त्यावर आमच्या वहिनी चिडचिड पण करायच्या ,"आहो काय दोन गोळे भर भाग खाईल, ती तुमच्या सेवेला होईल. राहू दे .राहू दे." पण आई त्याला तयार झाली नाही.

माझी मोठी बहीण तर नेहमी म्हणायची ,आपली मोलकरीण आणि मैत्रिण ,आपला डॉक्टर कोणाला सांगू नये.मैत्रिणी परस्पर एक होतात.मोलकरणी परस्पर पळवल्या जातात आणि डॉक्टरचं मत कलुषित केलं जातं.

मोलकरणींच अजून एक वैशिष्ट्य म्हणजे जेव्हा मालकिणीच्या हातात सत्ता असते पैसा असतो ,अंगात जोर असतो ,तेव्हा या बायका धावून धावून काम करतात . जेव्हा व्यक्ती वयस्कर होते आजारी पडते ,तिच्या घरात पूर्वीसारखा पैसा येणं बंद होतं ,,निवृती येते,मदतीला येणारी माणसं कमी होतात, शरीरातील शक्ती कमी होते तेव्हा या मोलकरणी त्यांचे खरे रंग दाखवतात . भांडायला सुरुवात करतात .काम अर्ध करतात. हळव्या माणसाला याचा त्रास होतो.लबाड मालकिण बाई असेल तर, दोन द्या, दोन घ्या करून मोलकरणीला दम देत राहते. पण आमच्या घरी आम्हाला कोणालाच, ते समजलं नाही .

आमच्या मोठ्या मावस बहिणी मला नेहमी म्हणायच्या ."तुम्हाला नोकर वागवता येत नाही .लोक नोकराला पायरीवर ठेवावं.तुम्ही त्याला चहा देता. खायला देता.घरगुती बोलता. त्याला घरच्या खाजगी गोष्टी सांगता .तो नोकर स्वतःला ग्रेट समजायला लागतो."ते खरंच होतं .आम्हाला नाही नोकर वागवता येत .आम्ही

माणुसकीने ,बरोबरीने वागवायला जातो आणि त्या बायकांच्या डोक्यावर मिरे वाटतात.आम्ही त्यांना तूप वाढतो ते नोकर बरोबरांसारखेच बघायला लागतात."

मेड इन इंडिया ,मोलकरीण, भारतीय मोलकरणी ही एक मोठी सिरीयल बनली आहे.घरोघरी मोलकरणींचे तेच प्रश्न असतात. आमच्याबरोबर एक विमला म्हणून मैत्रीण होती.तिने गावाहून मुल सांभाळापयला मोलकरीण आली होती .ती दुपारी या मुलांना खोलीत कोंडून, ड्रायव्हर बरोबर फिरायला जायची.मोलकरणीचे प्रश्न हे न संपणारे असंतात.आईचं अर्धा आयुष्य आमचं मोलकरणीच्या छळामुळे कमी झाले असेल. मोठा बंगला वाडी बाग असल्यामुळे हाताखाली भरपूर नोकर असत. तरी काही तसे मनापासून काम न करणारे होते.छोटे मुंगीचा दंश जास्ती त्रास देत असतो .तसं हाताखालच्या लोकांचे विचित्र वागणं माणसाला जास्तीत त्रास देत.चांगले नोकर आणि चांगल्या मोलकरणी या हिंदी चित्रपटात आणि मराठी मालिकात असतात.

बाकी मेड इन इंडिया हा एक मोठा प्रश्नच आहे.

**

12जुनी गाणी चलनी नाणी:

ज्येष्ठ नागरिक ही देशाची संपत्ती आहेत. नागपूरचे सुधाकर सोनार यांनी हे सिद्ध केले होते. अतिशय पद्धतशीर प्रकारे सोनार सरानी 1932 ते 1994 सालापर्यंत हिंदी आणि मराठी गाण्यांचा संग्रह केला आहे .जुन्या जमान्यातील रेडिओ, ग्रामोफोन ,ऑडिओ कॅसेट असा खजिना त्यांच्याकडे घरी आहे. मात्र ही सर्वगुणी जुनी गाणी त्यांनी mp3 फॉरमॅटमध्ये त्यांच्या संगणकामध्ये देखील साठेशवली आहेत .1932 पासूनच्या संगीत इतिहासाचा सुवर्णकाळ ऐकायला कानसेन असाल तर श्री सोनार कुटुंब तुम्हाला आनंदाची मेजवानी देत. संगीताच्या आनंद धारात चिंब भिजवतात .2100 ऑडिओ कॅसेट 16000 गाड्यांची ट्रॅक त्यात 1950 हिंदी चित्रपटावरील 14500 ट्रॅक, तर मराठी चित्रपटाचे पंधराशे ट्रॅक्स आहेत .

के एल सेगल, के सी डे, कानन देवी, नूर जहान, जोहराबाई, सुरैया, अमीर बाई कर्नाटकी ,ज्युतीका रॉय ,शमशाद बेगम गीता रा ॅय खुर्षीद या जुन्या गायकांची गाणी आहेत .चित्रपटांची गाणी, खाजगी अल्बम यामध्ये या सुवर्णकाळाच्या पुढील वाढीव टप्प्यातील, लता दीदी आशा मंगेशकर मन्ना डे मोहन्मद रफी, मुकेश तलत मेहमूद हेमंत कुमार, किशोर कुमार पंकज मलिक, जगमोहन यांनी गायलेली हिंदी गाणी आहेत. अगदी कुमार सानू ,सोनू निगम यांनी गायलेली देखील गाणि आहेत.

मराठी गाण्यांमध्ये त्या संग्रहात सुधीर फडके,लता दीदी आशाताई सुमन कल्याणपुरकर, बालगंधर्व,कुमार गंधर्व ,वसंतराव देशपांडे ,जितेंद्र अभिषेकी ,प्रभाकर कारेकर अरुण दाते ची गाणी आहेत .या संगीतामध्ये खरखर नाही. आवाजाच्या बाबतीत चढ-उतार नाही. गुणवत्ता मस्त आहे .मराठी किचकट वध

चित्रपटातील "धुंद मधुमती रात रे ना सरे" हे गीत त्यांच्याकडे हिंदी अनुवादित रूपात देखील होते.सोनार मामांचे स्मरणात गीत माला आहे. गीत कथा आणि आठवणी आहेत. 1931 सालची आलाम आराच्या "दे दो खुदा के नाम पे प्यारे "गाणे या खजिनाचे दार उघडते. 1994 सालचा, नाईंटीन फोर्टी टू लव्ह स्टोरी ने खजिना परिपूर्ण होतो. 1994 सालच्या पुढील हा खजिना बनवण्याचे काम, आपला नातू मयुरेश पूर्ण करील ,अशी आशा सुद्धा सोनार सरांना आहे .ही संग्रहित गाणी संगणकात आहेत. त्याची यादी एका पुस्तकात लिखित रूपात आहे .इतकी जुनी गाणी सुंदर आवाज सुस्थितीत संगीत अशा या खजिन्याचे सुव्यवस्थित अनुक्रमणिका सह नियोजन केले आहे. गायक ,चित्रपटाचे बोल ,अशा कोणत्याही एका परिमाणाने आपल्याला आवडते गाणे शोधून ऐकता येते .बोल/साल आठवल्यास बोल अथवा अंदाजाने साल आठवलं तर सालानुसार सुधाकर मामा ते गाणं ऐकवतात. वडील माणिक वर्मा ज्योत्स्ना ताई इत्यादींची मराठी गाणी ऐकत तेव्हा सुधाकर सोनार सर हिंदी चित्रपट गीतांचे रसिक होते. मुलांनी कोणती गाणी ऐकावी यावर बंधन घालायचा तो काळ होता .पण त्यांना आठवतं १९६५ वर्षी बिनाका गीतमाला ऐकणे साठी अभ्यास पूर्ण करून आम्हाला चार जणांची परवानगी घ्यावी लागे.(आम्हाला सुद्धा)सिनेमाला जाताना वडिलांना चोरून जावे लागे. गाणी ऐकणे ही एक मेजवानी असे. कारण घरोघरी टेप रेकॉर्डर अथवा व्हिडिओ प्लेयर्स ऑडिओ प्लेयर नव्हते .त्याकाळी रेडिओ सिलोन विविध भारती ऐकतच बालक मोठा होई. हेलन फियरलेस नादिया, मास्टर भगवान मेहमूद यांची गाणी तरुणांनी गावी गुणगुणावी हे त्याकाळी पालकांना आवडत नसे. पालक समजत असत की हा मुलगा बिघडेल की काय? अभ्यासाच्या छोट्या छोट्या गोष्टीतील निर्मळ आनंद घेण्याच्या जागतिकीकरणच्या पूर्वीच्या दिवसांच्या, चित्रपटांच्या गायकांच्या, चित्रपट प्रसंगांच्या, स्पष्ट आठवणी सोनार सर सांगतात. त्याकाळी ही

जुनी गाणी म्हणजे मानसोपचारच होता .आनंद देणारे प्रेम शिकवणारे सावरायला मदत करणारे भाव या गाण्यात होते, असे मला आजही वाटते.

सोनार सरांनी रेल्वेमधून सेवानिवृत्ती घेतल्यानंतर संगणक चालवायचे ,क्लास लावून शिक्षण घेतले. त्यांनी या गीते संग्रहाचे स्वतः संगणकीकरण केले आहे. त्यांच्या मेंदूत खूप गाणी शब्द गायकांची कलाकारांची नावे आजही स्पष्ट कोरलेली होती. संगीत दिग्दर्शक गीतकार यांच्या नावासह संगणकावर सुव्यवस्थितपणे टाईप करून ते गाणी शोधतात ,ऐकवतात. काम अडु नये म्हणून ,आवड आहे म्हणून इंटरनेट शिवाय वापरता येतील अशा युजर फ्रेंडली मार्गाने गाणी साठवली आहेत.

सहलींना गेल्यावर मित्र आप्तेष्टांकडून देखील सर जुनी गीते मिळवत असत .जुन्या कलाकारांच्या आठवणी सांगताना त्यांच्या डोळ्यात वेगळीच चमक येई. आलम आराच्या काळापासून ईतिहास आज सोनार सरांच्या मेंदूत लिहिलेला आहे.1966 पंडित जसराज यांनी सह्याद्री की लडकी चित्रपटासाठी गायलेले दुर्मिळ गाणे तलत मेहमुदच्या गैर फिल्मी गजला आधुनिक काळातील जगजीत सिंग चित्रा सिंह यांच्या गजला, गीत तसेच काही उडत्या चालीची 1994 सालापर्यंतची गाणी संग्रहात आहे. नागपूर यु सी एम चॅनेल तर्फे मुलाखत घ्यायला आलेल्या कलाकारांनी सोनार सरांना नमस्कार केला होता.येतील गाणी तर मला माहित देखील नाही ,अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली. तुमच्याकडे जवळजवळ सर्व गाणी आहेत, असे स्तुती सुमन बऱ्याच जणांनी वाहिले .तरीही ते अतिशय नम्रपणे 99% गाणी आहेत .त्या काळातील संग्रहात नसलेली गाणी आठवल्यास कळवा ,मी समाविष्ट करीन, असे नम्र उत्तर देत. त्यातील त्यांच्याकडे गाणी ऐकायला आलेला रसिक आराम खुर्चीवर डोळे मिटून ती 1934 सालची गाणी ऐकून रडायला लागला होता किंवा जिंदगी की राहो मे मजबूर हो गये चित्रपट साथ साथ चे गाणे ऐकताना माझे डोळे देखील पाणवले.

हल्ली आपण गाणी व्हिडिओ रूपात पाहतो. ग्लॅमर उपभोक्ता,गाण जगत नाही .संगीत मनात उतरवत मुरवत नाही. बाबुल मोरा नैहर छुटो जाये, जब दील ही टूट गया हम जिके क्या करेंगे,अशा के एल सैगलच्या गाण्यापासून जुनी चिरतरुण, विरह गीत इतर गीत ,ऐकून भावना उचंबळून येतात. विनम्र हळवे प्रेम, नाजूक नातेसंबंध सांगणारे शब्द असलेली, हळुवार पार्श्व संगीत असलेली गाणी ऐकण्यात तीन तास कसे जातात कळतच नाही. 1932 ते 94 हा काळातील संगीत ही श्रेष्ठ कला साधना आहे .तो संगीताचा सुवर्णकाळ होता. चांगल्या ला चांगलं म्हणणं चांगलं असत.वाईटाला वाईट म्हणणं चांगलं ,वाईटाला चांगलं म्हणणं म्हणजे वाईट असते.चांगल्याला वाईट म्हणणं म्हणजे वाईट असते.ज्यामुळे जी सोन्यासारखी गाणी होती त्यांचे मोल सोनार सरांनी केले आहे. सोनार सर रत्नपारखी म्हणायचे .या गीतांचा वारसा जतन केला आहे. संवेदनशील मनाला स्पर्श करणारी तशी त्या काळासारखी गाणी हल्ली फार कमी बनतात .

चांदी की दिवार न तोडी प्यार भरा दिल तोड गया :चित्रपट विश्वास

राही मनवा दुख की चिंता क्यों:चित्रपट दोस्ती सावन के झुले पडे सैंयाजी हमे तुम कहा भूले :प्यार की प्यास

गुजरा हुआ जमाना आता नही दुबारा :शिरी फरहाद. ती छान छान मस्त गाणी सोनार सरांकडे आहेत.

ही स्वरांची जादू फक्त त्यांनी मित्र-मैत्रिणी कुटुंबीय यांच्यासाठी म्हणून रंजनासाठी पेटीत साठवली आहेत. ती mp3 मोड मध्ये बदलली असली तरी सोनार सर कुणालाही गुणवत्ता टिकून राहावी ,यासाठी कॉपी करून देत नाही. ही जुनी गाणी आजही चलनी नाणी आहेत.

यासह पण जुन्या पोस्ट कार्ड यांचा देखील संग्रह सोनार सरांकडे आहे .नाण्यांमध्ये निजाम कालीन ,मध्ययुगीन ,मराठा कालीन, परकीय चलनातील नाणि त्यांच्या संग्रही आहेत .1854 सालचाश ईस्ट इंडिया कंपनीचा पाव आण्याचे पोस्टाचे तिकीट देखील त्यांच्या संग्रही आहे. पोस्टाच्या तिकिटांचा देखील संग्रह त्यांनी केला आहे. स्वतंत्र भारतातील १९४७ सालचेही एक आण्याचे तिकीट त्यांच्याकडे आहे.तर 1960 सालचे फर्स्ट डे कव्हर 15 पैसे किमतीचे पोस्टाचे पाकीट जपून ठेवले आहे. 1830 1840 18 15 1952 अशा सालची नाणी आहेत. जेष्ठ नागरिकांच्या एका प्रदर्शनामध्ये या पोस्टाची तिकीट नाणी यांच प्रदर्शन सुधाकर सोनार यांनी केलं होतं. ११६० फर्स्ट डे कव्हर 660 नाणी 669 तिकीट इत्यादी आहेत. नागपूर येथे जनरल पोस्ट ऑफिसला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भरलेल्या फिलेटली प्रदर्शनात श्री सोनार सराना रौप्य पदक मिळाले होते. सामान्यतः चार लोकांसारखे जीवन आपण जगतो आणि एके दिवशी काळाच्या पडद्यावर जातो .मागे राहते आपले कार्य !आपले नाव! आपले छंद !आपला ठेवा !आपली कला! लेख, आपले संग्रहित दुर्मिळ काही, मागे उरते. गाण्यांचा खजिना जपणारे सरांसारखे कलाकार चिरकाल मनात राहतात .

जन पळभर म्हणतील हाय हाय ,मी जाता म्हणतील कार्य काय ?

असा प्रश्न सुधाकर सोनार सरांबाबत आलाच नाही. येणार देखील नाही.हा संग्रह,सचिनदादा आणि वैशाली जवळ आहे(मुलगा आणि सून) संग्रह ते नियमित प्रदर्शनात ठेवतात (रमण सायन्स सेंटर नागपुरला)

**

आमची मुंबई :

आमची मुंबई,अस सांगताना मला फार अभिमान असतो.मी हसते आणि एक मैत्रीण नेहमी मला म्हणते, " ठाण्याची लोकं फार लबाड आहेत. सोय असेल तेव्हा स्वतः ला मुंबईत,अन्यवेळी मुंबई बाहेर असं ठरवतात.“

पण एकूणच मुंबईचा आकर्षण माणसाला नेहमीच असतं. मौज मजा करणे यासाठी जीवाची मुंबई करणे हा शब्द त्यामुळेच तयार झाला असावा. दाजीबा मुंबई बघायची आहे दाजीबा मुंबई बघायची आहे असं गाणं सुद्धा असतं. माझी ताई पूर्वीच्या काळचे सिनेमे बघितले की तो जोपर्यंत नायक खेड्यात असायचा तोपर्यंत खूप कंटाळून बसायची.नायक नोकरीं शोधू लागला आणि तो मुंबईला गेला की तिला खूप आनंद व्हायचा.मुंबईची मजा, सीन सिनरी, तो रस्त्यावरच्या गाड्यांचा गोंधळ उंच उंच इमारती यासाठी तिला मुंबई च खूप आकर्षण वाटायचं.

लोकलचा प्रवास ,ती गर्दी, तेव्हाचे रूप, घामट हवा कुणी कुणाला न विचारन, मानसन्मान फारसा न देणे, या सर्व अनोळखी असलेल्या, तरी कवेत घेणाऱ्या अशा वातावरणात मुंबईकर रमून जातो. नोकरीत मुंबई ला जायचा खूप त्रास होत असला तरी मला मुंबई पोस्टिंग आवडायचं. मुंबईचा ते सुंदर स्थापत्यकला असलेलं छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस मला जणू बोलवायचं. फ्लोरा फॉउंटन पासून सगळीकडे पुढे मुंबई समुद्रासह सगळी खूप सुंदर आहे.

आनंद चित्रपटात राजेश खन्ना म्हणतो बाबूमोशाय जिना तो मुंबई में, मरणा तो मुंबई मे!

इंदिरा गाथा:

भिंत होऊन, छप्पर होऊन,गुपितं राखली, छिद्रं झाकली;

पणती, वात, तेल होऊन,कोनेकोपरे उजळून टाकले.

सून झाले, बायको झाले,आई झाले, सासू झाले,

माझी मला हरवून बसले.

आता सोंगे पुरे झाली;सारी ओझी जड झाली.

उतरून ठेवून आता तरी

माझी मला शोधू दे;तुकडे तुकडे जमवू दे.

विशाल काही पुजू दे.मोकळा श्वास घेऊ दे.

श्वास दिला, त्याचा ध्यास,घेत घेत जाऊ दे!-

इंदिरा संत

तस या मुंबई महानगरीत असं झोकून देऊन काम करत राहावं लागतं. नातेवाईकांकडून टोले खाऊ नये पण ते नातेवाईक असणं ते महत्त्वाचं वाटतंजशी काही ती मुंबईची उपनगर आहेत. मैत्री आणि नातेवाईक यांच्यात फारसं असं अंतर असणं,बदल होणे याच कारण नसतं. पण एक वेगळीच जाणीव नातेवाईक आणि मित्र या दोन गोष्टींमध्ये येते.सर्व धडपडणारे ,गरीब किंवा श्रीमंत मुंबईकर बनतात.ठाणेकर आणि मुंबईकर हे एकमेकांचे नातेवाईक नसले तरी सगळे बृहन मुंबईकर एकमेकांचे मित्रच असतात. आमची मुंबई ही अशीच छान आहे.

***

17आ आवाजाचा:

दैनंदिन जीवनात स्वस्त म्हणून वारंवार वापरला जाणारा आवाज हा महत्त्वाचा घटक असतो. बाळ अथवा मूल जन्मताच रडते. तो आवाजाचा जन्म आहे.ते रडणे ते शेवटची घरघर लागेपर्यंतची 80 वर्ष ही गोष्ट ,(आवाज)वापरली जाते. जर लक्ष दिल तर बोलुन व्यवसाय मिळतो किंवा आहे त्या व्यवसायात आवाज उपयोगी होतो. जीवनात गुरूंचे आठवणीने आपण भाऊक होतो. कारण की गुरूंनी वाट दाखवली असते आणि बोलायचं कसं हे शिकवलेलं असतं .मी कलाक्षेत्रात आले. आवाज कुणाचा या पुस्तकाचे लेखक सांगतात ,की कुणीतरी आवाज दोष दाखवायला हवा. आवाज साधना ही शास्त्र असते. मात्र आवाज हवा .मुका बोलू शकत नाही .गळ्यातून येणारा ध्वनी आवाज ठरतो संस्कारातून संस्कृती बनते. आणि रिपीटेशनने बोलता येते .भांडी वाजूनी येतो तो नाद! शीलातून येते की शैली आणि तोंडातून येते ते बोलणे. बोलणे हे काम शारीरिक पातळीवर करावे लागते. आवाजात भावना हव्या. फुफसात शक्ती हवी. जीभ गाल ओठ मन जोडावेत. स्वर केंद्र हे मनात /मेंदूत असत.नी घशात स्वरयंत्र असतं . स्वरयंत्र मेंदू यांच्या संयोगाने आवाज बनतो. मन सांगते तसा आवाज बदलतो. ज्याच्याशी बोलावसं वाटतं त्याच्याशी बोलताना आवाज आतुर उत्सुक बनतो .

माणूस गप्प बसण्यासाठी जन्माला आला नाही. काहीतरी सुखदुःखाचा पाढा वाचतो स्वगत देखील आपण इतरांना सांगतो. आपला त्रास अनुभवून आपण इतरांना सांगतो म्हणजे बोलतो .इतर वेळी आपण वेगळे बोलतो कार्यक्रमात वेगळे सुधारित बोलतो. आवाज लावतो ,पण बोलतो .

1 आवाजाचा व्हॉल्युम लहान मोठा करता येतो वाहत्या रस्त्याजवळ घर असलेल्या व्यक्ती मोठ्याने बोलते. कारण सवय लागते. वेगवेगळे प्रकारचे बोलता यायला हवे. आवाज कमी जास्त करता यायला हवा .आवश्यक तिथेच आवाज चढवणे ,बाकी वेळी हळूच बोलावे .आपल्या आवाजाचा अभिमान ठेवावा. गुणवत्तापूर्वक बदल करावा. आवाज पातळ जबरदस्त गंभीर खर्जातला, हवा तसा करता यावा .

2 पट्टी :तीन सप्तकात आवाज वापरता येतो. मंद मध्ये आणि तीव्र सप्तकात आवाज येतो. पट्टी पीच पट्टी चुकली की द्यायचा संदेश चुकीचा जाऊ शकतो .

3 टोन साडी च पोत किंवा टेक्स्चर ,स्पर्श कसा वाटेल ,तस आवाजाचा असत .टोन ठीक हवा 4 टेम्पो :भाषणाचा वेग ,टिप्पेला आवाज लागणे, हे टेम्पोत येतं. हे आवाज बदलवत.

4 स्पीड अल्पशिक्षित बरोबर/बालकां बरोबर बोलताना, भाषण वेग कमी ठेवावा .जिथे दिसत नाही म्हणजे ओन्ली ऑडिओ भाषण आहे ,तिथे पण वेग कमी ठेवावा .कारण ओठांची हालचाल बोलताना दिसत नसत.तर वेग कमी ठेवावा लागतो.

5 किती सांगायचे मला म्हणत माणूस भराभर बोलू लागतो. पण वेळ होऊ ठेवा वेग हळु ठेवला तर आवाज छान घुमतो .सगळेच आपल्या आवाजात एक सुरीपणे बोलत नाहीत. भूमिका व्यवसायानुसार आवाज ठरवावा.

6 भावना: भावना विहीन आवाज लोकांपर्यंत पोहोचत नाही .भावना किती घालाव्या ?आपल्या बोलण्यात चवीपुरती भावना घालाव्या. पोट टिडकिने बोलून तुम्हालाच त्रास होईल .राग खेद प्रेम आवाजातून व्यक्त करा.

7 श्वास: श्वास नीट घ्या. प्राणायाम करा पोटाने श्वास घ्या .निसर्गाने ते शिकवलं आहे.भरपूर श्वास घ्या .दमदार श्वास चांगले व्हावे. दमछाक नको.

8 जीभ जीभ वळवा.जीभ काव्यशास्त्र विनोद सुख देते गळ्यातून येणाऱ्या ध्वनीला आकार जीभ देते .श्लोक म्हणा. शब्द नीट बोला. गालामुळे आवाजात फरक होतो. ओठ चांगले हवे .वयाने देखील आवाजात फरक पडतो. बोलताना जीभ बाहेर दिसणे हा फाऊल असतो. बोलताना अप्रतिम सुंदर सुरेख छान असे शब्द वापरा. कुणाला जाड थकलेला आजारी बारीक रडका म्हणू नका .मनातून लोकं नाव ठेवणार याचा स्वीकार करा.कामाला ऑडिओ व्हिज्युअल ने मदत होते. अभ्यास लक्षात राहतो. कार्यक्रम करताना घाबरायचं नाही. फार फार तर काय होईल, कार्यक्रम पडेल ,त्याचा ताण घेऊन उपयोग नाही.ताणाने आवाज खराब होईल.ज्याचा आवाज ऐकला जातो ,त्याचे नाव होते. लेखकाने स्वतः वाचावे ,कारण लोकांना गोष्टी ऐकायला आवडतं. मुलाखत घ्यावी म्हणजे अल्प प्रमाणातव्यक्ती समजते. ती एक औपचारिक विचारपूस असते.बोलण्याला पर्याय नाही.कथा सांगण्यासाठी काही गोष्टीत बदल करावे लागतात. गमतीसाठी आश्चर्यकारक काही त्यात हवे म्हणून घालावे लागते. जाहिरातीची शेवटी जे बोललं जातं तो व्हाईस ओवर असतो .बोलणे हे अर्धे भेटणे अस.ते आवाज जपा .फोनवर बोलून अर्धी भेट होते . आवाज आवाज !आवाज ऐकू जायला हवा.

असा आ आवाजाचा!

**

आनंदसरी :

खूप गरम होत असताना पाऊसधारा कोसळली की छान वाटतं . या पावसाच्या सरी मग आनंद सरी वाटतात. अगदी वळवाचा पाऊस असला तरीही माणूस चुकचुकत का होईना त्या पाऊस धारेचे कौतुक करतो. पावसाच्या धारा ही संकल्पना खूप सुंदर वाटते .घराच्या छतावर किंवा पत्र्यावर टप टप टप टप घुंगराच्या आवाजा सारखे आवाज करणारे थेंब टपटपत असतात. पावसाच्या थेंबाचा आवाज ,कल्लोळ करणारी रेनकोट घालून रस्त्यावर जाणारी लहान मुलं ,एका छत्रीत भिजणारे तरुण-तरुणी ,रस्त्यावर साचलेल्या पाण्याच्या पुळणीमध्ये कागदी होड्या टाकणारी बालक दिसू लागतात एरवी तापणाऱ्या धरणीवर ,आता पाऊस आल्यामुळे उमलून येणारा संतोषी भाव आणि सुंदर असा मातीचा वास बघा. पावसाच्या धारा म्हटल्यावर काय काय आठवलं.

मे महिना हा सूर्यनारायणाचा माथ्यावरून उष्णता देण्याचा आणि वातावरण तापण्याची महिना असतो. किरकोळ वळवाच्या सरी पडल्या ,तरीही गर्मी काही कमी होत नसते. खरं तर पावसाच्या धारा म्हणण्यापेक्षा ,घामाच्या धारा संगी लागलेल्या असतात .एसीतून बाहेर दोन मिनिटं सुद्धा चालत नाही आणि भयंकर आळस येतो.चांगल्या चांगल्या कार्यक्रमाला सुद्धा,बरे कपडे घालून जायची इच्छा होत नाही.शरीर सुकत कारण गर्मी खूप असते.

अशावेळी पावसाच्या धारा ची वाट प्रत्येकच व्यक्ती बघत असते. कल्पनेत आठवणीत विचारात आपण पावसाच्या धारा ची वाट बघत असतो.

आला आला वारा संगे पावसाच्या धारा

पाठवणी करा सया निघाल्या सासुरा

नव्या नवतीचं बाई लकाकतं रूप

माखलं गं ऊन जणू हळदीचा लेप

ओठी हसू पापणीत आसवांचा झरा

आजवरी यांना किती जपलं जपलं

काळजाचं पानी किती शिपलं शिपलं

चेतवून प्राण यांना दिला ग उबारा

वेगळी माती आता ग वेगळी दुनिया

आभाळाची माया बाई करून किमया

फुलंल बाई पावसानं मुलुख ग सारा!गीत

किती सुंदर शब्दात या कवींनी हे पाऊस प्रेम सगळं लिहिलं आहे. पावसाळी सहलीसाठी कुठे कुठे कसे जायचे ते प्लॅन कर कसे जायचे ? असे सांगणारे फोन येतात शरीराला झेपत नाही पण मन मात्र पावसाच्या कल्पनेने देखील हिरवं होतं.

" तू जाणार होतीस ना मी पण तुमच्या सोबत येते.मला आवडते पावसाळी सहल उद्यापासून ही बर्याच ठिकाणी मूसळधार पाऊस पडणार आहे.वयस्कर लोकांना घ्यायला नको. निसरडे झाले असं असतं. पडायची भीती असते .येताना परत एकटे यायचे tension येते.एकट फिरणे बरोबर नाही. सोबत असलीच पाहिजे. असे

एवढं भावनिक होऊ नये. हे वय आनंदाने जगायचं आहे. पाऊस सांगतो,"एक एक क्षण आनंदाने जग अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठी जग!"

बाहेरगावी एकटे जाणे रिस्की आहे.जुहूला समुद्राच्या लाटा बघायला जावे . जरा पावसाचा अंदाज घेऊन जाऊ. असे फोन येतात.

अपत्य सांगतात," आता बाहेरगावची देवदर्शन,सहली विचारपूर्वकच करायची वेळ येते. त्यापेक्षा मन साधना करावी. मुंबईतील प्रती देवस्थान ,पिकनिक स्थान बघावी."

मग खिडकीतूनच बाहेर पाऊस बघत माणसं निवांत बसतात.पावसाच्या धारा आल्यावर, धरणीला झालेला आनंद आणि एक नवं रूप, नव्हाळी हिरवी चादर पांगरल्यासारखा भाव निसर्गात येते .सहा ऋतूंचे सान सोहळे त्यातच भान हरावे असे म्हणतात, ते उगीच नव्हे.पावसाळा हा सगळ्यात लाडका ऋतू असतो. सृजनाचा ऋतू असतो .एरवी रखरखीत दिसणाऱ्या शहरी सडकेवर सुद्धा हिरवळ दिसते. कुठेतरी कानाकोपऱ्यात एखादं झाड उमटते. झाडे लावा झाडे जगवा सांगायची गरज आहे कारण ते माणसाला समजत नाही .पण निसर्ग मात्र यावेळी भरपूर झाडे लावतो

.

बीजे अंकुरे अंकुरे धरित्रीच्या पोटात! असं सगळीकडे भिजुन ओल आलेली असते. फक्त आपण ती झाड जगवणं आवश्यक आहे.आपल्या शरीरात सुद्धा एक कोवळा अंकुर असतो.मनाला जरा अशा जुन्या गोष्टींना, भूतकाळाला टाकून ,भविष्याकडे वळण्याचा एक आदेश असतो .पावसाच्या धारा तो आदेश जागृत करतात. निसर्ग कितीही कठीण परिस्थिती आली तर वृक्ष कठोर न होण्याचा आणि सृजनाचा संदेश देतो.

असं झालं तर तसं होईल आपण असं करू या म्हणजे असा फायदा मिळेल. असा बेत करून ,आपण सगळे विचारपूर्वक बेत रचत असतो.पण निसर्ग बघा निरपेक्षपणे नेमच येतो पावसाळा ,असा नियमित पावसाळा,धारा च्या रूपाने,

पृथ्वीची दग्धता शांत करतो .तप्त पृथ्वी शांत करतो आणि त्याच पृथ्वीच्या पृष्ठभागातून काळ्या मातीतून अंकुर उमलवतो .आपल्याही जीवनात असा अंकुर उमलेल याची आपल्याला आशा सुद्धा वाटत नसते.

बऱ्याचदा जुनी नाती खराब होतात .जुन्या मैत्रिणी तुटतात जुनी घर बदलावी लागतात स्थलांतर होतं.अशा वेळी मानव मळभात अडकून पडलेला असतो .भूतकाळाचं वजन आपल्या मनावर घेऊन वावरत असतो.

कोणीही व्यक्ती नवीन नात्यात उतरताना असा विचार करत नाही की हे पण नातं पुढे तुटेल .उलट त्यावेळी असा विचार करते की जुन्या नात्यापेक्षाही हे नातं अधिक चांगल्या प्रकारे रमेल, फुलेल, उमलेल आणि दीर्घकाळ टिकून राहील. कितीही झाडांची कत्तल होत असली तरी पावसाळ्यात कानाकोपऱ्यात अगदी खडकावर सुद्धा उगवणारे अंकुर ,माणसाला हा संदेश देतात की अंतरीचा ओलावा टिकून ठेव .

पाऊस सांगतो जुन झटकून नवीन व्हा.

पावसाळ्यात येणारे आजार देखील जुनं शरीरावरचं पेशींचा बाह्य आवरण झटकून टाक असं म्हणतात .

हिरवे पिवळे लाल पक्षी,

आहे मजा बघण्यात त्या

सुंदर सुंदर स्वप्न माझी

आहे मजा लिहिण्यात या

समुद्र पक्षी गगनलक्षी

सागरी लाटा निळ्या

सांज किरणे सोनियाची

जुळून तुटती साखळ्या

उंच माड पाठीशी उभा

संथ झुलवे जावळे

संगतीला माझ्या सखी तू

संगीत मंद सावळे :संग्रहीत

पुढे पुढे तर नको नको रे पावसा असा वेळी धिंगाणा असं म्हणायची वेळ येते बरं सध्या जरा श्रावणातलाच रिमझिम बरसतोय तोपर्यंतच मजा घ्या या पावसाकडे उत्सुकतेने बघा. पावसाच्या धारा आल्या आहेत. चिकी मिकी ,चिकी मिकी ,टप टप, झमझम, असे आवाज करत तावदानांवर खिडक्यांवर पत्र्यांवर आवाज करत आहेत. ज्याचा ऑर्केस्ट्रा सुरात वाजवत आहेत. त्या आनंद सरींच्या आनंदात भिजून चिंब व्हा नहा खुश आनंदी रहा.

**

सैनिक हो तुमच्यासाठी :

भारतीय नागरिकांचा ,घास रोज अडतो ओठी,सैनिक हो तुमच्यासाठी! असे एक लोकप्रिय असलेले ,सैनिकांबद्दल आदर व्यक्त करणारे गीत होतं. सैनिकांबद्दल आदर व सन्मान माझ्या मनात निर्माण झाला तेव्हा मी जेमतेम दोन वर्षाची वगैरे असेल युध्द:1962 साली,चीनची युद्ध झालं .तेव्हा वडील आम्हा सर्व भावंडांना युद्धाच्या कथा सांगत असत.

थोडे कळायला लागल्यावर 'टेल ऑफ टू सिटीज' ची महायुद्धाच्या काळाची गोष्ट ते रंगून सांगत .मी त्यांच्या मांडीवर बसून त्यांच्या तोंडाकडे बघत त्यांचे डोळे पुसत असे. 1965 साली भारत आणि पाकिस्तान युद्ध झालं. घमासान युद्धानंतर ताश्कंद करार झाला. वाईट असे कि त्याचवेळी लाल बहादूर शास्त्री यांचे अकाली निधन झाले .

जय जवान जय किसान !या नाऱ्याचे शिल्पकार तेच होते.

त्यानंतर 1972 साली भारत आणि पाकिस्तानचे दुसरे युद्ध झाले आणि स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली. अखंड भारताचा एक तुकडा अलग झाला. त्यावेळी शाळेत आमच्या मुख्याध्यापिकाबाईनी भारत देशाच्या उत्तर भागाचा मॅप मोठा करून आणला होता आणि युद्धाची प्रगती रोज आम्हाला सांगत असत .

'युद्धस्य कथा रम्या' या भावनेने आम्ही युद्धाबद्दलच्या, भारतीय सैनिकांच्या शौर्य कथा ऐकल्या. त्या ऐकतच मोठे झालो आज वयाच्या ,साठी/ 65 नंतर युद्धाचे मानवीय रूप लक्षात घेता, युद्ध ही किती दुःखद घटना आहे हे जाणवतं.

1971 सालच्या युद्धात माझा चुलत भाऊ आर्मित गेला होता. त्याच्या शिस्तीचे ,गणवेशाचे आम्हाला खूपच कौतुक वाटत असे. 1981 साली दुसरा भाऊ हवाई दलात गेला आणि मी सैनिकांच्या बद्दल त्यांच्यातली एकच बनून विचार करू लागले.

कारगिल:नंतर भाचा सातारा सैनिक स्कूलमध्ये शिकला व नंतर सैन्य दलात गेला .1999 कारगिल युद्धाचे शंभर दिवस या भारत देशावर फारच मोठे संकट घेऊन आले होते .कारगिल युद्धाच्या वेळी जेव्हा सेना बॉर्डरवर युद्ध करत होती ,तेव्हा आम्ही सर्वजण चिंतित होतो.कारण कारगिल भागांमध्ये ,घुसखोरीने सुरु झालेले युद्धात, आमच्या जवळच्या व्यक्तीचा सहवास सहभाग होता .

मे1999,काही टीव्ही चॅनल्सवर क्रिकेटची मॅच दाखवली जात होती .संताप यायचा .वाटायचं माझी जवळची व्यक्ती युद्धभूमीवर असताना, माझे मन काळजीने व्याकुळ असताना, इतर लोक मॅचची मजा घेतात ?पण इतरांना त्याची परवा नसायची.

1999नंतर:त्या कारगिल युद्धाने आपल्या देशातील जनता सैनिकांबद्दल अधिक विचार करू लागली. युद्ध भूमीवरील सैनिक कुणासाठी लढतो ?भारत देशातील सर्व सामान्यांचे आयुष्य सुरळीत चालू राहावे म्हणूनच तर तो अहोरात्र सीमेवर पहारा देत असतो .आपण आपल्या कुटुंबीयांबद्दल बरोबर सुखात राहावे, म्हणून तो आपल्या कुटुंबीयांना सोडून युद्धभूमीवर आणि आपल्या बॉर्डरवर लढत असतो .त्या सैनिकांचा त्याग ,सैनिकांचे देश प्रेम, देशसेवा ,कर्तव्य पुर्ती आपल्या सर्वांसाठी आहे. आपल्या देशाच्या रक्षणासाठी ते युद्धाची पूर्वतयारी करतात. वेळप्रसंगी युद्ध करतात.

हवामान:सुट्टीला चार दिवस काश्मीर सहलीला जायचं आपण जामा निमा करून जातो .बर्फाच्छादित चित्रे दुरून पाहून ,काही काळ त्याचात रम तो,लगेच काढता पाय घेतो .सियाचीन बॉर्डरवर, रोहटांक पास मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये,अमरनाथ यात्रेच्या दरम्यान सुरक्षा देणेआवश्यकअसते ,आपले सैनिक थंडी वाऱ्याची पर्वा न करता भारत मातेची सेवा करतात .

ए मेरे वतन के लोगो जरा आँख में भर लो पानी,

थी खून से लथपत काया!

फिर भी बंदूक उठा के ,

दस दस को एक ने मारा !असा गुणी, शूर, उमदा सैनिक, हे सैनिकी करिअर स्वीकारतो. सैनिक सीमेवर कष्ट करतो आहे म्हणून आपण सुरक्षित आहोत. सैनिकाला पण आपल्या बहिणी भावंडात राहायला आवडतं .त्याला पण आपल्या मुलाबाळांची काळजी असते. सैनिकाचे घरी त्याचे वडील आजारी असताना,सैनिकांचे मन देखील आपल्या आजारी वडिलांकडे ,गावातील आपल्या झोपडीकडे ,घुटमळत असते .

देशासाठी त्याग करताना, त्यांच्या आठवणीत, गावातील त्यांच्या शेतकरी,कामकरी अथवा अन्य वृद्ध आई-वडील असतात .आठवणी फेर धरत असतात .आज त्यांच्या ,या सैनिकांच्या या कष्टामुळे, त्यागामुळे ,आपला देश सुरक्षित आहे आणि आपण सुरक्षित जनजीवन जगतो आहोत. कारगिल वॉर ,ऑपरेशन सिंदूर इतकंच काय देशातील नैसर्गिक संकटांच्या वेळी देखील आपले सैनिक मेहनत करून देश वाचवासियांचे रक्षण करत असतात .मी नोकरीवर कुलाबा येथे जायचे ,तेव्हा सैन्य दलातील बरेच लोक कधी बस मध्ये कधी लोकल गाडीत दिसत असत. आजही कधी सैनिक दिसले ना ,तरी माझे मन आदराने भरून येते .या

सैनिकांना नमस्ते असं म्हणून नुसतं बोलायला तरी काय हरकत आहे?त्या भारतीय सैनिकांना मनःपूर्वक सलाम!सैनिकाला सलाम करायला 15 ऑगस्ट किंवा 26 जानेवारी ची वाट कशाला बघायला पाहिजे?

आजच म्हणू या जय जवान ,जय किसान. त्यापलीकडेही जाऊन मी तर म्हणते, युद्ध ही होऊच नयेत .मानवी मनात सुरू होऊन अहंकाराच्या टकरावामुळे कुणाच्यातरी भलट्याच्याच महत्वकांक्षी मुळे युद्धभूमीवर लढली जाणारी ही युद्ध होऊच नाही .कारण त्या युद्धात प्राणहानी होते आणि जगातील सगळ्यात अनमोल गोष्ट जी असते ती असते माणसाचा प्राण !माणुसकीनेच युद्धाचा विचार करावा आणि युद्धभूमीवर लढणाऱ्या आपल्या सैनिकांसाठी रोज दुवा, दीर्घायुष्याचे मागणे मागावे .

परमेश्वराकडे सर्व जनतेने देशभक्ती मागावी.

जय जवान ,जय किसान!

**

आई कुणा म्हणू मी

महाभारत व मातृत्व :पाच पुत्रांची माता असूनही कुंतीमाता आपल्या बालपणी टाकून दिलेल्या सहाव्या पुत्रा बद्दल सूर्यपुत्र कर्णा बद्दल हळवी राहते व त्या सहाव्या पुत्राच्या आठवणीने दुःखाने एकांतात अश्रू राहते.

अंध पतीबरोबर निष्ठा म्हणून ऐच्छिक अंधत्व स्वीकारलेली माता, आयुष्यभर डोळ्यावर पट्टी बांधून वावरलेली गांधारी पुत्राच्या प्रेमामुळे काही काळ डोळ्यावरची पट्टी काढायला तयार होते.

रामायण व आई :आपल्या मुलाला राज्य मिळावं म्हणून कैकैयी (आई) दुष्टपणाही दाखवते. त्यात आईची महतीच दिसते.'कुपुत्र जायत क्वचित पी कुमातानभवेत'

दत्तक दत्तक पुत्राना माया देणारी माता सुद्धा पूजनीय ठरते. म्हणून तर देवकी श्रीकृष्ण यशोदा अशा मातृमहतीच्या कथा लोकप्रिय ठरतात.श्यामची आई, माती माय ,एका आईची डायरी ,अशा पुस्तकाचे लेखन गाजत असतं. माझ्या एका कथासंग्रहाचे नाव पण आहे एका आईची गोष्ट!

पुत्र व्हावा ऐसा :पुत्र कसा असेल याच्यावरून आईची ओळख ठरते .पिता पुत्रांच्या भांडणात कन्या पित्याच्या भांडणात शेवटी आई मध्यस्थी करते .नवरा बायकोच्या भांडणात सुद्धा शेवटी नवरा म्हणतो 'माझे आई बास' म्हणजे प्रश्न संपवायचे सामर्थ्य ते आई शब्दात असतं.आई आई ग :ठेच लागून पडताना माणूस म्हणतो आई आई ग !म्हणजे वेदनेच्या वेळी आई आठवते. भय वाटल्यावर आपण म्हणतो बापरे !कारण भयाच्या वेळी वडील आठवतात.

ययाती:ययाती ह्या पुस्तकात सुद्धा एक लोकांना उपदेश करणारे साधू महाराज मातृशोकांनी विव्हळ झालेले असतात एकांतात बसलेले दाखवल्याची उदाहरणे आहेत.वारसा:सुसंस्काराचा वारसा पुढच्या पिढीला देण्याचे काम माताच करू . शेवटी म्हणतात जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारीआईच्या मृत्यूनंतर माळेचे मोती सर्वत्र पसरावे तसे कुटुंब विस्कटते. त्या घराच्या दारात उभे राहून वाट बघायला स्वागत करायला आई राहत नाही .असेच काही सचित्र बऱ्याच घरी घडतं .स्वतः घामागून होऊन पदराने तोंड पुसत असताना स्वतः पाणी पिण्याचे ऐवजी मला पाणी देणारी आई आता नाही .माझ्या आजारपणात जागणारी त्यागमूर्ती आई नाही .विचार करा मुलाचा लहरीपणा तिरसट पण आई व्यतिरिक्त कोणी सहन करेल का?

वंदन:त्यात त्याग मूर्तीच्या आईचं वंदन करायला मातृदिनाची वाट कशाला बघता?फोन उचला आईशी बोला. आईला भेटायला जा. त्या थरथरणाऱ्या सुरकुतलेल्या थकलेल्या हातांना बरं वाटेल. कृतज्ञतेने ती तृप्त होईल.म्हणूनच जगातील सर्व मातांना या मातृदिनाला मी वंदन करते.अगदी शाळकरी निबंध वाटतो का ?हा बघा आईचा विषय काढतात मी पण लहान मूल होऊन गेले.

आश्रमातील?मातृ-महिमा इतका असताना मग वृद्धाश्रमात निश्वास सोडणाऱ्या या माता कोणाच्या आहेत ?या माता सुद्धा आपल्यातल्याच आहेत.आपल्या सुपुत्र अथवा सुकन्यांना अधिक त्रास नको.दुःखदायक जीवन नको म्हणून त्याग करून या वृद्धाश्रमात अनिच्छा लपवून स्वेच्छेने आल्या आहेत. अनेक श्यामची आई आपला मुलगा श्याम व्हावा म्हणून संस्कार करत होता पण ती बुला शाम बनली नाही ,यात आईचा काही दोष आहे का?आई /माता शब्दात श्रुती श्रुती असतात.

घे जन्म तू फिरूनी,येईन मी ही पोटी!
आई कुणा म्हणू मी?ही एक आस मोठी !
प्रेम स्वरूप आई !वात्सल्य सिंधू आई!

देव जरी मज कधी भेटला:

देव जरी मज कधी भेटला ,माग हवे ते माग म्हणाला!
म्हणेन प्रभू रे माझे सारे ,जीवन देई मम बाळाला !
इतकं प्रेम आई मुलावर करत असते.

परीक्षेचे रिझल्ट डिक्लेअर झाले की ,मार्क चांगले मिळाले नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या मुलांच्या बातम्या वर्तमानपत्रात येतात .आई अभ्यास करण्यावरून रागावली म्हणून,घर/जग सोडून जाणारी मुलं असतात .मोबाईलवर जास्ती खेळू देत नाही ,नवा मोबाईल घेऊन देत नाही म्हणून भांडणारी मुले पण असतात .पण मित्रांनो कधीतरी एखाद्या सुतिकागृहात जाऊन बघा, आईला मुलाला जन्म देत असताना ,किती यातना होत असतात. त्यामुळे आत्महत्या करणे हे कुठल्याही प्रश्नावर उत्तर नाही.त्या त्या वयात ताण अपयश येते,स्पर्धा खूप आहे,नोकरी नाही. त्या त्या वयात राग येतो .नैराश्य येते. अपरिपक्व माणूस चुकीचे निर्णय घेतो. अगदी कधी कधी तर परिपक्व माणसाने घेतलेले निर्णय देखील चुकीचे होऊ शकतात.यश अपयश याच्या पलीकडे सुद्धा जीवन असतं. नापास मुलांची सुद्धा एक वेगळी यशोगाथा असते.

म्हणून आज मला हे लिहावसं वाटते की आईचा विचार करा. आई रागवत असेल हिंदी चित्रपटाचे सारखी प्रेम व्यक्त करत नसेल,तुमचे कौतुक होत नसेल.आई नटून सजून वावरत नसेल .दिवसभर घामात भिजून के कपडे घालून वावरत असेल .पण ती तुमची आई आहे .आणि घरकाम करताना कष्ट असतात. त्यामुळे माझी आई सुंदर नाही ,प्रेम करत नाही,मी लाडका नाही वगैरे विचार मनातलं काढून टाका आणि आईचं प्रेम जाणा.मी जाणते की एवढं मॅच्युरिटी यायचं हे वय नाही. पण तरी मला हे सांगावसं वाटलं म्हणून मी सांगते आहे .

आई साठी मातृत्व हा काही कुठला दागिना नाही की तो मिरवावा. मातृत्व ही एक मोठी तपश्चर्या असते. मुल वाढवणे सोप्प नसतं. एक सुजाण संस्कारित तरुण अथवा तरुणी घडवायची असते. जीवनात आणि त्या कार्याच्यात आईचे ,वडिलांचे आयुष्य संपते.सगळे कष्ट असतात. आपल्या हाडामासापासून ,रक्तापासून बनलेले ते मुल पदोपदी वेळोवेळी आपल्याला रडताना दिसते,आपल्याला रडवते. कारण समाज,अति मोठा, अतिशय कोरडा ,दुष्ट आहे .घरी कुटुंबात एकमेकांना धरून राहणं आवश्यक आहे .

आतलं वर्तुळ आणि बाहेरचं वर्तुळ म्हणजे कुटुंबातील माणसं आणि बाहेरची माणसं या दोन्ही ठिकाणी भले बुरे अनुभव येऊ शकतात . ते बालकाला,माणसाला ,कुटुंबाला रडवू शकतात .या दुष्ट जगात ,मुलाला,एकटेपण फिटायला, कुणाचा तरी आधार हवा. पण तसा आधार मिळतोच असं नाही.

कोणीही असो,आजारपणात मानव अगतिक होतो, लहान बाळाला जन्मल्यावर बाळ रडते.दहाव्या दिवशी देतात ,ते बी सी जी चे इंजेक्शन टोचणे पासून, बाळ रडलं की आईचा जीव तळमळू लागतो .नंतर अनेक आजारपणा येतात .कांजण्या ,डाग्या खोकला गोवर व्हायरल फीवर, मलेरिया डेंगू आणि आता करोना, या सर्व आजारपणाच्या वेळी बाळ शारीरिक वेदनांनी तळमळतो. आई बाळा सोबत मानसिक वेदनेने तळमळते .काही कारणाने ,दूर राहून,अंतराचे कारणाने, जुळलेली नाळ तोडून ,जोड संपत नसतो, ती नाळ जुळलेली राहते.

कुठे कुणाच्या घडल्या भेटी,गीत एक मोहरले ओठी,म्हणून बालक तरुण होऊन लग्न करतो.

वाद संवादात संसार चालु राहतो.आई फक्त काळजी करु शकते.बालकाच्या आयुष्यासाठी दीर्घायुष्यासाठी आई कायमच व्रतवैकल्ये करत असते. अकालमृत्यूहरणासाठी, जमेल तेव्हा,देवा समोर आले कि दिवा लावते आणि उपास करते .त्या परमेश्वराची प्रार्थना करते आणि बाळ कल्याण मागते.

भिगी पलके नावाचा, स्मिता पाटील आणि राज बब्बर चा एक चित्रपट होता .त्याच्यात नाईलाजाने नोकरी करणारी आई ,बाळ नोकरानी कडे देवुन नोकरीवर जाते .घरात बाळ सांभाळायला एक बाई ठेवलेली असते. ऑफिसची काम, घर काम ,नवरा अपंग ,या गृहिणी,नोकरदार स्त्री व्यक्तीची खूप दमणूक होत असते . ताप असलेलं बाळ एका दिवशी ईहलोक सोडून जातं .त्या आईचा आक्रोश बघवत नाही. स्मिता पाटील पुढे त्या वेदना सहन होऊन नन,जोगन झालेली दाखवली आहे.

मोलकरीण चित्रपटात आपल्या स्वतःच्या मुलाच्या घरीच मोलकरीण म्हणून राबणारी आई दाखवली आहे .चाची420 चित्रपटात पती-पत्नीच्या घटस्फोटानंतर जेव्हा लेकीची कस्टडी वाटून दिली जाते, तेव्हा चाची 420 चे रूप घेऊन आपल्या मुलीच्या सहवासात रमणारे वडील दाखवले आहेत. जन्माला आलेला, एवढासा गोळा ,आई वडील मोठे कष्ट करून वाढवत असतात. पण बालकांना मात्र कुटुंब 'घर की मुर्गी दाल बराबर' वाटत असते.काही करा,तरीही मुलं ही आई-वडिलांना फारसे जवळचे समजत नसतात. त्यांना त्यांचे मित्र आणि चमक दमक अधिक जवळची वाटत असते. अर्थात संकटकाळी ही मित्रमंडळी देखील मदत करत नसते पण हे उशीरा कळते.पुढे आई वडील देखील मुलांना,कालबाह्य वाटतात आणि फारसे आदर्शवत वाटेना असे झालेले असतात.

वर्षात न एकच मातृदिन असतो पण वर्षाचे 365 दिन हे अपत्य दिन असतात .या सर्व 365 दिवसात आई आपल्या मुलाची काळजी करते ,चिंता वाहते आणि त्याच्यासाठी वारंवार देवाची प्रार्थना करते. देवा माझ्या अपत्याच रक्षण कर.देव जरी मज कधी भेटला,

म्हणेन प्रभू रे,सारे सुख लाभू दे,या माझ्या चिमण्या बाळाला!

**

26 जलप्रलयानंतर 20 वर्ष:

26 जुलै 2005 ला मुंबईत जलप्रलय झाला होता. त्याला 26 जुलै 2025 ला वीस वर्षे पूर्ण होणार आहेत.मिठी नदीतील अतिक्रमण ,साचलेला गाळ, यामुळे मिठी नदीचा नाला झाला होता आणि त्या नाल्यात जोरदार मुसळधार पावसामुळे पाणी भरून पूर्ण बांद्रा आणि कुर्ला परिसर जलमय झाला होता .त्या काळ रात्रीच्या आठवणी अजूनही कित्येक मनामध्ये रुतून आहेत. मुंबईत अनेक महिला नोकरीवर जातात .त्यांची मुलं पाळणा घरात ,घरी ,शेजारी ,आजी-आजोबांकडे किंवा अशीच एकटी, कशी तरी फ्लॅटमध्ये राहत असतात. शिवरायांनी आपल्या बालकासाठी घरी धावत जाणारे हिरकणीचा कौतुक केलं आणि हिरकणी बुरुज बांधला आहे. पण नोकरदार महिलांना ,त्यांच्या हिरकणी सारख कोवळ्या बाळ घरी सोडून कष्ट करून कामावर येण्या जाण्याचे त्रासाचे अप्रिसिएशन किंवा कौतुक मिळत नसतं. त्या 26 जुलै 2005 ला देखील कित्येक हिरकणी, आपली मुलं घरी सोडून, कामावर आल्या होत्या. ज्या बांद्रा कुर्ल्याला, मुंबईतील विविध भागात नवी मुंबईतील काही भागात किंवा जिथे जिथे त्या दिवशीचा प्रलयकारी पाऊस पडला ,त्या ठिकाणी अडकून राहिल्या .अडकून पडल्या.

चिन्ह: साधारणपणे वेडावाकडा पाऊस किंवा आधी अन्य ठिकाणी पाणी भरणे, महाराष्ट्रात अन्न ठिकाणी पूर येणे, विशेषता बारावी धरणाच्या परिसरात पाणी भरणे, या लक्षणानंतर मुंबईत पाणी भरेल हे चिन्ह मुंबईकर ओळखू लागतात.26 जुलै 2005 ची सकाळ तर अतिशय सामान्य रुटीन ,पावसाळ्यातली सामान्य सकाळ होती .ऑफिसला जाताना सकाळी नऊ वाजता ठाण्याहून मी आमच्या बसने

बांधलेला गेले तेव्हा मी छत्री सुद्धा उघडली नव्हती. कारण की उन पडल होतं .पण मुंबईच्या माणसाला छत्री सोबत न्यायची सवय असते ,म्हणून छत्री सोबत होती. दुपारी साडेबारा नंतर टपाटप पटपट पाऊस सुरू झाला. पण हल्ली बहुतेक कार्यालय ,एसी असतात आणि आवाज ऐकु येत नाही.काम झपाटून असते.त्यामुळेच बाहेर देखील न बघितल्यामुळे बाहेर जोरात पाऊस पडतोय याची खबरबात पटकन लक्षात देखील आली नाही .काचेवर पावसाचे थेंब असे दिसू लागले आणि दुपारी एक मैत्रीण जी बांद्रातच राहत होती ती लंच मध्ये बाहेर गेली होती. ती म्हणाली," भयानक पाऊस पडतोय. तुम्ही लांब राहणाऱ्या लोकांनी निघून जायला हवं ."पण तरीही कुणालाच गंभीर काही घडेल असं वाटलं नाही

.त्या दिवशी म्हणे एक मोठा ढग मुंबई शहरावर आक्रमण करून आला होता. मुंबई शहराच्या जमिनीवर अतिक्रमण करून येणं ,ही फार जुनी गोष्ट झाली. मिठी नदीत गाळ, प्लास्टिकच्या पिशव्या ,कचरा,जुम फर्निचर टाकून मिठी नदीची परिस्थिती वाईट करणे ,ही पण जुनी आक्रमण परिस्थिती झाली .पण त्या दिवशी आभाळावर एका मोठ्या काळ्या ढगानी आक्रमण केल्याने धोधो असा तो पाऊस पडत होता .पाच वाजताच्या दरम्यान ऑफिसमध्ये सगळ्यांना," मुलींनो तुम्ही घरी जा"असे आम्हाला साहेबांनी सांगितलं. त्यावेळी रिक्षा टॅक्सी पूर्वीच बंद झाल्या होत्या. धारावी परिसरातील लोकांना, त्यांच्या विभागात सूचना दिल्या गेल्यामुळे, ते सगळे आपापले सामान प्लास्टिकच्या थैल्यांमध्ये बांधून कल्याण अंबरनाथ वगैरे अशा ठिकाणच्या नातेवाईकाकडे/सुरक्षित ठिकाणी गेले आहेत असं आमच्या शिपायाने आम्हाला सांगितलं .तीनशे दहा नंबरची बांद्रा ते कुर्ला बस होती.तिच्यात आम्ही ऑफिसच्या सगळ्या जणी चढलो.त्या वेळी आम्ही बाहेर पडलो ,त्यामुळे आम्ही विचित्र ठिकाणी अडकलो. याउलट पुरुष मंडळी जी ऑफिसमध्येच थांबली होती ,जी थोडी उशिरा घरी जायला निघाली, ती इमारतीच्या बाजूला पाच पाच फूट

पाणी साचलं असल्यामुळे इमारती बाहेर नाही पडून शकली. इमारतीतच सुरक्षित राहिली. इमारतीतच कॅन्टीन वाल्याने ,त्यांना व्यवस्थित खाण्यापिण्याची सोय केली आणि मुख्य म्हणजे अशी आमच्यासारखी बेवारस आणि अनाथ, असुरक्षित अशी रस्त्यावर अडकण्याची परिस्थिती ,त्यांच्यावर आली नाही. या बसमध्ये आमच्याच ऑफिसमधल्या आम्ही 22 मुली होतो अन्य ऑफिसेस मधील देखील स्त्री पुरुष बरेच जण होते. काही कोचिंग क्लासेसच्या तरुण मुली आणि मुलं होती .बस सुटली.

बस सुटली .पण थोड्या अंतरावर जाऊन थांबली. बांद्रा आणि कुर्ला जिथे जोडले जातात, तिथे पूर्वी अतिशय कसातरी एक रस्ता होता. भंगार गोडाऊन होती. आता तिथे जरा परिस्थिती बरी आहे .2005 साली उजव्या बाजूला एक खडक होता. टेलिफोन ऑफिस होतं .डाव्या बाजूला पुढे मशीद वगैरे होती.त्या कॉर्नर वर भरपूर पाणी होतं .तरी बस चालवणाऱ्या ड्रायव्हरने ती पुढे नेण्याचा प्रयत्न केला. थोडं पुढे गेल्यावर आता आपण पुढे जाऊ शकत नाही आणि पाऊस देखील थांबत नाहीये याची जाणीव झाली. बस परत मागे सुरक्षित ठिकाणी वळवावी ,असा विचार सगळ्यांनी त्याला सुचवला .पण ते शक्य नव्हतं. मात्र रस्त्याच्या मध्ये जे डिव्हायडर होते त्यामुळे ती बस मागे वळवता आली नाही .जर कदाचित ते मधले डिव्हायडर नसते ,तर बसेस मागे वळून परत बांद्राच्या प्रदेशाने गेल्या असत्या, तर कमी पाणी साचलेल्या जागेशी बस थांबू शकत होती.

तर अशा रीतीने त्या दर्ग्यापाशी (आता तिथे फ्लाय ओवर झाला आहे)बस थांबली . तेव्हा लक्षात आलं की फक्त आमचीच एक बस थांबली आहे असे नाही .पाठोपाठ पाच सहा बसेस थांबल्या होत्या. पाऊस पडत होता.बसमधील काही जण म्हणाले ,"आपण उतरुन चालत स्टेशनवर जाऊ." दोन-तीन जण गेले सुद्धा !पण बाकीच्यांना जाण्याची शक्ती, पावसाच्या माऱ्यात आणि पाण्याच्या लोंढ्यांवर चालण्याची शक्यता जाणवत नव्हती. हळूहळू अधिक पाणी भरायला लागलं.

सगळीकडे ग्रुप अंधार झाला होता विज बंद झाली होती फोनच्या बॅटरी सगळ्यांच्या संपल्या. घरच्यांना कळवण्यासाठी सर्वच आतुर झाले होते मोबाईल नेटवर्क बंद झाले होते .समोरच्या ट्रक मध्ये ट्रक वाला होता .ती ट्रक पाण्यात जवळजवळ अर्धी बुडाली होती .काचेवर तो हात आपटून इशारा करत होता .कदाचित तिथेच त्याचा जीव गेला असेल .पाण्यात कुत्री मांजरी, फेकलेला कचरा ,गाड्यांची सीट ,सायकल, अशा प्रकारचे सामान वाहत येत होते. कुर्ल्याला पाणी साठलं होतं. तरीही फारसा संशय न आल्यामुळे, आणि अन्य पर्याय नसल्यामुळे आम्ही बसमध्येच बसून राहिलो. मुंबईकरांच्या मुंबईच्या पावसाच्या अनुभवामुळे असं वाटलं की थोड्यावेळाने पाणी ओसरेल. मुंबईत नॉर्मली पाऊस पडतो ,थांबतो आणि पाणी ओसरुन जात. पण पाऊस थांबला तर ना!पाऊस थांबणार नाही असा अंदाज असता तर आम्ही आजूबाजूच्या घरांमधून,मशीद मध्ये सुद्धा आसरा घेऊ शकत होतो. मुंबईत हे स्पिरिट असतं. कुठलाही जाती-धर्माचा विचार न करता माणसं माणसांना मदत करत असतात. मुंबईकरांची मुंबईकर ही एकच जात असते आणि माणुसकी हा एकच धर्म असतो.

पाणी बस मध्ये भरून वर वर चढू लागलं. आमची बस डबल डेकर होती. पण बाजूच्या सिंगल डेकर मध्ये अगदी वरपर्यंत पाणी आल्यावर ,बऱ्याच स्वयंसेवकांनी कसंतरी त्या तिथल्या सगळ्या लोकांना उतरवून, आमच्या डबल डेकर मध्ये चढवलं .डबल डेकर मध्ये सुद्धा तळमजला पूर्ण पाण्याखाली बुडला होता. आणि पहिल्या मजल्यावर आम्ही सगळे जीव मुठीत घेऊन सीटवर बसलो.तरीदेखील सीट पर्यंत पाणी आलं होतं ,त्यामुळे सीटच्या वर मांडी घालून बसून थांबलो होतो .महिलांना आपल्या देशात बारा महिनेच 'टॉयलेट एक भयकथा' असा प्रश्न असतो .कायम त्यांना बाथरूमला जायची सोय नसते. तर अशा परिस्थितीत काय असणार ?पण माणसं खूप चांगली होती. आम्ही ओढणी वगैरे

बाजूला लावून सगळ्यांनी आमच बाथरूमला जायचं काम तर उरकलं आणि जीव घेऊन तिथे बसून राहिलो. कुठल्याही कुणाच्याही फोनला नेटवर्क नव्हतं. अशा वेळी रेडिओ का लावला नाही ?असे उपाय नंतर सुचवले गेले .फोन मध्ये रेडिओ असतो आणि फोनची बॅटरी सगळ्यांची संपली होती. काही क्लासेस आणि कॉलेजची तरुण-तरुणी मंडळी बस मध्ये होती. ती सुरुवातीला अर्धा पाऊण तास मस्करी करत होते.

साथ जियेंगे साथ मरेंगे, ये दोनो कहते थे :

एक था बुल और एक थी बुलबुल किंवा

सौ बार जनम लेंगे, ईसी जगह पर भूत बनके आयेंगे वगैरे गाणी गाऊन ते अशाही परिस्थितीत आनंद मानत होते. पण एक दीड तास झाल्यावर, एका मुलीचा बांध सुटला आणि ती जोरजोरात रडायला लागली .तिचं नाव देखील शुभांगी होतं. सर्वजण मनातल्या मनात आपापल्या देवाचा धावा करत बसले होते. काळ, घाणेरडं, चिखलाच ,पाणी सर्वत्र पसरलं होतं.पहाटे साडेतीन-चार च्या दरम्यान पाऊस कमी झाला. बसमधून बाहेर निघू शकू ,अशी परिस्थिती आली .त्यावेळी बाजूच्या सर्व स्वयंसेवकांनी जाती धर्म कुठलाही भेद न मानता आम्हाला पोटाला दोरखंड बांधून आणि एक एक हात पकडून, त्या पाण्यातून बाहेर काढलं. कुर्ला स्टेशनच्या दिशेने आम्ही चालू लागलो. तर लोकल सगळ्या बंद होत्या. तिथे एका स्वयंसेवकाच्या घरी आम्ही राहिलो. त्यांनी खिचडी केली होती .वीज नसल्यामुळे सगळ्यांच्या फोनच चार्जिंग संपलं होतं. घरी लोक काळजी करत असतील याची कल्पना होती .

माझे मिस्टर त्या दिवशी सायनला एका ठिकाणी भाषण द्यायला आले होते .ते चालत चालत घरापासून पाच किमी वर पोहोचले. पण ते सुद्धा घरापर्यंत पोहोचण्यापूर्वीच मुलुंड चेक नाक्यालाच अडकले .आमचे शाळकरी चिरंजीव(लेक)

एकटाच घरी होता. उपाशीच होता. हॅरि पाॅटर वाचत बसला होता. काही काळ त्याने पेशंस ठेवला, नंतर रडायला लागला. जवळ राहणाऱ्या एका माणसाने ,त्याला रात्री खूप उशिरा जेवणाचा डबा आणून दिला .स्वयंसेवकांनी त्याच्या घरी आम्हाला खिचडी खायला दिली .त्यांच्या घरात ज्या होत्या त्या जुन्या साध्या साड्या होत्या त्या किंवा ड्रेसेस घालवायला दिले. छत्री माझी त्या पाण्यात वाहूनच केली होती .लोकल सुरू होण्याची काहीच चिन्ह नव्हती. एका जोशी नावाच्या सद् गृहस्थाने आम्हाला मुलुंड चेक नाका स्टाॅपला सोडलं .तिथून पुढे परत एका अशा तोंड ओळखीच्या व्यक्तीने आम्हाला घरापर्यंत सोडले.

घरी आल्यावर सुद्धा निराशा आली होती. मृत्यूच्या भोज्जाला शिवून आम्ही परत आलो होतो .त्या दिवशी केवळ मुंबईतला पाऊस थांबला म्हणूनच मुंबईकर वाचले. जर तो पाऊस अजून थोडा वेळ पडत राहिला असता, तर मुंबईत लाखोंच्या संख्येत मृत्यू झाले असते. म्हणजे निसर्गावर आपण केलेला अन्याय ,किती महाग पडू शकतो याची एक झलक निसर्गाने दाखवली .आज वीस वर्षानंतर देखील प्लास्टिकच्या पिशव्यांनी गटारी भरलेल्या आहेत. वृक्षतोड होतच आहे. गाळ ,न लागणाऱ्या वस्तू ,नाल्यात फेकल्या जात आहेत आणि नदी नाले कचऱ्याने मिठीने भरलेले आहेत. त्या काळात रोज वर्तमानपत्रात कुठेतरी मृतदेह सापडल्याच्या पण बातम्या यायच्या. पावसाचा इतका धसका मुंबईकरांना बसला की बाथरूम मध्ये नळ सोडला तरी भीती वाटायची मी तेव्हा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स ला नोकरीला जायचे. ढगफुटी झाली आणि काही तास doubledecker बसमध्ये टपावर बसून काढले होते.आजूबाजूला सर्वत्र मिठी नदीचे पाणी पसरलेलं होत.अशा अवस्थेत मरणदारी काढले होते. त्यानंतर गाळ साचल्यामुळे कित्येक दिवस ऑफिसच्या लिफ्ट बंद होत्या .याबद्दल बोलताना आमचे साहेब म्हणायचे की," शतकातून एकदाच अशी घटना घडत असते. तुम्ही काही सगळ्यांनी (पावसात अडकलेल्या

मुला मुलींनी) काळजी करू नका. पण निसर्गाचा होणारा हास बघता ,अशा घटना वारंवार घडतील, असं भय हल्ली जाणवू लागल आहे .२६ जुलै 2005 ची ती जीवघेणी आठवण कायम अनाम भय देत असते.

बऱ्याच माझ्या मैत्रिणी सांगतात ,लिहितात की "माझाही २६ जुलैचा मुंबईतील अनुभव भयानक आहे. हो, आम्हीही किंबहुना सारे मुंबईकर...पार विरार, कर्जत, कसारा पर्यंत सारे अडकले होते. असंख्य आठवणी! एकदम गोड वाटणारी मिठी म्हणजे मुंबईची लाडकी मिठी नदी मगर मिठी बनू शकते किंवा मृत्यूची मीठी सुद्धा बनू शकते पर्यावरणाचा ऱ्हास थांबणं अतिशय आवश्यक आहे आज वीस वर्षांनी सुद्धा पण धडा शिकलेलो नाही.

26 जुलैला, देवाच्या कृपेने आपण वाचलो, असं म्हणून आणि आजच्याही पाऊस आणि पाणी भरणे या परिस्थितीकडे बघून, उसासे सोडण्या पलीकडे आपण काहीच करू शकत नाही. तरीही मनात कुठेतरी एक दिलासा असतो की सर्व संकटांमध्ये आमच्या मुंबईमधील मुंबईकर मुंबईकरांच्या मदतीला नक्की धावून येतील. जय महाराष्ट्र

**

27 पॅरिस आयफेल टॉवर

समर ऑलिम्पिक्स फ्रान्सला झाले. फ्रान्समध्ये गेलो की आयफेल टॉवरची पॅरिस दर्शनात , ऑलिंपिक गेम्स म्हटल्यावर सगळ्या जगाची नजर फ्रान्स वर लागली होती. .

31 मार्च 1889 रोजी आयफेल टॉवर हा पर्यटकांसाठी खुला केला गेला. त्यानंतर आज 135 वर्ष ,बघा 135 वर्ष पर्यटक आयफेल टॉवरचा आनंद घेत आहेत. दरवर्षी 70 लाख लोक आयफेल टॉवरला भेट देतात

1889 मे मध्ये बनवून तयार झालेला हा टॉवर जगातील नं1 चे लोकप्रिय ठिकाण आहे. तसा खरेतर हा टॉवर ,एका एक्सपोजिशन साठी बनवलेला,रेडिओ अँटेना होता.पुढे तो पॅरिसची खूण बनला व युरोपीय आकर्षण ,मुकुट मणी बनला. एकदा कधी हा अँटेना डिसमेंटल करावा,लोखडं विकावे,पैसे मिळवावे, म्हणून विचार मांडला गेला होता,हे खर सुध्दा वाटत नाही.पण आजही तो ,आयफेल टॉवर,Best in world आहे.माझे शाळेत असल्यापासूनच,आयफेल टॉवर बघणे,Viewing Gallery तुन पॅरिस बघणे हे स्वप्न होते. सुदैवाने आजही,लोक आयफेल टॉवरला जीना चढून/लिफ्टने तिसऱ्या लेव्हलवर ,जावून आयफेल टॉवर वरुन,बाजूचा सुंदर परिसर बघू शकता. मी पण बघितले.वरपर्यंत Elevator ने जावू शकतो.

सावध.फ्रान्सला काय कुठेही प्रवासात,Allergic Infection होणे,पोट बिघडणे, ताप येणे, चोरी होणे हे, धोके असतात.या भागात संभवतात. स्वप्न

येथील नजारा ,काही दृश्य बघणे , once in lifetime स्वप्न ठरू शकते.

आयफेल टॉवर वरून परत येताना ,सायकलवर फिरून शहर बघता येते, शहराबाहेर, म्युझियम,सीन नदीकिनारा,या ठिकाणी फिरता येते. जेवण जेवा. शहर जाणून घ्या.कारण रात्री परत आयफेल टॉवर बघायचा आहे.सहलीत पैसे वाचवणे,बचत करणे या वायरस पासून , या प्रवासात दुर रहा.

सस्ता रोये बार बार, महंगा रोये एक बार,हे लक्षात ठेवा. प्रयेक टूर over budget असते.प्रवासात टॉर्च नेहमी जवळ ठेवा.पासपोर्ट सांभाळा.नाईट टॉवर भेट .रात्री,रंगीत प्रकाश-योजना केलेला,विजेची रोषणाई केलेला टॉवर सुध्दा, जरुर बघा.सीन नदी किनारीच्या रिव्हर क्रुझ मधून जाताना आयफेल टॉवरचे दिसणारे रुप आकर्षक ठरते.मात्र पाकीट,नेहमी सांभाळा.

टुरमध्येआपला स्पीड कधी मॅच होत नाही.काही गाईड,मैत्रिणी, मागे रेंगाळल्यावर, रागावतात.त्यांची आपली चीड-चीड होते.ती ऐकून वाईट वाटते,पण ती सावधता, खूप जरुरी असते.सहलीत ढिसाळ पणा जर आला तर तो,जो महाग पडू शकतो.चोरी झाली की मनस्ताप होतो.

ठराविक ईमारती जवळ टुर बस थांबणार असेल तर तिथे जमावे लागते.आमची रात्रीची आयफेल टॉवर भेट ठरली होती.रात्री ठराविक वेळी,आयफेल टॉवरला,रंगीबेरंगी रंगांची विद्युत रोषणाई केली होती.ती पण बघायला मिळाली.

आयफेल टॉवर ,चे सहलीत ,आपल,tourist, Old lady or old man अशी image सोडून वावरा.तिथलेच एक बना.दरवर्षी 6 million लोक आयफेल टॉवरला भेट देतात. रचना

अतिशय संतुलित symmetry असलेला ,हा टॉवर 1023 feet उंच आहे. १९३१ साली न्यू यॉर्क येथे बांधलेल,Empire State bldg आता नंबर एक आहे.

1931 पयत आयफेल टॉवर सर्वात उंच होता.लोकप्रिय होता.आजही आहे.या टॉवरचे वजन, 10100 metric ton आहे. गुस्तावे आयफेल, या इंजिनिअर च्या कल्पनेतून , जन्माला ही रचना, हा टॉवर आला, आकाशाला भेदू लागला. तो हालत नाही. (वादळात सुद्धा.)18038 धातूच्या तुकड्यांचे पार्टची ही रचना आहे.पहिल्या मजल्यावर जाईपर्यंत ,पायऱ्या चढून,पुढे लिफ्टची सोय,योजना आहे.एकूण १६६५ पायर्या आहेत.330 मीटर उंच म्हणजे 81 मजली इमारती एवढा उंच आहे .तर तिसऱ्या मजल्यावर,गुस्तावे आयफेल ,यांचे आईनस्टाईन बरोबरचा पुतळा आहे.

आधी prior Booking for your visit,to Viewing Gallery ,जिथून मग,80 किलोमीटर पर्यंत चे दिसले.महा हवेशीर ,अशी तिसऱ्या मजल्यावर गॅलरी आहे,तिथे जाता येते.आयफेल गुस्तावे सर म्हणायचे."माझा टॉवर वार्याने बनवला आहे."

निरखून बघितले तर ढग हालल्यामुळे टॉवर हालतो,असा भास होतो. बघण्यासारखे,नवल वाटणारे , हे स्ट्रक्चर जगातील आश्चर्य मानायला हवे.महायुद्धात,एकवेळ ,हा टॉवर भंगारात काढायला निघाले होते आज तोच टॉवर पॅरिसचे मानचिन्ह आहे.पॅरिसमध्ये,या टॉवरहून अधिक उंच इमारत बांधायला परवानगी नाही.दुसरे बाजूने देखील आयफेल टॉवर बघता येतो.पॅलेस डि चलैट, या बाजू ने येथे आयफेल टॉवर जवळ, कारंजी आहेत. कलाकार चित्रकार कवी लेखक गायक नृत्यदिग्दर्शक चित्रपट दिग्दर्शक या सर्वांनाच आयफेल टॉवरचं एक वेगळाच आकर्षण वाटतं

*****

गोदावरीचे पाणी: कुंभ

नाशिक येथे होणाऱ्या आगामी 2027 ला होणाऱ्या कुंभमेळ्यात गोदावरीत स्नान करावे हे वाचले.गोदावरी नदीची आठवण काढली की मन चिंब भिजते लाखो फुलांचे ताटवे उमलतात. माहेरच्या वाटेने मन धावू लागते .आकाशवाटे श्रावण आला नाही तरी मनात श्रावण येतो. कारण गोदावरीच्या काठी नाशिक येथे माझे बालपण गेले. मौल्यवान वस्तू जिथे सापडते ती जागा जशी आयुष्यभर आठवते, तसे मौल्यवान वस्तू जिथे हरवते ते क्षण, ती वास्तू देखील आयुष्यभर बेचैन करत राहते .तसेच गोदावरीचे घाट आठवतात. दक्षिण काशी गोदावरी ही दक्षिण भारतातील सर्वात मोठी पवित्र नदी आहे. गौतम ऋषींनी ही गंगा आणली ,म्हणून तिला गौतमी गंगा असेही म्हणतात .गोदावरी नदीच्या काठावर नाशिक पैठण नांदेड ही प्रमुख शहरे वसलेली आहेत. या नदीमुळेच नाशिक धार्मिक केंद्र बनले आहे .तेथे मंदिरे गोपुरे धर्मशाळा संस्कृतीचा सुरेख संगम घडतो .आढळतो. पैठण शहरास प्रतिष्ठान नगरी किंवा नाथांचे पैठण म्हणतात. दक्षिणकाशी म्हणतात .पैठण जवळ जायकवाडी धरण असून या धरणातून औरंगाबाद परभणी बीड नांदेड येथे पाणीपुरवठा होतो.

2027 यावर्षी कुंभमेळा गोदावरी नदी तिरावरील नाशिक येथे आहे .गंगेचा प्रवाह अंगावरून गेल्यामुळे गाय जिवंत झाली म्हणून गोदावरी असे या नदीचे नाव पडले आहे. गोदावरी व कादवा यांच्या संगमावर नांदूर माध्यमेश्वर येथे पक्षी अभयारण्य आहे .गोदावरी नदीचे पाणी तीर्थ म्हणून वापरतात .कारण त्याने पित्त रक्ताचे आजार कुष्ठरोग नाश पावतो व भूक वाढते .सिंहस्त पर्वणीत सर्व नद्या समुद्र

क्षेत्र आरण्ये आश्रम गोदेच्या ठिकाणी निवास करतात असे ब्रह्मांड पुराणात म्हटले आहे. कुंभमेळ्यात नदीचे पाणी औषधी बनते.

स्नान करा गंगेचे कुष्ठ जाते अंगीचे:

स्नान करा गोदेचे !असे एक भजन म्हणत एक भिकारी सकाळी सकाळी पावा वाजवीत येत असे .

कुंभ चलो रे भाई ,पुण्यकमालो भाई !

तुम भी चलो रे भाई !असेही म्हटले जाते.गोदावरीचा उगम त्रंबकेश्वर येथे ब्रह्मगिरीवर झाला .महाराष्ट्राच्या प्रगतीत नदी गोदेचा फार मोठा वाटा आहे.या नदीला प्रवरा मुळा वर्धा वैनगंगा इंद्रावती शाबरी प्राणहीता या नद्या मिळतात .शाबरी संगमावर भद्राचल जवळ हिचे पात्र खूप मोठे होते .त्रिंबकेश्वर कुशावर्त गोवर्धन जनस्थान प्रवरासंगम निवासपूर तीर्थक्षेत्र प्रसिद्ध आहेत. गोदावरीच्या विशिष्ट वैनतेय व गोमती या तीन प्रवाहांमध्ये अमलापुर येथे रविवारी स्नान करतात. पुण्यदायींनी गोदेचे स्नानाचे पुण्य मोठे असते.कुंभमेळ्याला जायची तयारी करा.पापनाशनासाठी भेटू या त्र्यंबकेश्वर येथे!

.**

चितचोर आला :

कल रात आया मेरे घर एक चोर
आके बोला ,दे दे मुझे जो भी तेरा है
मैंने बोला
मेरा नाम भी ले जा मेरा काम भी ले जा
मेरा राम भी ले जा मेरा श्याम भी ले जा
मेरी जीत भी ले जा मेरी हार भी ले जा
मेरा डर भी ले जा मेरा घर भी ले जा
मेरे ख्वाब भी ले जा मेरे राज़ भी ले जा
मेरा ग़म भी ले जा हर ज़ख्म भी ले जा
मेरी जात भी ले जा औकात भी ले जा
मेरी बात भी ले जा हालात भी ले जा
ले जा मेरा जो भी दिखे जो न दिखे वो भी ले जा
कल रात आया मेरे घर एक चोर आके बोला
दे दे मुझे जो भी तेरा है मैंने बोला
हाँ हाँ हाँ हाँ हाँ हाँ हाँ हाँ
मेरा नाम भी ले जा मेरा काम भी ले जा
मेरा राम भी ले जा मेरा श्याम भी ले जा
मेरी जीत भी ले जा मेरी हार भी ले जा मेरा डर भी ले जा
मेरा घर भी ले जा, कर दे मुझे आज़ाद !
कर दे मुझे आज़ाद आज़ाद आज़ाद
कल रात आया मेरे घर एक चोर .

चोर है अचानक येणाऱ्या मृत्यूचं मुक्तीचं रूप म्हणून या चोराच वर्णन केलेले आहे

Read more here: https://hindi.intolyrics.com/lyrics/chor-song-lyrics-hindi/

संगीत चैतन्य पंडित .

इथे परमेश्वर अथवा जीवन संपवायसाठी परलोकी घेऊन जाणारा यमराज, अशा अर्थाने चोराचे संकल्पना आहे. चोराला भय चांदण्याचे, म्हणून चोर अंधाऱ्या रात्रीच येतो अशी पण एक कल्पना आपल्या समाजात आहे. दिवसा उजेडी उजळमाथ्यानी, पांढऱ्या कपड्यात वावरणाऱ्या चोरांना, व्हाईट कलर चोर म्हणायची पद्धत सुद्धा आहे .चोरी वाईट असली तरी ,सुप्त चोर हा माणसाच्या मनात बऱ्याचदा असतो .वागण्यात सुध्दा, हातात सुद्धा असतं.

ओळखीचा चोर बांधून मारतो म्हणजे ओळखीच्या लोकांपासून जास्ती धोका असतो, असं म्हटलं जातं. नो फोर्स एंट्री, अशा पोलीस खात्याच्या लिखाणानुसार ,ओळखीचा चोर ओळख दाखवून आत शिरतो आणि मग गुन्हा करतो .चोरी करतो .यजमानच चोराला बोलवतात घरात घेतात.. चोराचे स्वागत करतात आणि चकवा होऊन फसतात.चोरी बद्दल फारस कोणी लिखाण करत नाही .दो चोर ,पाच चोर, 40 चोर ,अशा नावाने सिनेमे गाजले तरीही चोर ही तशी एक पोटापाण्यासाठी चोरी करणाऱ्या लोकांची ,दुर्लक्षित जमात असते.

चित्त चोर म्हटलं की प्रियकर प्रेयसी परमेश्वर आठवतात.चैन चुराये,नींद उडाये तेरी बन्सी,अशी भजन गात मात्र मोठी ,मोठी ,जगज्जेत्या ची नावं घेतली जातात.

काल रात्री कोणता चोर कवीच्या घरी आला असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता.

निसर्ग सखा

खरंतर निसर्ग हा माणसाचा सगळ्यात चांगला सखा असतो .मध्यंतरी गुगलवर एका बेस्ट पत्राला जे बक्षीस मिळालं .त्याच्यात त्या वाचक माणसाने सांगितलं की," आठ तासाच्या झुरीच हुन आलेल्या विमान प्रवासानंतर मी माझ्या,गावच्या शेताच्या मागच्या जंगलात फिरायला गेलो . दमलो होतो तरीही गेलो उघड्यावर बागेत खुर्ची टाकून बसलो आणि मला खूप बरं वाटलं. लेखकाची अडचण संत तृप्ती उर्फ सॅच्युरेशन लेखकाचा थकवा ,रायटर ब्लॉक त्याच्यामुळे दूर होतो आणि वेगळ्या वेगळ्या नवकल्पना येतात. कारण मेंदूला अधिक चांगल्या प्रकारे ऑक्सिजन मिळतो."

मी देखील अनुभवले की बहिणीचा किंवा कुणाचा बंगला असला तिथे मजा येते .एकत्रित किंवा एकटे असो आणि आम्ही गच्चीत थोडा वेळ रमतो.

जरी पलंगावर लोळून चंद्र चांदणे बघितले तर निसर्ग सख्याने माझा हात पकडला माझ्या अंगावर हात फिरवला असं वाटतं. वाटते की माझ्या आत्म्यापर्यंत तो आनंद झिरपतो किंवा माझं अस्तित्व मला त्या जंगलात मोकळ्या आकाशाच्या खाली सापडतं. मी अधिक आनंदी होते. वर्षा सहलीसाठी म्हणजे पावसाळ्यात देखील भिजण्यासाठी किंवा पावसाळ्यात भर पाउस पडत असताना एखाद्या तंबूमध्ये राहण्यासाठी लोकं सहलीसाठी जंगलात जातात तो पण एक आनंद मिळवण्याचा मार्ग असतो

निसर्ग सखा सगळा थकवा शोषून घेतो आणि भरपूर चालल्यामुळे थकल्यामुळे आपल्याला झोप देखील शांत लागते .शहरातल्या सारखे आवाज ,धूळ, धूर, ऑक्सिजनची कमतरता, याचा त्रास होत नव्हता, फ्रेश वाटत.

मला आठवतं आमच्या लहानपणी एवढे एसी कुलर पंखे हे प्रकारच नसायचे .गच्चीत सगळेजण झोपायला जायचे आणि गच्चीत डासांचा त्रास होऊ नये म्हणून मग थोड्या वेळाने किती जण जास्त डास चावतात,पावसाचे शिंतोडे येतात म्हणून गच्चीवरून गाद्या घेऊन खाली यायचं. कारण तेव्हा नुकताच जेमतेम मॉस्क्युटो रिपेलन्ट(डास नाशक मलम कासवछाप अगरबत्ती यांचा शोध लागला होता. आणि ते रेयरच होते .मग कडुलिंबाच्या पाल्याचा धुर करायचो. तिथे थोडं ,धूप अगरबत्ती लावायचे. पण तरी डास चावायचे . मच्छरदाणी मात्र लावत असून ,त्या मच्छर दाण्यासाठी जाड दोऱ्या होत्या .ज्या गच्चीच्या खांबाला किंवा गच्चीच्या हुकला बांधल्या जायच्या. आणि मगच शांत झोपायचं. आकाशात चंद्र चांदणे बघण्याचा आनंद ,त्या गप्पा सह वेगळा असतो.तस एक गाणे आहे.

सुहानी चांदनी राते ,हमे सोने नही देती!

तुम्हारे प्यार की बाते, हमे सोने नही देती! तशा टेरेस वरच्या गच्चीतल्या किंवा मोकळ्या शेतातल्या खाटलं टाकून मारलेल्या बाल्कनी तल्या बागेतल्या गप्पा माणसाला खूप फ्रेश करतात .सर्व शेजारी आजूबाजूचे भाडे करू ,मित्र-मैत्रिणी देखील ह्या गच्चीत झोपायचे आणि चंद्र बघत चांदण्या मोजायचे आणि गच्चीतल्या चंद्र प्रकाशात वावरण्याचा आनंद घ्यायला यायचे .ते दिवस कायमच आठवतात. म्हणून तर हल्ली टेरेस फ्लॅट लोकांना हवा असतो .

पण तरीही ते गच्चीत सगळ्या भावंडांसोबत खिदळत कुदळत झोपणे खास असे.ते दिवस आता राहिले नाही .

गेले ते दिन गेले!वेगवेगळी फुले उमलली, रचूनी त्यांचे झेले एकमेकांवरी उधळले, गेले ते दिन गेले.

तरीही अजून कधीतरी वर्षातून एखाद्या दिवशी, वेळ काढुन बेत रचुनी निसर्ग सख्याला भेटायला ,जंगलात रात्र काढायला, गच्चीत झोपायला नक्की जा. तो निसर्ग सखा तुम्हाला खूप आनंद देईल.

**

सफरनामा:

सफरनामा म्हणजे यात्रेचा वृत्तांत, पर्यटनाचे वर्णन होय. एक सफरनामा म्हणून कार्यक्रम होता ,ज्याच्यात दोन कवी आपला कवितेचा प्रवास ,सफर व्यक्त करणार होते. काही कारणाने जाऊ शकले नाही जीवन यात्रा या अर्थाने सफरनामा हा शब्द बऱ्याचदा वापरला जातो.

सफरनामा म्हणून तमाशा चित्रपटातील, वेद नावाच्या नायकाचे तोंडी एक गाणं आहे .त्याच्यात त्या नायकाचा प्रेमभंग झालेला आहे .वेद आई-वडिलांबरोबर पण भांडुन घरुन हाकलला गेला आहे.तो अपमानित पावला आहे .नोकरी सुटली आहे .पण तरीही तो आपल्या आपल्या स्वतःच्या खुशीत स्वानंदात रमून ,जन्मगावी,आठवणीतील ठिकाणी सफरनामा याबद्दल बोलतो आहे. जीवनाच्या सफर बद्दल बोलतो आहे. त्या गोष्टी आठवत,खुश होऊन पंख लावून उडणाऱ्या पाखरासारखा उडतो आहे.

सफर म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाणं.

जिंदगी का सफर ,है ये कैसा सफर ?

कोई समझा नही कोई जाना नही!

असं म्हणायची वेळ येते .कारण सफर मध्ये आपण मुक्काम ठरवलेला असतो, पण मध्ये काय घडेल ते आपल्याला माहीत नसतं .

जमी पे ना सही ,आसमासपे मिल ,

तेरे बिना गुजारा ये दिल है मुश्किल !

सफर खूबसुरत हे मंजिल से भी!

असं ये दिल हे मुश्किल मधले एका गाण्यात नायक म्हणतो. 'सफर' म्हणून खूप लोकप्रिय आणि एकमेव अद्वितीय, असा राजेश खन्ना आणि शर्मिला टागोर यांचा चित्रपट आहे .

जिंदगी एक सफर है सुहाना ,यहा कल क्या हो किसने जाना? असे जिंदगी या चित्रपटात ,गीत गात राजेश खन्ना मृत्यू पावलेला दाखवलेला आहे. म्हणजे जीवनाचं अशाश्वत रूप सफर या शब्दात आहे.

माणसाच्या आयुष्यात प्रवासच प्रवास आहे कधी कामानिमित्त केलेल्या कधी शाळे निमित्त केलेला असतो.कधी पायी कधी वाहनांमध्ये कधी हवाई मार्गाने कधी समुद्रमार्गाने होतो.पण या प्रवासाचा आनंदच वेगळा असतो .या प्रवासाने जीवन समृद्ध होत असतं. वेगळे वेगळे अनुभव मिळत असतात.

सुहाना सफर और ये मौसम हसी!

हमे डर है कि हम खो न जाये कही !

असं म्हणत आनंदाने ,हसत बागडत दिलीप कुमार आणि वैजयंतीमाला गाण्यात, खुशीत जाताना दिसतात. प्रत्येक आनंदी सहलीच्या वेळी आपल्याला हे गाणं आठवत असतं.यम्मा यम्मा यम्मा यम्मा ,ये खूबसूरत समा!बस आज की रात है जिंदगी, कल हम कहा तुम कहा?हे जीवनाचे सत्य फार थोड्या सफरनामा लिहिणाऱ्यांना लक्षात येते.

या सफर गीतांनी छान अर्थ स्पष्ट केला आहे.विविध भावना व्यक्त झाल्या आहेत. सफरला जायची इच्छा अपूर्ण राहिली. युगे राहणार.जोपर्यंत तिसरा महात्मा जन्माला येत नाही.सफर आवडते म्हणून पर्यटन लोकप्रिय होतात. तसे पर्यटन करणे जमलं नाही तर, माणसे निदान पर्यटन विषयक पुस्तक तरी वाचून, दुधाची तहान ताकावर भागवतात .

सफरनामा लिहायची पद्धत फार पूर्वी सुरु झाली.परकीय प्रवासी विविध देशांना भेट देऊन प्रवासवर्णन लिहित असत. सिंदबादच्या सफरी या असंच अद्भुत वर्णन करणाऱ्या गोष्टी होत्या. न पाहिलेल्या प्रदेशाबद्दलचे आकर्षण माणसाला सफरनामा वाचायला उद्युक्त करत असतं . सफर करण्याची आणि सफर पूर्ण झाल्यावर त्याचं वर्णन लिहिण्याची पद्धत तेव्हापासून सुरू झाली.

कुठलाही सफर आनंददायी होण्यासाठी कोणीतरी हमसफर असावं, अशी अपेक्षा प्रत्येकाचीच असते .

हमसफर मेरे हमसफर पंख तुम परवाज हम किंवा ए मेरे हमसफर प्यार की राह पर चल पडे हम मगर क्या खबर ओ हमसफर मेरे हमसफर असं नायक नायिकेला उद्देशून गात असतो .'हमसफर'नावाची एक पाकिस्तानी सिरीयल सुद्धा होती, जी अप्रतिम गाजली होती.

"अब जाना मैंने ज़िंदगी क्या है,
सफर में भी हूँ लेकिन, जाना कहीं नहीं है।"
जिंदगी यु हुई बसर तन्हा
काफिला था और सफर तन्हा!मै तो युही सफर पे निकला था ,
एक अजनबी मिला उसने अपना बना दिया!
मंजिल तो मौत है ,सफर का मजा लो.
अभी थमा नहीं है सफर मेरा ,अभी खत्म नहीं हुआ हूँ मैं !
बाकी है सागर मेरेअंदर,छलका अभी तो गागरभर हूँ मै!
धीमा हो गया हूँ थोड़ा,पर थमा अभी नहीं हूँ मैं!
**

मुंबई स्पिरिट:

पूर्ण जगाचच लक्ष मुंबईकडे असतं .मुंबईला भेट देणं हे पूर्वी देखील पर्यटकांचे स्वप्न होतं, आता देखील आहे आणि पुढेही राहणार आहे. मुंबई ही एक जबरदस्त आकर्षण निर्माण करणारी मायानगरी आहे. माझी एक परदेशातली मैत्रिण, तिला मुंबई बघायला यायच आहे. तिला म्हटलं," तुला ताजमहाल ,राजस्थान, केरळ ,लडाख टूर करायची का?

तर ती नाही म्हणे ."मला मुंबई बघायची आणि गेटवे ऑफ इंडिया ला ज्या लाटा उठतात, लोक तुषार झेलत उभे राहतात ना ,ते बघायचं. गेट वे ऑफ इंडिया समोर फोटो काढायचा आहे .तिच्या घरात हॉलमध्ये तिन चक्क गेटवे ऑफ इंडिया चा फोटो लावलेला आहे" असं मुंबईच आकर्षण सगळ्यांनाच असते. मला तर मुंबईत पोस्टिंग एवढ आवडायचं की सी एस टी ला उतरलं आणि ते छान कोरीव काळ्या दगडातील भारी भारी इमारती ,पारसी अग्यारी वगैरे फाउंटन पर्यंत जाताना दिसली, अगदी मन शांत तृप्त व्हायचे . खडा पारशी ,पारशी विहीर, क्रॉफर्ड मार्केट ,आझाद मैदान, ओव्हल मैदान ,वानखेडे स्टेडियम सगळं बघितलं की मस्त वाटायचं. नरिमन पॉईंट ,महालक्ष्मी, गिरगाव चौपाटी, तारापोर वाला मत्स्य संग्रहालय एकदम मस्त! छान मन भरून बघावं असं आहे. त्या ऐतिहासिक वास्तूंसमोर उभे राहिले ना, जणु काय मला माझा पूर्वजन्म आठवायचा.

ठाण्याला अगदी घराजवळ जरी पोस्टिंग मिळाल तर, मला आता मुंबईला जायचं नाही याचं वाईट वाटायचे ,इतकी मला मुंबई आवडायची. मुंबई आहेच आपली अशी, सगळ्यांना मिठीत घेणारी!

प्रवासाचा कितीही त्रास असू दे ,ट्रॅफिक जाम किती असू दे ,मुंबईची गर्दी वाढत आहे,ती पण आता असू दे. पण मुंबई ती मुंबईच आहे. जीवाची मुंबई करायची ,दाजीबा मुंबई बघायची, ती गाणी म्हणूनच तर प्रसिद्ध आहेत. मी मुंबईची केळेवाली, मुंबई चा हवालदार, अशा मराठी चित्रपटांमध्ये पण मुंबईच प्रेम असतंच ना. .मुंबईतले खास एक वैशिष्ट्य तुम्ही श्रीमंत आहात गरीब आहात, तुमच्याकडे किती पैसे आहेत ,काही फरक पडत नाही. तुम्ही माणूस आहात .लोकं तुम्हाला अडचणीत मदत करतील. पाऊस पडू दे ,पाणी साचु दे,तुम्ही सर्व गर्दीतला एक बनून जाता.लोक जात धर्म लिंग भेदभाव सगळं विसरून ,फक्त मुंबईकर म्हणून त्या लोंढ्यांमध्ये मिसळून जातात .एक जीव होता. लोकल ट्रेनचा काय प्रॉब्लेम होऊ दे, बॉम्बस्फोट होऊ दे, प्रतिकूल परिस्थिती असू दे, मोर्चे निघू दे ,चालायला जागा नसू दे चालते. मुंगी एवढी पण पाय ठेवायला जागा नसू दे, पण मुंबईकर जीवनाचा आनंद घेतात आणि त्या आनंद निरंतर घेण्यालाच मुंबई स्पिरिट म्हणतात .हे मुंबई स्पिरिट फक्त आनंद घेण्यापुरतं नसतं ,संकटात कोणी असेल ना तर पटकन मदत करतात. दरवाज्यात कोणी चढत असेल, तर हात देऊन वर ओढून घेतात.

मुंबई अगदी पुराणकालापासुन महत्वाची होती.बाणगंगेचा तलावही लक्ष्मणाला ग्लानी आल्यावर रामानी बाण मारुन निर्माण केला, तेथे वाळुचे शिवलिंग तयार केले ते वालुकेश्वर.इतिहासकाळात महिकावती (माहीम) ही मुंबईची राजधानी होती.पायधुनीला आघोरींचे मंदिर होते, ते पायाजवळ धुनि पेटवुन ध्यान करायचे,फोर्टमधल्या टॅमरिंड स्ट्रिट, ॲश लेन, ओक लेन ही सगळीच नावे ब्रिटीशांनी तेथे लावलेल्या झाडांमुळे पडलेली नावे होती. मुंबईबद्दल एखादी पोस्ट किंवा लेख नाही पुस्तक लिहावे लागेल असे जगावेगळे शहर आहे.Wow.Great खूप छान. आणि खरंच मुंबईकर पॅनिक मध्ये येत नाहीत. अस शांत चालू राहते. एक सहकारी म्हणाला.मला तर मुंबई शाळेच्या दिवसांपासून आवडायची. प्रत्येक मे

महिना, दिवाळीची सुट्टी मुंबईतच जायची .पुढे कॉलेजलाही मुंबईतच होतो आणि नंतर तर मुंबईचा फौजदार झालो. सगळ्या वयाच्या नजरेतुन मुंबई पाहीली. एकुण ६४० चौ किमी क्षेत्रफळाचे हे ७ बेटांचे शहर काही औरच आहे. ह्या एवढ्या जागेत अनेक मुंबई शहरे आहेत. बँक कर्मचाऱ्यांची, राजकारण्याची, सिने स्टारची, बिझनेसमनची, चोराची, गँगस्टरची, वारांगनेची, तृतिय पंथियाची मुंबई वेगवेगळी असते. एका मुंबईचा दुसरीशी संबंध नसतो आणि ह्या सगळ्या मुंबईंमध्ये एकच माणुस सगळीकडे फिरतो तो म्हणजे मुंबईकर.

तो हॉटेल ट्रायडंटमध्ये जेवतो, आणि धारावीत आणि भायखळात देखील. मातोश्री समोर चहा घेतो, वर्षा बंगल्याकडे बघतो.घर,दालन, आणि कामाठीपुरा धारावी खोली समुद्र ह्या सगळीकडे तेवढ्याच सहजतेने वावरतो.मुंबईची जेवढी रूपे मी पाहू शकलो तेवढी पहाणारे विरळच असतील.गेल्या अनेक जन्मांची पुण्याई कामी आली आणि मी मुंबईकर बनु शकले.मुंबई आवडते.

तो एक जोक फिरायचा ना! की नरकात खूप हसणं खेळणं आणि विनोद भजन वगैरे चालले होते. तर त्या नरकातल्या अधिकाऱ्यांनी विचारलं" अरे काय चाललंय काय ते एवढे हसतात ?"तेव्हा त्यांना सहाय्यकाने सांगितलं, "साहेब मुंबईची माणसं आहेत, नरकात सुद्धा खुश राहतात."

पॅनिक होणे माहिती नाही, म्हणण्यापेक्षा परवडतच नाही. माणसांना यंत्रासारखे व्हावेच लागते आणि मग प्राप्त परिस्थितीत आनंद शोधण्याची मानसिकता होते.मग अतिवृष्टीत रस्ते तुंबले की आजुबाजुचे रहिवासी ,स्ट्रॅंडेड ट्रॅफिक मुळे अडकलेल्या वाहनातल्या लोकांना, चहा, बिस्किटे पुरवतात.चालु लोकल मधुन दाराला लटकलेला एखादा पडला की एक कटाक्ष टाकून ईश्वर मृतात्म्याला शांती देवो असे म्हणतात. आणि परत क्षणभर डोळ्यात नमी,(पाणी) आली, तरीही फोनवर बघणं

डब्यातली भजने, रमी डाव सुरु होतात.२००५ च्या लोकल मधल्या साखळी बाँब स्फोटांनतरही त्या लोकल नंतरच्या लोकल खचाखच भरलेल्या होत्या. नवीन माणूस मुंबईत आला कि ती गर्दी बघून असं वाटतं अरे आपल्याला हे झेपेल की नाही ?आपण गावी परत जाऊ या.

आम्ही सुद्धा ८७ साली मुंबईला आल्यावर ठरवलं होतं ,आपण आपलं गावी जायचं .आम्ही भाड्याचे घरमालकांना म्हटलं सुद्धा ,"अहो आम्ही एक दोन वर्षांनी मुंबई सोडून गावी परत जाऊ."

त्यावर आमचे घर मालक म्हणाले होते "आहो भाड्याचं घर घेतलंय, म्हणून तुम्ही असं म्हणतात. स्वतःचं घर घ्याल आणि मुंबईतच राहाल .या मुंबईत आलेला कुठलाही माणूस कधीही मुंबई सोडून परत जात नाही."

त्यांना मी म्हटलं" अहो त्या सी एस टीला लोकल रिकामी झाल्यावर कांदे बटाट्यासारखी माणसं बाहेर पडली."

" वाईट वाटून घेऊ नका. तुम्हालाही त्या कांदे बटाट्याचे एक व्हायचं आहे ."ते

मी,मी गरोदर असताना लोकल ट्रेनमधून प्लॅटफॉर्मवर पडले, तेव्हा तर ठरवलेलं उद्यापासून बिलकुल कामावर जायचं नाही. पण तस काही केल नाही सकाळी उठले आणि परत लोकल ट्रेनच्या स्टेशनवर गेले. कितीदा पर्स चोरीला गेली. घड्याळ चोरीला गेल, पाकीट ,जेवण डबे चोरीला गेले. मोबाईल गेले, मोठ्या पर्सच्या आतली छोटी पर्स चोरट्यांनी हळूच हात घालून काढली .कानातल्या रिंगा गेल्या .गळ्यातलं मंगळसूत्र गेलं. पण ती मुंबईची ओढ काही गेली नाही. कारण मुख्य म्हणजे माझं हृदय अस त्या मुंबईने चोरलं होतं.

लोकल ट्रेन सारख सोयीस्कर काहीच नसतं. रस्त्यावरून जाताना ,तर कुठेतरी ट्रॅफिक मध्ये अडकू शकतो ,लोकल ट्रेनने मेगा ब्लॉक नसेल आणि सगळं सुरळीत असेल तर जेमतेम एक तासात पोचाल. शिवाय स्वस्तात. मुंबईतल्या लोकल गाडीना जीवनवाहिनी म्हणून तर म्हणतात .सगळ्यात तेज आणि जलद जाणारा तो वहनाचा यातायात साधन असलेला, लोकप्रिय प्रकार आहे

आधी भय वाटत,मग नाईलाजाने मुंबईकर निर्भय होतात. लोक मुंबईत येतात,परत जात नाहीत.हे गुण हे कौतुक ह्यालाच मुंबई स्पिरीट म्हणतात. अगदी बॉम्ब स्फोट झाले आणि आदल्या दिवशी काही वाईट विचित्र घडले ना तरीही next day पासून ,लोकल ट्रेन गर्दी सुरू झाली होती.26/11 झाल तेव्हा माझ cuffe parade ला पोस्टिंग होत. लोक घाबरले होते पण लगेच दुसऱ्या दिवशीपासून जीवन सुरू झालं.

एक व्हिडिओ आला होता .2035 सालची मुंबई कशी असेल.म्हणजे मुंबई सगळी पाण्याने भरलीच आहे ,तर वॉटर टॅक्सी ,वॉटर ओला, एअरलिफ्टिंग ने मिळणारी पार्सल आणि एअरलिफ्टिंग ने दिले जाणारे वस्तु ,क्रूज ने नोकरीला जाणारे मुंबईकर ,गणेश विसर्जन पाण्याच्या वर ,पाणी भरलेल्या जागेवर तराफा टाकून त्यावर उभे राहून केले जाईल.पाण्यातून चालत वॉटर स्कूटर, रिक्षा सुद्धा वॉटर रिक्षा जात होत्या . छान व्हिडिओ होता. 2035 ,त्या कल्पक माणसाने बनवलं होतं .वाॅटर लॉगिंग पाणी तुंबणे कमी करू शकत नाही. ती मगर मिठी मुंबईला पडली आहे ,कचऱ्याची प्लास्टिकची ,गाळ साचलेल्या नद्यांची! मग तरीही सुधारणा म्हणून वॉटर टॅक्सी करून मुंबईकर आनंद घेतोय .असा तो व्हिडिओ होता .सगळेजण मला विचारतात,हे कोणी कुठुन बनवले आहे ?माझी काॅलर ताठ होते ! शिवाय मला मुंबई स्पिरिट विषय मिळाला लिहायला.स्वप्नातील..... मुंबई!!खुप मस्त विडिओ आणि त्याला साजेसे गाणे. मजा आली. पहायला रिमझिम पाऊस

पडे सारखा यमुनेलाही पूर चढे हे मराठी गाणं पार्श्वभूमीवर लावलं होतं. आपण मराठी आहोत त्यामुळे मराठी गाणी लावलं त्याबद्दल मला खूप आनंद झाला. नाही तर रीमझीम गिरे सावन किंवा मुंबई की बरसात का क्या है एतबार, अशी गाणी लावण्यापेक्षा रिमझिम पाऊस पडे सारखा, हे गाणं सुयोग्य होतं.

मुंबईत करोडो रुपये खर्च करून ,मॉलमध्ये खरेदी करणारी लोक सुद्धा ,ट्रॉली पाण्यातून वाहते आणि त्याच्यात खरेदी करतात, असं त्या व्हिडिओत दाखवलं होतं. तर फुटपाथ वर वडापाव खाणारे लोक देखील आहेत ,वडापाव विकणारे देखील होडीवर वडा पावची गाडी लावली आहे,असं दाखवलं. सुंदर व्हिडिओ होता. आपली मुंबईकर आपली मुंबई आपलीच राहिला पाहिजे आणि मुंबई स्पिरिट जपायला पाहिजे .

****

पुस्तकं मित्र[एकांताचे सोबती:

आयुष्याच्या प्रवासात साथी सोबती भरपूर असतात. पण वरवरचे.पण एकांतात मनाला साथ देणारे,सोबती उत्तम संगीत असतं चित्रकला असते अन्य कला असतात अथवा पवित्र विचार असतात,ई पुस्तक कागदी ग्रंथ असतात.रस्किन बोंड यांच आत्मचरित्र 'हिल ऑफ एन्चांटमेंट'इंग्रजी आहे.आज 90 व्या वर्षी देखील लेखक रस्किन बोर्ड कार्यरत आहेत.हिमाचल प्रदेश मधील मसुरी,या हिली (टेकडी मय)शहरात ते आपलं निवृत्तीचं आयुष्य आनंदाने घालवत आहेत.

मला सगळे, हि व्यक्ती ब्रिटिश फॉरेनर असेल असं म्हणतात, पण मी भारतीयच आहे असं रस्किन बोंड यांनी सांगितलं. पुस्तकांचा विचार म्हणजे साथी सोबती, मित्र अशा अर्थाने पुस्तकांचे वर्णन रस्किन बोंड यांनी केला आहे.गाजलेली पुस्तक :एक त्रुटी आली आहे ; 1. जादूची टेकडी ; 2. आनंदी कसे राहायचे ; 3. संतप्त नदी ; 4. छतावरील खोली ; 5. खोऱ्यातील भटकंती.

खरंच मला आठवतं करोना च्या काळात केवळ पुस्तकांच्या सहाय्याने, व्हाट्सअप वर येणाऱ्या,त्या युनिव्हर्सिटी चे पेपर वाचून आपण दिवस आनंदाने घालवले. वाचनालयात जाता येत नव्हतं वर्तमानपत्र येणे बंद झाली होती मैत्रिणींच्या भेटी घेता येत नव्हत्या,अशा वेळी पुस्तकांची सोबत माणसाला उपयोगी पडली. काही त्रुटी राहून गेले आहेत हे त्यांच्या पुस्तकाचे शीर्षकानुसार आपल्याकडे आयुष्यात काहीतरी त्रुटी कायमच उरलेली असते. कुणाला बोलवते, कुणी त्याच्याकडे दुर्लक्ष करतो.

कोणाला जर मित्र-मैत्रिणी असतील,मनुष्यांचा गोतावळा जर त्यांनी जमा केला असेल तर लोक म्हणतात त्याला माणसे जवळ करायची, लोक वशीकरणाची कला अवगत आहे.फायदा काढण्यासाठी तो माणूस,लोकांना वश करून काम करून घेतो. पण आपल्यासारख्या सामान्य माणसांना, ते जमेलच असं नाही ना! मग आपण काय करतो? ज्याला खूप माणसं आहेत, मदतीला जमली आहेत, त्याची ईर्षा करतो. मनातून खंतावतो. आपला हात पालथे आहेत,आपल्याला माणसं धर्जीने नाही,असं स्वतःला म्हणतो. पण त्या ऐवजी पुस्तकांची मैत्री करा. तब्येत बरी नसली की लोक नेहमी सल्ला देतात, जागा बदला. नवीन गावी जा.नवीन समूह मिळेल, नवीन मित्र मिळतील. बदल होईल.शरीराचे मनाचे कलेश कमी होतील. उरात भरणार काहूर कमी होईल. पण घर बदलणे दरवेळी सोपं नसतं. माझी एक मैत्रीण चकचकीत घर घेऊन तिथे राहायला गेली. जुन सामान जुन्या घरीच सोडून गेली.सुरुवातीला ते घर खूप छान दिसत होतं. नंतर हळूहळू हे उपयोगी पडते, हे लागतं त्याच्या वाचून काम साधत नाही.इथे मन लागत नाही,जुनी आठवण येते अशा कारणाने ती खंत काढत राहिले. जुन्या घरातलं जुनं सामान नव्या घरी नेऊन,नव घर सुद्धा पसारा झालं होतं..

एक कथा वाचली होती. नाव म्हातारीची तंबाखूची चंची. त्या कथेत देव सगळ्यांना म्हणतो की,

"तुम्ही जुनं सगळं पृथ्वीवर सोडा.मी तुम्हाला स्वर्गात सुंदर अस घर बांधून देतो. अट हीं कि जुनं काहीही आणायचं नाही."

सर्वजण तयार होतात स्वर्गाच्या दारात उभी राहतात.आता आपली स्वप्न समोर येतील,वाट बघत असतात.स्वप्नपूर्तीचे क्षण जवळ येतात आणि देव म्हणतो,

"तुम्ही जुनी एक वस्तु सोबत आणली आहे त्यामुळे तुम्हाला स्वर्गात नेता येणार नाही. "

सगळा शोध घेतला जातो.मग अस आढळत की ती वस्तू आहे,म्हातारीची तंबाखूची चंची!ती चंची म्हातारीने सोबत आणली असते. माणसाचा

पुनर्जन्म, माणसाचं नूतनीकरण, ते स्थलांतर तो बदल पण असाच असतो ना. पूर्वजनुक, ठसे भल्याभुऱ्या संस्कारांचे,आठवणी, चुका या पितृ ऋण या प्रकारात पितृ शाप या प्रकारात आपल्या सोबत येत असतात.म्हातारीची चंची, म्हातारी मेल्यावर सुद्धा परत समाजात कुठेतरी कथा बिजात मिळत असते. म्हातारीच कशाला,तरुण माणसं पण तसं तर आपण वागत असलेली बघतो या जुन्या आठवणी तर आपली एकांताची सोबत असतात.

मित्र बदलतात, सोबती बदलतात, नातेवाईक बदलतात, देहाचे आजार बदलतात. या आठवणी त्याच राहतात. फक्त बदल म्हणून आपण नवीन पुस्तक सोबती म्हणून घेऊ शकतो. पुस्तक हे खरे मित्र असतात. चंची सारखे ते आठवण सोबत आणते. पुस्तक ते भांडत नाहीत,साथ सोडत नाहीत.या एकांताच्या सोबत्यांची गरज आहे. जग एकाकी झालंय, सणावाराला पुस्तक खरेदी करत जा.

**

पवित्र रिश्ता:

माझ्या वाचकांशी ,मी कार्यक्रम ज्यांच्यासमोर करते त्या रसिकांशी माझा पवित्र रिश्ता असतो. अनेक वाचक रसिक मला त्यांच्या प्रतिक्रिया कळवत असतात .नियतीचे निर्णय वेगळेच असतात .नियतीच्या कोर्टकचेरीत वर्षानुवर्ष खटला लांबला ,तरी कधीतरी उशिरा का होईना न्याय मिळतो. नियतीच्या मनात काय आहे ते सुद्धा कळत नाही. असं म्हणतात काळाच्या पावलांना जाणणं ,म्हणजे मुंगीच्या पायातील घुंगरू चा आवाज ऐकणे एवढा अवघड असतं. अलकेमिस्ट मध्ये कसा तो लेखक म्हणतो "नियतीच्या कुठल्यातरी गोष्टीतून ,निसर्गाद्वारे देव त्याचा संदेश देतो." तसं मी समजते .माझे वाचकांच्या तर्फे मला सरस्वती देवी लिखाणाबद्दल सूचना करते.तर या काही प्रतिक्रिया!अनुभव.

1 एक प्रतिक्रिया अशी होती ,"मॅडम तुम्ही वेगळ लिहिता .'न' सांगितलेल्या गोष्टी आता सांगायचे आहेत. वर्षानुवर्ष आपल्याला असं सांगितलं जातं की जे चवीला चांगलं नाही की आनंददायी नाही ते तुमच्या आरोग्याला चांगले आहे. आणि जे चवीला चांगल आहे आनंददायी आहे ते आरोग्याला वाईट असू शकत. हीच गोष्ट मैत्रिणींच्या बाबतीत सुद्धा कधी कधी लागू होते. पण किती सहन करायचं ना ?कुठल आरोग्य त्यामुळे सुधारतं ?ज्यामुळे आपल्याला वारंवार अशी दुखावणारी कंपनी सोसावी लागते.

2)मैत्रीण शब्दाबद्दल लिहिताना दुसरी एक प्रतिक्रिया अशी आली की, मॅडम मजा म्हणजे आईला मैत्रिणींपैकी एकच तिच्या वयाची मैत्रिण होती बाकीच्या सगळ्या 25-40 वयाच्या होत्या.आई वय 80वर्ष [मी आणि माझी बहीण तिच्या

घरी तिला भेटायला गेलो होतो ,तेव्हा पण त्या विविध वयातील समूहात होत्या. त्या महिला खूप आनंदी होत्या.]

[समृद्ध माणसं ,फळाफुलांनी बहरलेली बाग,मात्र तिथे लोक देखील जमलेले नाहीत. तर सुंदर घर असते आणि बाहेर वॉचमन येणाऱ्या जाणाऱ्यांना हाकलत असतो,तर काय उपयोग?]

चांगली अशी घर असलेल्या पण अगत्यशील अशा मैत्रिणी आयुष्यात का येत नाहीत? त्या घरी आल्यावर, आम्हाला माहेरी आल्यासारखे वाटेल .इतके आदरातिथ्य की खरच आपण विचार करू शकत नाही. मी पण हे काही अंशी प्रयत्नपूर्वक बऱ्यापैकी साध्य केलं.घरीच अर्थात.

3)सोने, मोती, दाग दागीने सर्व काही आहे.

व सारे के सारे लॉकर मधे शांत झोपले.

अनेक कंपन्यांचे शेअर्स माझ्याकडे आहेत पण रोजचे जेवण त्यावर अवलंबून नाही ना,

पुढे किती आयुष्य आहे ? माहित नाही.

मेल्यानंतर कुठे जाणार ते ही माहीत नाही.

मी फक्त आज आहे व पुढील क्षणांसाठी मी सतत देवाचे आभार/नामस्मरण करून नियंत्याला वंदन केले पाहीजे.

4) गॅसवर दूध तापायला ठेऊन मी मधल्या एवढ्या मोठ्ठ्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी मोबाईल हातात घेऊन WhatsApp messages वाचायला घेते. मग मी डोकं गहाण ठेवून त्यामधे एवढी हरवून जाते की चालत चालत हॉलमध्ये येऊन मजेत सोफा वर पहुडले.अचानक दूध तापल्यावर माझ्या खालचा गॅस बंद करायला अजून कोणी येत का नाही असं दूध जोरजोरात त्याच्या फसफस भाषेत सांगत

असताना वर येताना बघते. मग एका टांगेत गॅस पर्यंत जाते. दूध उतू जाओ अथवा न जाओ . नवऱ्याला दोष द्यायची संधी सोडायचा नाही. थोडक्यात छोटं भांडण, बघत टाळायचं.

पण हे असं आधी व्हायचं.आता ह्यातलं काही करत नाही. दूध उतू गेल्याने ' कृष्णार्पण ' म्हणते. तिकडे अहोंच्या चेहऱ्यावरचे भाव . दूध उतू गेल्यावर तर दुःख असत शिवाय तो गॅस स्वच्छ करावा लागतो. पुसष्पास करावी लागते आणि परत जास्ती प्रमाणात वाया गेलं असेल तर दुसऱ्या दिवशी दूध आणायला जावं लागतं त्यामुळे एवढी मोठी काम वाढतात ना.चला मी वाचले.दूध ही थंडपणे ओट्यावर स्वातंत्र्य मिळाल्याच्या खुषीत स्वैरपणे वाहत असतं. मी तरीही आतून कमालीची शांत !!आध्यात्मिक उन्नती याहून वेगळे काय असणार !!

5)कुवारा बाप मध्ये असा एक प्रसंग आहे.तो मुलगा लंगडा असतो आणि रेस मध्ये पळताना मागे पडतो. तर वडील त्याला उचलून उरलेली रेस पूर्ण करतात. असे वडील मिळायला पण भाग्य लागतं .नाही तर काही घरोघरी वडील प्रेम करतात ,माया करतात पण मुलांवर स्वतःला वाहून देत नाही .राखीव राहतात .स्वतःचा फायदा बघतात

एक वाईट सवय आहे,कार्यक्रमाला जी वेळ देतात ना त्या वेळेच्या दहा मिनिटे आधीच मी जाऊन बसते आणि लोक इतकी आरामात येतात. तीनचा टाईम सांगितलं की साडेतीनला लोक तिथे हजर होतात आणि मला समजत नाही जाहिरातींमध्ये सुद्धा वेळ एक देतात. दुसऱ्या वेळी सुरु करतात.त्यात अजून तो निवेदक स्वतःची अक्कल पाजळणे, नमनाला घडाभर तेल वाहणे करतो.

7)वर्गातल्या सर्व मैत्रिणींचा विस्तार रिंगचा समूह केरळला आमच्यातल्याच एका मैत्रिणीकडे गेला पण नेहमीप्रमाणे आपली ,मला ती पडायची भीती आणि

आजारपण, म्हणजे सुखाच्या क्षणी काहीतरी मिठाचा खोडा पडतो किंवा खूप आनंद एन्जॉय करून आले ना ,की मला काहीतरी होतं. आजारपण येतं, नाहीतर मी दाराशी ठेच लागुन पडते. नाहीतर भाजी करताना बोट कापत. काय कारण हे कळत नाही .कदाचित माझंच माइंड फुलनेस वागण्यातला कमी होत असेल ,तर माहिती नाही पण सगळ्या गोष्टींचा एक वेगळंच वातावरण तयार झाले आहे .माझी संधी हुकली.मग मी वाचनालयात गेले.पर्यटनविषयक पुस्तक वाचून परदेशी गेल्याचाच आनंद घेतला.तुमचा फिराव वाटते अशा अर्थाचा लेख आठवला

एका मैत्रिणीने भेटायला बोलावलं. तिचा बंगला छान होता. केळीची झाड होती .भरपूर नारळाची झाड होती आणि ग्रुप ला तिने बोलवलं होतं .हिरवं गार समृद्ध असं होतं .एक गाणं आठवलं .त्या तिथे पलीकडे ,माझिया प्रियेचे झोपडे !

वळणावर नारळाचे झाड एक वाकडे!मजा आली.

8)एका चांगल्या कार्यक्रमाची शीर्षक देखील पवित्र रिश्ता आहे. पण दुर्दैवाने या पवित्र रिश्ता मधले चांगले चांगले कलाकार अकाली मृत्यू पावले. तुमच्या लेखांमध्ये कुठेतरी जीवन लहान आहे, असं दाखवणारा संदेश असतो ते आठवलं.

9)मी गणेशोत्सवात तुम्ही मला दिलेली साड़ी एकदा नेसले होते. खूप छान वाटले. साडीचा texture feeling खूप आवडला. नेमकी फोटो काढायला नेहमी प्रमाणे विसरले.परत कधी तरी नेसेन तेव्हा आठवणीने फोटो काढीन व तुला पाठवीन. जीवनात कष्ट करण्यात दिवस गेले. घरी स्वयंपाक पाणी करायचं नवऱ्याचं औषध डबा डुबा भरायचा. नोकरीवर पळायचं .तब्येत खराब झाली .आता मैत्रिणी मैत्रिणी ठरवतात एखाद्या देवळात जाऊन येताना एखाद्या मॉलमध्ये जेवण करून येऊ एखाद्या गजानन महाराजांच्या मंदिरात निवांत बसू .इस्कॉन टेम्पल मध्ये काहीतरी खूप खास कार्यक्रम आहे ,तिकडे जाऊ. एक्या मॉलला जाऊन काही सामान खरेदी

करू तिथलं पण जेवण इंटरनॅशनल स्टॅंडर्ड असतं तिथे जाऊ या आणि जेव्हा हे असे कार्यक्रम ठरतात, तेव्हा माझी तब्येत बिघडलेली असते. काय शाप आहे की काय देव जाणे. पण मॅडम तुमच्या वाचनाने मी सगळं दुःख विसरून वेगळ्याच विश्वात जाते .

10)सुखाच्या सरींनी मन माझे बावरे वगैरे या गोष्टी मालिकांमध्येच असतात .प्रत्यक्षात सुखाच्या सरी जेव्हा कोसळायची वेळ येते तेव्हा आमचं काहीतरी दुखत असतं. लोक अब्रोड जातात, कुठे कुठे जातात. एका मैत्रिणीने माझ्यासाठी गजानन महाराजांचे खूप मोठ्या मंदिरापाशी सुंदर खोली बुक केली होती.इच्छा की मी आठ दिवस मी आणि माझी ताई जाऊन राहू. पण इतकी तब्येत बिघडली की कसं काय करायच?खरं तर देव आशीर्वाद पण प्राप्त झाला असता .निसर्गाच्या सानिध्यात राहता आलं असतं .आयत जेवण खान मिळाल असत. आरोग्य वाढल असतं. पण इथून तितकं जाण्याएवढी सुद्धा शक्ती नव्हती .मग काय घर आहे की,घर एक घर !नोकरीच्या दरम्यान घरात राहायला मिळालं नाही ना ,म्हणून देव केवळ घरातच रहा असं सांगत असेल .त्या घराच्या आत्म्याशी एकरूप हो ,त्या घरात मन भरून श्वास घे असं सांगतोय. मॅडम तुमच्या लिखाणामध्ये नेहमी घराबद्दलचं प्रेम असतं तुमच्या त्या लेखाची आठवण करून मी माझी हाऊस अरेस्टचे म्हणजे घरात कोंडून पडण्याचे दिवस आनंदात घालवले.

11) युट्युब वर तुमच्या सगळ्या कार्यक्रमांचे व्हिडिओ आहेत. 1मुली जन्माला येऊ द्या. मनाची मशागत. नाते शब्दांचे. 4तलावा काठी कविता.5 लेखक आपल्या भेटीला.: हे एकपात्री प्रयोग आहेत. सूत्रसंचालनाचे व्हिडिओ नाहीत.मॉरिशसला नृत्यधारा या संस्थेतर्फे सादर झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलं होतं ती सीडी आहे ते युट्युब वर नाही.ते इंग्लिश मध्ये होतं.आवडले.

12)आयुष्यात जिथे पर्याय म्हणून कोणी नसतं, तिथे उत्तर म्हणून स्वत:च उभं रहायचं असतं.

एक वृद्ध मला सांगायला लागली की मुलांशी पटत नाही. मुलं आई-वडिलांना बालक समजायला लागतात आणि आई-वडिलांना शिस्त लावायचा प्रयत्न करतात. मुलं हे का जाणून घेत नाहीत, की आई-वडिलांना त्यांच्या स्वतंत्र आवडीनिवडी आहेत .पालकांच स्वतंत्र विश्व आहे, तिथे त्यांना खुशीत राहू द्यावं. मी दुर्लक्ष करते. त्यामुळे हळूहळू पुढे जाणून घेऊन, आईला काय करायचं ते करू दे आपण आपलं करू या ,असं मुलं म्हणू लागली. काळ खूप संघर्षाचा होता यावेळी मला तुमचे पुस्तक वाचल्यावर बरेचसे अनुभव आणि तो मानसिक ताण समजला.

13)दुसरी एक रसिक वाचक नेहमी मला म्हणते "तुम्ही पावसाबद्दल इतकं चांगलं लिहिता ,आहो पण पावसाने वीट आणलाय आणि संध्याकाळी बाहेर जाण्याची वेळ असते तेव्हाच अगदी इतका धो धो येतो की नुसतं जिन्यातून खाली उतरल तरी भिजायला होईल. चांगली शुद्ध हवा यावी म्हणून खिडकी उघडली ना, तर एका सेकंदात घरात पाणी शिरत आणि हाॅल पुसत बसावं लागतं. दिवसभर चिपचिप वाटत राहतं."

14)आमच्या ऑफिसच्या मैत्रिणी एकत्र आमच्यातली एक मैत्रिण केरळाची होती. तिच्या घरी पंधरा दिवस राहिल्या गेल्या. मला तब्येतीमुळे जाता आलं नाही .त्या मजा करतात. मला भीती बाहेर काढून टाकायला हवी किंवा मानसिकता! तुमचे अनुभव आम्ही भीती कमी करायला वापरतो सावधान रहातो. अस करता येत नाही ना सोपं नसतं ते.

15) मॅडम तुम्ही म्हणताना, वाटेल ते चित्र काढत जा .मन मोकळं होतं .तस पितृपक्षात आता 8-15 दिवस, रोज कावळ्यांची चित्र काढायची असं ठरवलं आणि चक्क तसं आज तरी केलं!

चित्र काढल्यावर कॅप्शन वर विचार करत होतो, पक्ष पंधरावड्या चा हिरो असे शीर्षक साधेसुधे वाटले. मग बायबल मधल्या कावळ्या च्या संदर्भातले वाक्य समोर आले, 'कावळा धान्य पिकवत नाही, साठवत नाही, देव त्याची सोय करतो. (आपण माणसं तर देवाची लाडकी मुलं आपल्याला पोट भरण्याची काळजी वाटायला नको) ' अश्या आशयचे ते वर्णन होते.

मी चित्र त्या कॅपशन सह इन्स्टा वर पोस्ट केले, थोड्याच वेळात एक गायक मित्र जो अभंगांचा अभ्यासक पण आहे. त्यानी तुकाराम महाराजांची एक ओवी पाठवली.पक्षीयाचे घरी

नाही सामग्री ,त्याची चिंता करी नारायण! कुराणातील अशीच एक सुरा आहे

"आणि किती जिव स्वत:च्या प्रोव्हिजन्स सोबत बाळगतात? अल्लाच सगळ्यांची व्यवस्थ करतो, तो सगळे जाणतो."

खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे.कोणतंही नातं बनवणे अगदी मातीवर लिहीता येईल इतकं सोपं आहे.पण निभावणं.अगदी पाण्यावर लिहिण्या इतकं कठीण आहे..!

16)एका पुरुषाने सांगितलं गृहिणी होण्यातला आनंद मला देखील समजला. छोट्या छोट्या गोष्टी साफसफाई करून वापरता येतात .शिवून धुऊन वापरतात. त्यापूर्वी नोकरी करत असताना आम्ही दोघं नोकरीवर जात असताना चक्क फेकून द्यायचं. थोडी खराब झालेली पिशवी मोलकरणीच्या तोंडी दिली जायची. आता आम्ही ते थोडं काटकसरीने बचतीने निगुतीने वापरतो. 17)माझ्या पुस्तकाचे

प्रकाशन आहे आणि कार्यक्रम आहे तिथे त्यामुळे मी सूत्रसंचालन करू शकत नाही. म्हणून कोणीतरी हवं. म्हणून काही जणांना विचारलं अगदी साध्या लोकांनी पण मानधनाची अपेक्षा व्यक्त केली .एरवी कितीतरी जण आम्हाला कार्यक्रम द्या, असं म्हणतात.पण पैसे मानधन मिळणार नाही म्हणून बोलायला तयार होईना. समाज कार्य करणाऱ्या संस्थांकडून काय अपेक्षा करतात.

18)एका पुरुषवाचकाने मला टीका करत असे म्हटले," की मॅडम तुम्ही ना सैरभैर झाला आहात. पाखरे कशी स्वतःच्या घरट्यात विश्रांतीसाठी परतण्यापूर्वी, आभाळात बराच वेळ भिरभिरतात. जणू काही त्यांचे ध्येय पूर्ण व्हायचं असतं. जुनं काही सोडवत नव्हतं आणि नवीन काही मिळत नव्हतं .जणू त्यांना घरी परतायचं नसतं किंवा जणू काही त्यांना स्वतःच घर सापडत नसते. तिन्हीसांज त्यांना बोचत असते की काय कोण जाणे. पण अंधार पडला की गपचूप ते कुठेतरी विश्रांती घेत असावेत. असं तुमचं झालंय .तुम्ही एखादा गुरु करा. अध्यात्माकडे वळा. तुमचं मन शांत होईल."

19)आज बरेच दिवसांनी नाना नानी पार्कमध्ये आले. पाचच मिनिटे डोकावले .तुमचे सगळ्यांचे हसरे ,आनंदी चेहरे आणि छान छान गाणी ऐकून ऊर्जा मिळाली. सर्व सहकारी मंडळींचे धन्यवाद मानले. तुमचं वाक्य आठवलं "एकट किंवा सहकार्यासोबत किंवा समूहात ,आहे त्या परिस्थितीत आनंदाने राहावं. तुमचा लेख आठवला."

20)आपल्या रोजच्या कामातनं आणि आवश्यक त्या घटनांमध्ये गोष्टींमध्ये वेळ मिळत नाही. मजा करणे हे तर खूपच दूर !कधीतरी थोडसं काहीतरी वाचलं ,तर ते मनात रेंगाळत राहत आणि त्यामुळे आम्हाला प्रेरणा मिळते. तुमचे लोकसत्तातील लेख मी आवर्जून वाचते.

21 एका नात्याचा संपणे हे फक्त एकाच नात्याचा संपण नसतं.त्यां नंतर त्या संबंधिताच्या परिसरातील पंधरा-वीस नात्यांवर त्या नातं बिघडण्याने फरक पडत असतो.

22)आपण गोड बोललो चांगलं वागलो तर आपलं चांगलं देखील होऊ शकतं . ही संकल्पना किती भारी आहे ना!थोडा संवाद झाला ना की आनंद दुपटी नी वाढतो! प्रयत्न करून बघते.

23) तब्येत ठीक होती ,अंगात जोर होता तेव्हा अस पुस्तक यायला हव होत ना! आता झेपत नाही. मैत्रीण आता सत्तरीला आली.ठाण्यातल्या ठाण्यातच किरकोळ कार्यक्रमांना फक्त जाते. सॉरी!

असेल माझा हरी तर देईल खटल्या वरील असं करून बरीच माणसं बसून राहतात. पण नुसती बसून राहत नाही इतक्या काही पैकी काही चतुर असतात. ती हातातल्या मोबाईलवर बोट चालवून रिमोट कंट्रोल ने सगळी काम स्वतःच्या मनासारखी करून घेत असतात. तुमच्या लेखातही वाचून मला पूर्ण पटलं .

23 तुमच्या बऱ्याच लेखात तिन्ही सांजेच्या वेळी मन सैरभैर झाल्याचा उल्लेख असतो .तिन्ही सांजेला आकाशात पक्षी घिरट्या घालत असताना ,थोडा वेळ झाडावर ओरडत असताना आणि नंतर डोळे मिटल्यासारखे करून ढोंगीपणा करून गपचूप बसलेले असताना, देखील बघायला मला आवडतं .तुम्ही सांगा तिन्ही सांजेच्या वेळी जेव्हा मन कातर होत तेव्हा काय कराव? पण निसर्ग मात्र फार सुंदर असतो.माझे प्रश्न मला आहेत तरीही शक्यतो इतरांना न दुखावता मी माझ्या परीने आनंद घेत ,इतरांना आनंद द्यायचा प्रयत्न करते.

आपण पवित्र रिश्ता ठेवतो, पण काही कारणाने तो रिश्ता तुटला तरी मन आंबट झालं, तरी खूप वाईट वाटत राहतं. ते वाईट वाटणं मनात रेंगाळत राहत. मी

परमेश्वराला नेहमी सांगते की मी माझ्या मनाशी प्रामाणिक आहे.एकदाही मनात किंतु नाही.माझा तर जीवनाशी तो रिश्ता पवित्र होता. पैशासाठी नातं तोडणारी मी नाही. खरं सांगायचं तर फार मोठे पैशाचे व्यवहार मी माझे पैशात आयुष्यात कधी केले नाही.नोकरीत काय ते पैशाशी संबंध आला तेवढाच होता.बाकी माझा सगळा कार्यकाल हा मन या केंद्रबिंदू च्या आजूबाजूच्या परीघ परिसरात फिरण्यातच गेला .जे सोडून गेले त्यांचेबाबत खंत कडवाहट आहे. पण,त्यांचे सोबत सुद्धा मी पवित्र नात्यातच राहिले. प्रामाणिक राहिले आणि जीवनात जे भेटत गेले ,त्यांच सुद्धा मी हितच केलं .स्वतःच्या फायद्यासाठी कुणाला दुखावलं असेल तरी मीच्छामी दुःक्कडम् म्हणून माफी पण मागितली.असाच पवित्र रिश्ता आयुष्यभर माझा देवा सोबत चालू राहू दे .हे माझ्या आयुष्याचे ध्येय आहे .असा माझा पवित्र रिश्ता परमेश्वराशी आहे.

माझी दुःख आत दाबून हा पवित्र रिश्ता जपायचा प्रयत्न करते .इतर कुणाला ते कळो न कळो ,परमेश्वराला माहिती आहे कारण माझा पवित्र रिश्ता ,त्या परमेश्वराशी आहे..

***

फ्रेनेमी:

फ्रेनेमी हा एक जेन झेड चा ,म्हणजे नव्या पिढीचा ,आधुनिक असा नवा शब्द आहे .म्हणजे फ्रेंड प्लस एनेमी म्हणजे मित्र +शत्रु,मित्र असूनही शत्रू! फ्रेनेमी हा एक इंग्रजी शब्द आहे .त्याचा अर्थ फ्रेंड आधी होता ,आता एनेमी?की हे दोन्ही मिळून फ्रेनेमी शब्द तयार होतो .काही मित्र शत्रुवत वागतात .काही शत्रू मित्र बनतात .म्हणून तो फ्रेंड चा ट्रेंड बदलतो.

फ्रेनेमी हा शब्द नवीन प्रकारे शोधला गेला.

'दुश्मन ना करे दोस्त ने वो काम किया है ,

उम्रभर का गम हमे इनाम दिया है!' असं म्हटलं जातं.

कधी काही मैत्रिणी अचानक गायब होतात बोलेनाशा होतात. त्यांच्या मैत्रीबद्दल शंका यायला लागते मग आपण त्यांची चौकशी करतो

"सगळ्या सख्या गार पटल्या? का पावसात भिजल्या? दूरियां क्यों? बरेच दिवस झाले काहीच पोस्ट नाही? आजारपणाचे सबब काढू नका. माझं तर रोज काहीतरी दुखतं आणि रोज सगळं काम काहीतरी डबल काम चालू असतं. दूध उतू जाणे अधिक स्वच्छता करावी लागण पाहुणे येणे हे पण सोसावं लागतं. पण मी आपली गाडी ढकलते."

मैत्रिण लिहीते ,"आता असेच आहे !माझे पण पाय खूप दुखतात तरी पण शाळेत गेले की बरे वाटते. तेवढ्या काळ काही दुखत नाही. मी प्रत्यक्ष बोलते त्या

शाळेतील.मुलांशी!ही शाळेची मुले आणता येतील का तुझ्या घरासमोरच्या बागेत सहलीला याचा विचार करते."

माझा स्वभाव तसा वाईट आहे. मला शत्रूची पण आठवण येईल आणि शत्रूची पण दया येईल. खंजीर खुपसलेल्या मित्राला पण मी महात्मा गांधी बनुन माफ करेल.मग मी लिहीते.

"ताई तुझी खुप आठवण येते .ये ना एकदा ठाण्याला भेटायला! मी नेहमी यायचं ठरवते पण काही ना काही कारण निघून तब्येतीमुळे जमतच नाही.ताप आल्यापासून तर अजून भीती वाटते. असं वाटतं भाऊ किंवा आई, असते तर नक्की त्यांनी कुठल्यातरी डॉक्टरकडे नेलं असतं. हे औषध घे म्हणून सांगितलं असतं.भाऊंनी आणि आईने आमच्यासाठी खूप केलं आहे मी कृतघ्न नाही. मला जाणीव आहे. शिवाय तुझं एकटेपण तुझे प्रश्न पण मला समजू शकतात .काळजी घे. फोन करत जा. पति पंधरा दिवस अब्रोड गेले होते. मी एकटीच होते तेव्हा पिशवी पण भरून ठेवली होती की तुझ्याकडे यायचं .पण खूप इन्फेक्शन चा त्रास होत होता म्हणून टाळलं."

उत्तराची अपेक्षा ठेवून आपण वाट बघत बसतो पण सगळ्या हाकांना प्रतिसाद येतोच असं नाही.

विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले, असं करून मित्रांची ,नातेवाईकांची मुलांची अशी सगळी काळजीच आपण वाहत असतो .माझा लेक मला म्हणतो ना "डिफॉल्ट मोडवर काळजीच करत असते." पण काय करायचं ?स्वभाव!आणि ह्यातले जे मित्र ज्यांची आपण अतिशय काळजी करतो ते पाठीमागे हिला काय पडले माझ्या तब्येतीशी? असं देखील म्हणतात. म्हणजे साधीसुधी तब्येतीची काळजी आणि चौकशी करणे देखील चूक आहे .

माझ्या एका दूरच्या भावाला मी ,"तब्येत कशी आहे ?"असा साधारण पहिल्या प्रश्न फोन केल्यावर विचारत असे. तेव्हा :,"आम्ही काय नेहमी आजारी असतो का ?नेहमी उठ सुट तुम्ही आमची तब्येत विचारता ? "असं म्हणाला तेव्हापासून मी हवा पाणी विचारायला लागले. पण तरी काय पूर्वापार पद्धतीने तब्येत काय म्हणते? हवा पाणी काय म्हणत? असंच आपण चौकशी करतो ना.

काही घरी काही मैत्रिणीकडे काही कार्यक्रमाला आपण जे जातो ना,ते तिथे बरं वाटावं म्हणून जात नसतो .तिथून घरी आल्यावर खूप बरं वाटतं .आपलं घर खूप चांगल आहे, आपली माणसं खूप चांगली आहे, असं वाटत. आणि त्यासाठी त्या नकोशा ठिकाणी मग ईतरांच्या घरी आपण जात असतो.

काल केबीसी वर एका बाईने सांगितलं की ,"मला लोक सारखी टोचून बोलतात मला पुढे येऊ देत नाही .माझं मन आनंदी असलं तरी त्या क्षणाला माझा आनंदाचा फुगा फोडतात .जशी खेकडे असतात ना कुणालाच वर येऊ देत नाहीत टोपलीत ठेवलं की एक दुसऱ्याचा तिसऱ्याचा पाय ओढत राहतात. तशी माणसं दुसऱ्याच्या सुखाच्या क्षणी देखील, मनभेद करत बोलत राहतात आणि ही माणसं परकी नसतात परिचित असतात.

लग्न आणि मूल होणे आणि घर ,या तीन घटनांचे आरीवरती बहुतांश शुद्ध दुःख फिरत असतात. परकीय व्यक्ती लग्न झालंय का, मुलं किती आणि घर कुठे आहे हे तीन प्रश्न विचारते. त्याच्यावर आपण काही उत्तर दिले की गप्प बसते .पण जवळच्या व्यक्ती मात्र ह्या मुद्द्यावर कुरतडत राहतात .

दोस्त दोस्त ना रहा प्यार प्यार ना रहा! हे तर आता जुनं झालं आता दोस्तांचा मुखवटा घालून शत्रू येतात. बुद्धिबळाच्या खेळामधील सोंगट्या मध्ये काळे आणि पांढरे स्पष्ट ओळखू येतात. म्हणजे आपले कोण परके कोण, आपले प्यादे कोणते

,शत्रूची प्यादी कोणती ,हे स्पष्ट लक्षात येतात .पण प्रत्यक्षात कोण मित्र कोण आणि शत्रू कोण हे ओळखू येत नाही. त्यामुळे जीवनातील बुद्धिबळाचा पट हा जिंकण्याच्या बाबत ,जगण्याच्या बाबत ,खेळण्याच्या बाबत दैववादी म्हणून अज्ञात असतो.

जास्ती भावनाप्रधान राहू नको ग लोक वेडे करून सोडतील असा सल्ला देणारे सुद्धा कधी आपल्याला झटकून फायदा काढून आपल्या डोक्यावर पाय ठेवून पुढे जातात अगर दोस्त ऐसे है,तो पता नही दुश्मन कैसे होंगे? त्यामुळेच फ्रेनेमी मी ही संकल्पना उदयाला आली.

**

अरे घरोट्या घरोट्या:

अरे घरोट्या घरोट्या माझे थकले रे हात,

तरी माझ्या संसाराचं गाणं मी बसले गात!

फार वर्षांपूर्वीची ही एक ओवी/चार ओळी अजून किती लागू आहे ना !घरोट म्हणजे जातं! पूर्वीच्या काळी जात्यावर दळण करावं लागायचं. बाई भल्या पहाटे उठून ते सगळे ,एवढ्या लोकांसाठी धान्याच दळण करत असायची .

तिचे हात दुखले, दुखावले , तरी ते धान्य तिने दळायला हवं.पीठ तयार हव . शिवाय ती आपल्या दुःख कुणाला सांगणार ?म्हणून ती त्या घरोट्याला सांगते .अरे घरोट्या घरोट्या, म्हणते हात दुखले आहेत .पण तिच्या हात दुखले हे ऐकायला सुद्धा मानवी भाव असलेले, माणुसकी असलेली व्यक्ती शोधणे अवघड असतं.

हल्लीच्या दिवसात आपण म्हणतो ना ,रोज कामाचं दळण चालूच आहे .ऑफिसमध्ये काम ,घरचं काम,रहदारी,प्रवास! बाई ऑफिसमध्ये काम करून घरी येते ,ती आराम करण्यासाठी येत नाही. सेकंड शिफ्ट मधलं घरचं काम तिची वाट बघत असत. असं घरोटं म्हणजे ते चक्र हे आयुष्यभर चालूच राहतं.काम करणारे बाईला कधीच विश्रांती मिळत नसते. घरोट म्हणजे जात किंवा रुटीन अशा अर्थाने मी हा घरोट शब्द वापरत आहे.आपल घरट्यासारखं घर चालवणारे, घरट्यासारखं वरती उघडे आणि जिथून आपण धान्य टाकतो ,ते तोंड असलेले घरोट होतं. जात्यावरच्या ओव्यांमध्ये खूप मोठा अर्थ साचलेला आहे. पूर्वी जात्यावर दळण करणारी स्त्री आजही घरगुती कामाचं दळण दळतेच आहे. उलट तिच्या वरची जबाबदारी अधिक वाढलेली आहे.तर साधारणपणे बायकांना बरेच आजार

लागलेले असतात. काहीतरी दुखत असतं. पण ती रेटत असते. नवरा व्यायाम करून येतो .बाहेर वॉकला जाऊन येतो आणि घरात आल्यावर पाणी मागतो .ते पाणी स्वतःच्या हाताने तो घेत नाही .ते पाणी बाईने द्यायचं असतं .

परवा एका कार्यक्रमाला गेले. हल्ली हल्ली बघितलेली एक वृद्ध स्त्री, एकदमच गलितगात्र झाली होती. तरी काठी घेऊन ती गाण्याच्या कार्यक्रमाला आली होती .वेगळ्या प्रकारे जिभेने बोलत आणि हातवारे करत ती मला सांगायला लागली ,

"मन रमत.बर वाटत.जुन कोणी भेटत.बदल होतो. म्हणून आले या कार्यक्रमाला मी बघा."

"ठीक आहे "मी म्हटलं.आजार अपघात वेळ कोणावरही येऊ शकते .अशा परिस्थितीत सुद्धा बाईला 'बाहेर जाऊ या' असं का वाटतं? कारण की 'नाही जगात झाली कौतुक या जीवाची', म्हणजे ह्या जगात तिचं मोल झालेलं नाहीये .

काम*किरकोळ काम चहा करणं, पाव्हणं आल्यावर पाणी देणे. जाता येता भाज्या फळ ब्रेड आणणं. एखादी वस्तू आणा सांगितली ती आणण.त्यांनी किरकोळ बिल भरणे ,थोड नातेवाईकांशी औपचारिक का होईना फोनवर बोलणं, हे काम देखील पुरुष करत नसतात. ही काम बायकोला सांगतात. अग तू आमक्याला फोन कर आणि तिकीट काढ.

पुरुष काय करतात. टीव्ही बघत राहतात मोबाईल बघत राहतात. मित्रा बरोबर सहली करतात .नाहीतर मित्रांशी बोलतात. पण जबाबदारीची सगळी काम बायकांवर लादतात. मुलांच्या जबाबदाऱ्या, मुले जर ऐकत नसतील तर हो तू मुलांना वळण लावलं नाही, असं म्हणून परत तेही काम बाईवर लादलं जातं. घराची जबाबदारी ,मुलांची जबाबदारी बाई टाळू शकत नाही .ती आयुष्यभर राबतच

राहील. नवऱ्याला स्वादिष्ट जेवण मिळतंय ,पण बाईला बदल म्हणून कधीतरी येताना, पार्सल आणावं ,दोन वस्तू आणाव्या एवढी प्रगल्भता आज त्या कुटुंबात नाही .त्यामुळे कोणाकडे जेवणाचा आमंत्रण आलं तरी एक बदल म्हणून जावस बाईला कधी कधी वाटतं .जो तो आपल्या घरी खाऊन पिऊन खुश असतो पण तरी माणसाला ,बाईला, बाई माणसाला ,कधी बाहेर पडाव अस वाटत राहते.बाहेरून थकून आलो म्हणून पुरुष आराम करून झोपतो. बसतो .पण बाई मात्र राबत राहते .

आता परत सखाराम बाईंडर परत स्टेजवर आणून गाजवुन त्यांना काय दाखवायचे ?अस की बायकांची परिस्थिती अजून अशीच आहे! हे दाखवायचे? जेवल्यावर स्वतःचं ताट उचलून खरकट फेकणे, एवढी सुद्धा मदत जर तुम्ही घरच्या गृहिणीला मदत करणार नसाल तर तुमचं सगळंच वर्तणुकीचा पुनरावलोकन करायला हवं.

शो:एका घरी सगळीकडे श्रीमंतीचा शो होता . घरी पाहुणे म्हणून मी गेलेले असताना ,त्या घरची मालकीण उपमालकिणीला म्हणजे सून सासूला म्हणत होती," दिवसातून चार वेळा डायनिंग टेबल पुसत जा .तरी तुमचं जीवन सार्थक लागेल. नुसत्या टीव्हीसमोर बसून राहता ."

वय उतरल्यानंतर ही ,बाई कडून अपेक्षा असतात. म्हणजे बाईने राबतच राहायचं .त्याविरुद्ध सकाळपासून नऊ वाजेपासून जे त्या घरच्या गृहस्थांनी टीव्ही चालू केला होता.इतका की कान बहिरे होतील इतक्या जोर जोरात तो टीव्ही लावला होता . चहा नाश्ता खाणं पिणं औषधाच्या गोळ्या बायकोने त्याला देणं, हे सगळं त्या टीव्हीसमोरच चालू होतं आणि

" कानाने बहिरा मुका परी नाही!" हे आपल्याला माहित झाले. त्यामुळे तोंडाने मध्ये मध्ये 'अग चहा आण, पाणी आण, काय ग जेवण जमल नाही."बोलत

होता.औषधा बरोबर जेवण सुद्धा त्याला त्या टीव्ही समोरच हव होत.खात होता ताटातलं पण मीठ कमी झालय, आणतेस का ?[त्याला उठता येत नाही का] असं करत करत तो कानाने बहिरा माणूस तोंडाने बडबड बडबड करत होता . एवढ्या मालिकातल्या शो सारख्या असणाऱ्या पॉश घरात जर ही परिस्थिती ,तर अन्यत्र काय असेल?

मोजमाप*बाई किती काम करते, हे गृहिणीलाच कळतं. हाताखाली चार नोकर जर असले [तशी शक्यता कमीच असते.]" तू घरीच आहेस निवृत्त झाली आहे .कशाला नोकर हवे . इतरांच्या हातच मला खायला आवडत नाही." असे ऐकवलं जातं.

माझी एक मैत्रीण होती ती कोरोना काळात वारली .अतिशय आजारी असायची. तरी "आम्हाला ना बाहेरच खायला आवडत नाही .हे ना ह्यांना तव्यावरची पोळी लागते .माझी भाजी सगळं लागतं." असं करून राबत होती. ती करोनात वारल्यानंतर घरच्या कुटुंबाला बाहेरचा डबा चालू लागला. मग ती जिवंत असताना बाहेरचा डबा खाल्ला असता ,तर काय ह्यांना फरक पडला असता? पण हेतु काय, की बाईला आराम करु द्यायचाच नाही.राबवायच,चीडायच आणि किंवा त्या सेवा मिळण्याच्यासाठी तिला चढवून ठेवायचं.खर तर ,'तुझ्यासारखी चव कुणाच्या हाताला नाही' हे तर सगळ्यात मोठं आणि खोटं आणि भ्रामक वाक्य असतं .ज्या खोट्या कॉम्प्लिमेंट वर बाईला नाचवलं जात .नोकराने काम केल तरीही बाईला नंतर त्या नोकरांनी अर्धवट सोडलेला काम ,परत स्वच्छता करायला किंवा थोडी मदत करायला मेहनत घ्यावीच लागते .माझी बाई गेल्यावर मला पाच मिनिटे तरी काम असतं .कारण की ती किचनच्या सिंक मध्ये मेथीचे पान अडकून ठेवते. तिने मॉप ने पुसलेला असत त्याच शित दोरे तर कुठेतरी पडलेला असतात. जाताना तिने कचऱ्यात भरलेली भाजी बाजूला सांडलेली असते .भांडी ओट्यावरच पलटी

मारलेली असतात ,जी मला परत जागेवर लावावी लागतात. अशी अनंत काम बाईला असतात .पण पुरुषाला काय वाटतं ,"स्वतः जेवून बसलो म्हणजे आता सगळं झालं समजतो." जेवुन स्वतःच खाऊन झाल्यावर ,बायको जेवण करुन किंवा वाढून घेऊन आत येईपर्यंत त्यांचा टीव्ही सुद्धा पॉज होत नाही ,कारण की त्यांचं सगळं लक्ष त्या टीव्ही आणि मनोरंजनात असत. जाहिरातींना म्यूट करण्याचे सौजन्य सुद्धा कित्येक घरी दाखवलं जात नाही .इमारतीत घरोघरीचे टीव्हीचे आवाज जोरजोरात येत असतात .ध्वनी प्रदूषणाचा तर मुद्दा कोणी लक्षातच घेत नाही .मनोरंजनाचा तर इतका अतिरेक या देशात झालाय ,की मोबाईल ने वाटोळं केलं. टीव्ही ने वाटोळं केलं आणि ह्या भ्रामक मेडियाने तर माणसाचं आरोग्याचे, विचार शक्ती फार वाटोळं केलंय .लोकांना कष्ट नको आहेत.मनोरंजन हवय.

नोकरी:कुठेतरी आया म्हणून, नर्स म्हणून ,पुरुष सहायक , स्वयंपाक करणारा पुरुष किंवा स्वयंपाकी स्त्री ,माळी,मसाजर ,ड्रायव्हर म्हणून कष्टाची काम करायला त्यांना नकोय. तिथे सुद्धा त्यांना मध्ये मध्ये मोबाईल उचकटून बघायची सवय लागली आहे. कोरोना काळात बायकांनी किती प्रकारे संसार पुढे नेला आणि पुरुषांनी काय केलं? ती सध्या काय करते असं म्हणावं, तर महिला खूपच काही करतात . तो सध्या काय करतोय? याचा रिव्ह्यू करायची गरज पडते. वर्षानुवर्ष पुरुषाला झुकत माप समाजाने दिले .त्यामुळे त्याला स्वयंपाक पाणी करता येत नाही. जेवल्यानंतर आवरा आवर करायची सवय नाही .शिवाय त्याला कधी बाईला सन्मान दिला जावा हे पण शिकवलं गेलं नाही. मालिका चित्रपट आणि ओ टी टी वरचे सिनेमे बाई फक्त नटून मुरडून मिरवणारी दाखवली जाते .त्यामुळे त्याला असं वाटतं की बाई वरवर शोभेची बाहुली ,घरकामात हक्काची दासी आहे. सुरुवातीला खूप गाजणारी प्रेम प्रकरण देखील नंतर अशी व्यावहारिक पातळीवर आली की मूळु मूळु होऊन जातात.गृहिणी वर्गाची माझी एक मैत्रीण म्हणते ,"पुढच्या पिढीत पुरुष

खूप बायकांच्या अधीन झालेत आणि ते बाईचा सन्मान करतात आणि कामात मदत करतात .आपल्या पिढीत करत नव्हते.जुने नवरे ते आताही मदत करत नाहीत."

आता जर बदल होत असेल तर तो बदल स्वागतार्ह आहे ,चांगला आहे. आज पुरुष स्त्रीला समजुन घेत असेल, अस होत असेल ,तर तो बदल समाजात व्हायला हवा.

खूप कडू औषधाची गोळी आहे.

लेखात लिहिलंय हे प्रातिनिधिक असलं तरी एव्हडं पण निगेटिव्ह नाहीये बरका चित्र!

एक मोठा बदल होताना दृश्य आहे. शंभर वर्षा पूर्वी निरक्षर असणाऱ्या बायकांना संसारात सामावून घेताना, सुरक्षित ठेवताना घर कामात गुंतवले गेले. त्यातून पुढे जसजसे शिक्षण मिळत गेले त्या घराबाहेर पडून काम करू लागल्या. मुलेही हाउसकीपिंग चे काम शिकू लागले, करू लागले.

बदल होताना जी निरनिराळी मशीन घरी आली त्यांना सुख सोयी च म्हणतो ना?आमच्या कडे सगळ्यांना कामाची सवय आहे.मुल मुलीपण छान स्वयंपाक करतात. सगळ्यांना होस्टेल मध्ये रहात असल्याने सवय आहे.काम स्वयंपाक सफाई ई. करायचीसिनेमा मध्ये असते तशी शेवट सुखी आयुष्याची झलक भावी समानतेचे स्वप्न दाखवली आहेत.येईल नवा जमाना येईल.. पुरुष दिनी छान कान उघडणी केली पण बदल.व्हायला हवा!

तोपर्यंत तरी स्त्री," अरे घरोट्या घरोट्या माझे थकले रे हात ,"असं म्हणून ते घरोटं फिरवतच राहणार आहे.

**

तू सुखी रहा: .

ग्रंथालीच्या 51 व्या ग्रंथाली वाचक दिनाच्या ग्रंथाली आणि मराठी ग्रंथ संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने असलेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठी ग्रंथ संग्रहालयात शनिवार-रविवार दोन दिवस कार्यक्रमांची रेलचेल होती .

किशोर बेडकीहाळ सातारा, यांची तर्क तीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी या विषयावर आणि

डॉक्टर रणधीर शिंदे कोल्हापूर ,डॉक्टर सुनील कुमार लवाटे कोल्हापूर यांची साहित्या बद्दल चर्चा स्वरूप भाषण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर निर्मोही फडके यांनी केले.काल पाच पुस्तक प्रकाशित झाली 1 एक होती हिडिंबा लेखिका डॉक्टर स्मिता दातार 2 पोटजाळ 3 गोष्ट नलिन भाईंची 4 अनपेक्षित आणि 5 फिरकी [तिचा] तांब्या!

दुसऱ्या दिवशी म्हणजे आज रविवारी 30 नोव्हेंबर रोजी रोहिणी निनावे आणि अश्विनी महांगडे या दोन कलाकारांची मुलाखत मकरंद जोशी यांनी घेतली .मुलाखत अर्थातच छान रंगली. मालिकांची सर्वोत्कृष्ट अशी शीर्षक गीत लिहिण्यात रोहिणी निनावे मॅडमचा हातखंडा आहे .अनेक बक्षीस त्यांना या मालिका शीर्षक गीतांवर मिळाली आहेत. दामिनी अवंतिका या त्यांच्या मालिका दूरदर्शन वर खूप वर्ष गाजले आहेत.

2010 सन,महाराष्ट्र टाइम्स मध्ये एक कादंबरी रोज मालिका स्वरूपाने प्रकाशित व्हायची .तिचं नाव होतं ,,'तू सुखी राहा' त्या, 'तू सुखी रहा' या मालिकेच्या लेखिका होत्या 'रोहिणी निनावे'! 2010 साली माझे कफ परेडला पोस्टिंग होतं.

महाराष्ट्रीयन एरिया नसल्यामुळे महाराष्ट्र टाइम्स मिळायचा नाही .सीएसटीच्या पेपर स्टॉलवर किंवा ठाण्याला घरी आल्यावर वाचायचा, ईथल्या तिथल्या पेपर स्टॉलवर शोधायचो .पण आम्ही ते 'तू सुखी राहा' सदर, तो त्या दिवशीचा एपिसोड वाचेपर्यंत थांबायचो नाही.अतिशय रंजक,मनावर परिणाम करणार्या अशा वेगवेगळ्या वळण वाटांनी त्या तू सुखी राहा या मालिकेची कादंबरी पुढे जात होती . तसं त्याकाळी परदेशाचा थोडा आकर्षणच होतं आणि प्रेमाच्या त्रिकोणातील ,एका व्यक्तीचं परदेशी जाण्याचं वेड, प्रेम ,गैरसमज, घोटाळे, सुख दुख, स्वभाव ,संस्कृती ,विचार, शांतता या सगळ्याचा सुंदर मेळ त्याला 'तू सुखी रहा' कादंबरीत होता. माझ्यावर या कादंबरीचा इतका प्रभाव पडला होता की मी माझ्या स्तंभ संग्रहाच नाव सुद्धा 'या सुखांनो या!' असं दिलं होतं. त्याच कादंबरीच्या लेखिका मॅडमना आज पंधरा वर्षांनी मी माझे स्तंभ संग्रह पुस्तक ,'लाखाची गोष्ट' ॲमेझॉन किंडल वर प्रकाशित झालेलं, उद्वेली बुक्स तर्फे प्रकाशित पुस्तक ,सप्रेम भेट दिले. या घटनेबद्दल मला खूप आनंद आणि नवल वाटलं .कौतुक देखील वाटलं. ज्येष्ठ लेखिका रोहिणी निनावे, यांना मी मंत्रालयात भेटायला जायचे ठरवले होते. पण जमले नाही.तेव्हा माझे स्तंभ ,मालिका एक दिवा लावु या, वगैरे अशा काही काही वर्तमानपत्रात छापून यायच्या .पण पुस्तक प्रकाशित झालं नव्हतं.

मालिका कलाकार अश्विनी महांगडे या साताऱ्या जवळच्या पसर्णी येथे राहणाऱ्या आहेत.सध्या विविध मालिकांमध्ये लोकप्रिय झालेल्या कलाकार आहेत..त्या रोहिणी ताई सोबत आजच्या कार्यक्रमात होत्या. त्यांना भेटल्यावर तर मला असं वाटलं की जणू काही आय एम नॉन सेलिब्रिटी विथ सेलिब्रिटी !म्हणजे मी मालिकाच बघत नाही. त्यामुळे मी त्या कलाकारांना अभिनय संदर्भात ओळखत नव्हते. करोना काळात बरीच समाज सेवा करणाऱ्या एका संस्थेत अश्विनीताई

महांगडे काम करायच्या. त्यानंतर संजय डबीर यांच्या गझलांचा कार्यक्रम झाला .गझला खरंच खूप छान होते आणि हृदयस्पर्शी होत्या.

एक त्यातील प्रातिनिधिक म्हणून2 गझला सांगते.

1] पुरावा.धडधडीत सत्यालाही लागतो पुरावा येथे न्यायालय त्यांचे होते ,मज लढता आले नाही! माझाच चेहरा आता ,मज अंधुक अंधुक स्मरतो मी खरा कसा होतो, मज आठवता आले नाही मरणाच्या दारी आता ,खोटे बोलू कशाला?

मी कबूल करतो आहे, मला जगता आले नाही!

2]दुसरी स्पर्धेत कधीही नव्हतो तरी धावत आहे,

माझ्या अस्तित्वाचा मी पाठलाग करतो आहे!

एकूण काय 'रिडर संडे आऊट' असा आजचा दिवस साहित्यामध्ये कारणी लागला.

रसिक वाचकांनो तुम्हाला सरस्वती माता सांगते, 'तू सुखी रहा!'

**

The end

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.

शुभांगी पासेबंद यांचे हे ई साहित्यवरचे सोळावे पुस्तक आहे.

शुभांगी पासेबंद या बहुश्रुत बहुआयामी लेखिका असून कथा, कादंबरी काव्य स्फुट आदी सर्व प्रकारच्या साहित्यात त्यांनी लेखन केले आहे. त्याच बरोबर सामाजिक कार्यातही त्यांचा भरीव वाटा आहे.

शुभांगी पासेबंद यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१६), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६१पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), डॉ. अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१३), **डॉ. वृषाली जोशी (६१)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२),

आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (३३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (९), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (८), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (४) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(४), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे(३), सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(३), स्वाती वर्तक(२), भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), कैलास बडगुजर, प्रा श्रीपाद काळे(६), चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, डॉ. मनोहर सुरवाडे(२), श्रेणिक सरडे (६), डॉ. सोपान कांगणे, मिलिंद चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)

जीवन सुंदर आहे.. शुभांगी पासेबंद

****

स्तंभलेखनाचे बीज आधी स्फुरते, मग त्यातून पूर्ण विषयाचा वृक्ष बहरत फुलतो. मुळापासून उर्ध्वगामी म्हणजेच उगमापासून निगमापर्यंत डजाणे, हे स्तंभलेखनाचे मूळ तत्त्व आणि सत्व आहे, याची पुरेपूर जाणीव शुभांगी पासेबंद यांच्या "जग सुंदर आहे..!" या स्तंभलेखनाच्या संग्रहातून आपल्याला तीव्रपणे होते..!

एखादी नदी जशी युगानुयुगे मातीच्या हृदयातून आत्ममग्न होत वाहते, तशी भारतीय संस्कृतीतील प्रसंगांच्या कथनाची सारणी जनमानसाच्या काठी पिढ्यानपिढ्या उमललेली आहे. "जग सुंदर आहे..!" या स्तंभलेखन संग्रहात आपल्याला अनुभवलेल्या घटनांचा पुन:प्रत्यय येतो. तत्कालीन विषयांतून एक सात्विक सत्य सांगण्याची खुबी शुभांगी पासेबंद यांना आहे.

उदाहरणार्थ.. 'मानवाचे जीवन हीच त्याला मिळालेली सर्वात मोठी स्नेहभेट आहे..' किंवा 'आयुष्य हे खूप सुंदर असते, हे कळायला एखादे संकट यावे लागत असावे..' किंवा 'परमेश्वराने बनवलेले जग खूप सुंदर आहे..' अशी आत्मीय विधाने आपल्याला जागोजागी भेटतात.

उत्कंठावर्धकता हा या स्तंभलेखनाचा प्राण आहे आणि प्रत्ययकारी प्रसंगवर्णन हा श्वास आहे. या जीवा-शिवाच्या भेटीचा आर्त संयोग आपल्याला "जग सुंदर आहे..!" या स्तंभलेखनाच्या संग्रहात पदोपदी दृष्टोपत्तीस येतो. हे रसतत्त्व रसिक निश्चित रसपान करतील, याचा मला दृढ विश्वास वाटतो..!!

@@ प्रा अशोक बागवे @@